# तृतीय वर्ष कला - मराठी

## सत्र - V (CBCS)

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. ९

# भाषांतर कौशल्य

# (OCCUPATIONAL MARATHI)

**विषय कोड : 97166**

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
कला व मानव्य शाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. डॉ. अंजली मस्करेन्हस**
मराठी विभाग प्रमुख,
एस. आर. करंदीकर महाविद्यालय, डहाणू,
ता. डहाणू, जि. पालघर.

: **डॉ. अरूण देवरे**
बी-३, ७०४, रौनक सिटी, डॉन बॉस्को स्कूल जवळ,
कल्याण (पूर्व), जि. ठाणे.

: **प्रा. डॉ. वनश्री फाळके**
विभाग प्रमुख, मराठी विभाग, श्री. पी. एल. श्रॉफ कला आणि
वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी, ता. डहाणू, जि. पालघर.

: **प्रा. डॉ. बाळासाहेब सुतार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मालकापूर, शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

: **प्रा. प्रियांका कुंभार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**प्रथम मुद्रण, मे २०२२, ISBN 978-93-91735-35-7**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **घटक १** | भाषांतर : सैद्धांतिक परिचय-<br>अ) १. भाषांतर, अनुवाद, रूपांतर, अर्वाचीनीकरण या स्वरूपभेदांची चर्चा. २. ललित साहित्याचे भाषांतर- सांस्कृतिक भेदांचे संदर्भाचे महत्त्व – **डॉ. अंजली मस्करेन्हस** | १-१८ |
| | भाषांतर : सैद्धांतिक परिचय-<br>आ) १. ललित साहित्याचे भाषांतर- भाषिक समस्या व स्वरूप, २. ललित साहित्याचे भाषांतर-शैली विषयक समस्या- **प्रा.डॉ.अरुण देवरे** | १९-४८ |
| **घटक २** | भाषांतर- प्रत्यक्ष भाषांतर अभ्यास<br>१. इंग्रजी/ हिन्दी उताऱ्याचे मराठीत भाषांतर<br>२. मराठी उताऱ्याचे इंग्लीश इंग्रजीत / हिन्दीत भाषांतर –<br>**प्रा. डॉ.वनश्री फाळके** | ४९-६१ |
| **घटक ३** | अ) पारिभाषिक शब्द (प्रशासकीय)<br>ब) कोशाची संकल्पना, रचना, कोशांच्या नोंदी, अकारविल्हे आणि सूची- **प्रा. डॉ. बाळासाहेब सुतार** | ६२-८८ |
| **घटक ४** | प्रकल्प लेखन- **प्रा. डॉ. प्रियांका कुंभार** | ८९-९६ |


*****

## अभ्यासपत्रिका क्र. ९
## भाषांतर कौशल्य
## सत्र – ५ वे श्रेयांकने –३  व्याख्याने – ४५

*उदिष्टे (Objective)*

*१) भाषांतर अनुवाद, रुपांतर या संकल्पनेचा परिचय करून घेणे.*

*२) भाषांतराच्या विविध समस्याचा अभ्यास करणे*

*३) इंग्रजी-मराठी-इंग्रजी व हिंदी-मराठी-हिंदी असे भाषांतर करण्याचे कौशल्य प्राप्त करणे*

**घटक – १- भाषांतर –सैद्धान्तिक विचार (तासिका १५)  श्रेयांकन १**

**अ)**

१) भाषांतर, अनुवाद, रुपांतर, अर्वाचीनीकरण या स्वरूपभेदांची चर्चा.

२) ललित साहित्याचे भाषांतर – सांस्कृतिक भेदांचे संदर्भांचे महत्त्व.

**आ)**

१ ) ललित साहित्याचे भाषांतर – भाषिक समस्या व स्वरूप

२ ) ललित साहित्याचे भाषांतर – शैली विषयक समस्या

**घटक – २   भाषांतर – प्रत्यक्ष भाषांतर अभ्यास (तासिका १५)  श्रेयांकन १**

१) इंग्रजी/हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर
२) मराठी उताऱ्याचे इंग्रजीत/हिंदीत भाषांतर

**घटक – ३ (तासिका १५)  श्रेयांकन १**

**अ) पारिभाषिक शब्द (प्रशासकीय)**
**ब) कोशाची संकल्पना, रचना, कोशांच्या नोंदी, अकारविल्हे आणि सूची**

**घटक ४ प्रकल्प अहवाल – सबंधित विषयावर २० गुणांचे प्रकल्प लेखनश्रेयांकन १**

## सत्रान्त परीक्षा – (गुण ८० + २० गुणांचा प्रकल्प = १००)

प्रश्न १. घटक १**अ** वर आधारित प्रश्न ( पर्यायासह)    गुण २०
प्रश्न २. घटक १ **आ** वर आधारित प्रश्न ( पर्यायासह)   गुण २०
प्रश्न ३. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह)    गुण २०
प्रश्न ४. घटक ३  वर आधारित प्रश्न ( पर्यायासह)    गुण २०

***साध्ये (Outcome)***

***१) भाषांतर विद्येबद्‌ल सूक्ष्म माहिती होईल***

***२) भाषांतर कौशल्य प्राप्त होईल, त्यामुळे रोजगार संधी प्राप्त होईल.***

**संदर्भ ग्रंथ –**


१. कऱ्हाडे सदा, भाषांतर, लोकवाङ्मय गृह, मुंबई १९९२
२. बापट वसंत, तौलनिक साहित्य अभ्यास, पॉप्यूलर प्रकाशन
३. फाटक म. वि आणि ठाकर रजनी, भाषांतर : शास्त्र की कला, वरदा बुक्स, पुणे १९८७
४. डॉ. काळे कल्याण आणि डॉ. सोमण अंजली, भाषांतरमीमांसा प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९७
५. भाषांतर – शास्त्र की कला : म.वि. फाटक, रजनी ठकार, वरदा, पुणे.
६. भाषांतर आणि भाषा : विलास सारंग, मौज, मुबई
७. अनुवादमीमांसा – संपा. केशव तुपे, साक्षात, औरंगाबाद.
८ भाषांतरविद्या : स्वरूप आणि समस्या, संपा. रमेश वरखेडे, य.च.म.मु.वि., नाशिक
९ भाषा आणि भाषांतर - य.च.म.मु.वि., नाशिक
१० साहित्य - सेतू – (साहित्याची भाषांतर एक अभ्यास), एल.एस देशपांडे, निर्मल प्रकाशन, नांदेड , १९९९

# १ अ

## भाषांतर : सैद्धान्तिक विचार

**अ १) भाषांतर, अनुवाद, रूपांतर, अर्वाचीनीकरण या स्वरूप भेदांची चर्चा**

**२) ललितसाहित्याचे भाषांतर सांस्कृतिक भेदांचे संदर्भांचे महत्त्व**

**घटक रचना**


१.० उद्देश

१.१ प्रस्तावना

१अ.१ भाषांतर, अनुवाद, रूपांतर, अर्वाचीनीकरण या संकल्पना

१अ.१.१ भाषांतर

१अ.१.१.१ भाषांतर संकल्पना

१अ.१.१.२ भाषांतर प्रकार

१अ.१.१.२ अ) शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतर

१अ.१.१.२ ब) विविध साहित्य प्रकारांचे भाषांतर

१अ.१.१.२ क) धार्मिक ग्रंथाचे भाषांतर

१अ.१.१.३. भाषांतरकार आणि भाषांतर

१अ.१.२ अनुवाद संकल्पना

१.अ.१.२.१ अनुवादकाची भूमिका

१अ.१.३ रूपांतर संकल्पना

१अ.१.४ अर्वाचीनीकरण संकल्पना

१अ. २ ललित साहित्याचे भाषांतर – सांस्कृतिक भेदांचे संदर्भांचे महत्त्व

१अ. २.१ ललित साहित्याचे भाषांतर

१अ. २.१.१ कादंबरी : वाङ्मय प्रकार

१अ. २.१.२. कविता : वाङ्मय प्रकार

१अ. २.१.३ नाटक : वाङ्मय प्रकार

१अ. २.२. सांस्कृतिक भेदांचे महत्त्व

१अ. २.२.१ साहित्य आणि संस्कृती:

१अ. २.२.२ ललित साहित्यकृतींची भाषांतरे:

१अ. २.२.३ मर्यादा

१.३ सारांश

१.४ संदर्भग्रंथ सूची

१.५ संभाव्य प्रश्न

## १.० उद्देश

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येईल.

१) भाषांतर, अनुवाद, रूपांतर व अर्वाचीनीकरण या संकल्पनांचा सैद्धांतिक परिचय करून घेता येईल.

२) ललित साहित्याच्या भाषांतराचे स्वरूप स्पष्ट होईल.

३) ललित साहित्याच्या भाषांतरामधील सांस्कृतिक भेदांच्या संदर्भांचे महत्त्व ध्यानात येईल.

४) ललित साहित्यातील भाषांतरात विविध साहित्यप्रकारानुसार सांस्कृतिक संदर्भांचे महत्त्व ध्यानात येईल.

## १.१ प्रस्तावना

भारतामध्ये व भारताबाहेर विविध भाषा बोलल्या जातात. या भाषांमध्ये अनेक प्रकारचे साहित्य निर्माण होत असते. या साहित्यातील ज्ञानानुभव एका भाषेतून दुसऱ्या भाषेत पोहचवण्यासाठी भाषांतराची गरज अधिकतेने भासू लागली. मानवी जगण्याची शैली जस जशी विकसित होऊ लागली तस तशी ही भाषांतरेही वाढू लागली. भारतामध्ये या सगळ्याला इंग्रजांचे आगमन हे महत्त्वाचे कारण ठरले. मुळात भारतामध्येच विविध भाषा बोलल्या जातात. त्या त्या भाषेत उच्चकोटीचे साहित्यही निर्माण होत होते. पण ते सर्व त्या त्या भाषाप्रदेशापुरते मर्यादित राहिले होते. इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांना भारतात सत्ता स्थापना करायची असल्याने त्यांनी भाषिक आदानप्रदान वाढविले. त्यामुळे साहजिकच भाषांतराचे महत्त्व वाढत गेले. १८१८ नंतर असे भाषिक आदानप्रदान वाढल्यानंतर ते साहित्य क्षेत्रातही रुजत गेले. त्यामुळे या कालखंडाला 'भाषांतर युग' म्हटले जाऊ लागले. सदरील घटकामध्ये आपण भाषांतर ही संकल्पना समजून घेणार आहोत. तसेच भाषांतर या शब्दाच्या अर्थाजवळ जाणाऱ्या अनुवाद, रूपांतर आणि अर्वाचीनीकरण या संकल्पनांचा विस्ताराने विचार इथे करणार आहोत.

## १अ.१ भाषांतर, अनुवाद, रूपांतर, अर्वाचीनीकरण या संकल्पना

### १अ.१.१ भाषांतर:

**मराठीत भाषांतराची सुरूवात:**

भारतात ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यानंतर मराठीत भाषांतराचा विचार सुरू झाला. 'महाराष्ट्रात भाषांतराच्या इतिहासाच्या आरंभकाळात विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि श्री. म. माटे यांनी भाषांतराविषयी महत्त्वाचे विचार मांडले. ते मुख्यत्वे पाश्चात्त्य भाषांतर विचाराच्या आधाराने. चिपळूणकरांनी 'भाषांतर' या निबंधात 'भाषांतरित वस्तूचे मूळचे सर्व गुण भाषांतरात असायला हवेत' असे मत मांडले. आगरकरांनी 'हॅम्लेट'चे 'विकारविलसित' या नावाने १८८२ मध्ये भाषांतर केले. या काळात अनेक भाषांतरे झालीत त्यामुळे या

काळाला (१८२० ते १८७५) 'भाषांतर युग' म्हटले आहे. उद्बोधन, रंजन इ. उद्देशांनी या काळात विविध प्रकारची भाषांतरे झाली. ही भाषांतरे प्रामुख्याने शब्दश: भाषांतरे होती.

### १अ.१.१.१ भाषांतर संकल्पना:

भाषांतर या शब्दाचा प्रचलित अर्थ एका भाषेतील मजकूर दुसऱ्या एखाद्या भाषेत उतरविण्याची प्रक्रिया असा आहे. भाषांतर या शब्दाचा इंग्रजी पर्याय 'Translation' असा आहे. मोल्सवर्थ यांच्या मराठी – इंग्रजी कोशात भाषांतर या शब्दाची नोंद असून त्याचा इंग्रजी पर्याय 'Translation' असाच दिला आहे. ज्या भाषेत मूळचा मजकूर असतो तिला 'मूळ भाषा' असे म्हणतात. ज्या भाषेत मजकुराचे भाषांतर करावयाचे तिला 'लक्ष्य भाषा' असे म्हणतात. लक्ष्यभाषा जर मातृभाषा असेल तर भाषांतर सर्वात जास्त सुकर होते. मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा या सहोदर भाषा असतील तर त्यांचे आपापसात होणारे भाषांतर नेहमीच सोपे ठरते. त्या दोन्ही भाषा भिन्न कुळातील असतील आणि भौगोलिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या खूपच दूरच्या असतील तर भाषांतरातील अडचणी वाढत जातात. त्यामुळे भाषांतराचे यशापयश भाषांतरकाराचे दोन्ही भाषांचे ज्ञान, त्या भाषांचे परस्पर संबंध इत्यादीवर अवलंबून असतात. भाषांतर ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. 'भाषांतरा'चे काही एक शास्त्र सांगणे शक्य असले तरी प्रत्यक्ष 'भाषांतर' ही एक व्यक्तिनिष्ठ कला आहे. 'एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर.' प्रत्येक राष्ट्राची, राज्याची, समाजाची, स्वत:ची अशी एक भाषा असते आणि त्यातून व्यवहार होत असतात. इतरांच्या भाषेतील ज्ञान आपल्या भाषकांपर्यंत पोहचले पाहिजे या गरजेतून भाषांतराची गरज निर्माण झालेली दिसून येते.

अतिप्राचीन काळापासून साहित्य क्षेत्रात भाषांतराच्या माध्यमातून आदानप्रदान होत आले आहे. विविध भाषांमधील विविध कलाकृती मानवी जीवनाला प्रेरणा, माहिती, ज्ञान, आनंद देतात.

भालचंद्र नेमाडे यांच्या मते, "भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक – सांस्कृतिक आवरणात स्थानान्तरण करणारी द्वैभाषिक प्रक्रिया आहे."

### १अ.१.१.२ भाषांतर प्रकार:

**भाषांतरामागील उद्देशावरून भाषांतराचे प्रकार ठरतात.**

१) **मूलनिष्ठ भाषांतर:** 'मूळ भाषेतील संहिता शब्दश: सांगण्याच्या उद्देशातून संहितेला प्राधान्य दिले जाते. 'अशा भाषांतराला मूलनिष्ठ भाषांतर असे म्हणतात.'

२) **लक्ष्यनिष्ठ भाषांतर:** 'यामध्ये मूळ संहितेची भाषा समजावून सांगण्याचा उद्देश नसतो तर मूळ संहितेच्या आशयाचे लक्ष्य भाषेच्या अंगाने भाषांतर केले जाते.'

३) **मुक्त भाषांतर:** भाषांतराचा मुक्त भाषांतर म्हणून एक प्रकार आहे. यामध्ये मूळ कृतीचा शब्दश: अनुवाद न करता मूळ कृती वाचल्यानंतर तिचा जो काही अर्थ स्मरणात राहिलेला असतो तो लक्ष्य भाषेत सांगितला जातो. हे भाषांतर रूपांतराचा प्रकार म्हणून मानता येईल. पण एखाद्या हुशार भाषांतरकाराने मूळ कृती चांगली लक्षात ठेवून अगदी मुळाबरहुकूम तिची प्रतिनिर्मिती केली तर ते रूपांतर न ठरता भाषांतर ठरेल. या

प्रकारामधून भाषांतरकार मूळ लेखकाच्या शैलीपेक्षा स्वत:च्या शैलीत लिहू शकतो. त्यामुळे हे भाषांतर स्वाभाविक वाटते. या प्रकाराला भावानुवाद, भावार्थ भाषांतर, स्वैर भाषांतर इ. नावांनीही ओळखले जाते. या स्वैर भाषांतराला 'भाषांतर' या संकल्पनेत बसवता येत नाही.

४) **सर्जक भाषांतर:** या प्रकारात आशयाची प्रतिनिर्मिती बरोबरच संपूर्ण सौंदर्यानुभवाची प्रतिनिर्मिती असते. यामध्ये ध्वनियोजना, शब्दयोजना, वाक्यरचना, म्हणी, सांस्कृतिक शब्द, सामाजिक संकेत, उपमादी अलंकार, प्रतिमा, छंद इत्यादींचा समावेश होतो. या प्रत्येक घटकाने सौंदर्यनिर्मिती करता येईलच याचा भाषांतरकाराने शोध घेतला पाहिजे. यातील काही घटकांचे कार्य लक्ष्यभाषेत संपूर्णपणे वेगळे असू शकते. तसेच भाषांतरकार या प्रत्येक घटकाचा भाषांतर करताना विचार करेलच असे नाही, तो निर्मितीच्या प्रवाहात लिहीत असतो. त्याप्रमाणे भाषांतरकारही त्याचे भाषांतरावरील प्रभुत्व, त्याची आकलनक्षमता, संवेदनक्षमता आणि भाषांतरामागची उत्कटता यांच्या आवेगात लेखन करत असतो. अशा प्रसंगी तो मूळ कलाकृतीपेक्षाही सरस भाषांतर करू शकतो. भाषांतराचे काही प्रकार आहेत. भाषांतराचा मुक्त भाषांतर म्हणून एक प्रकार आहे. सर्जक भाषांतर या प्रकारात आशयाची प्रतिनिर्मिती बरोबरच संपूर्ण सौंदर्यानुभवाची प्रतिनिर्मिती असते.

अशाप्रकारे भाषा व्यवहारात विषयानुसार जसे प्रकार निर्माण होतात, तसेच त्यांच्याशी संबद्ध भाषा व्यवहारानुसार भाषांतरात पुढील प्रकार पडतात.

### १अ.१.१.२- अ) शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतर:

शास्त्रीय ग्रंथाची भाषा परिभाषानिष्ठ असते. ग्रंथांचे लक्ष्यभाषेत भाषांतर करताना लक्ष्यभाषेत त्या विषयातील समांतर परिभाषा वापरावी लागते. कित्येकवेळा भारतीय भाषांमध्ये परिभाषा नसल्याने संस्कृत भाषेतील शब्दांचा वापर केला आहे. त्यामुळे असे भाषांतर बोजड झाले आहे. एन.सी.ई.आर.टी. ने शालेय अभ्यासक्रमातील मराठीतील भाषांतरे इंग्रजीपेक्षा बोजड झाली होती. टाटा इन्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेने पाठ्यपुस्तकांच्या सुलभीकरणाचा प्रकल्प हाती घेतला होता. डॉ. स. गं. मालशे यांनी Rene Wellk यांच्या A Theory of Literature या ग्रंथाचे 'साहित्यसिद्धान्त' या शीर्षकाने भाषांतर केले, हे एक चांगले भाषांतर आहे. प्रा. गो. वि. करंदीकरांनी ऑ ॲरिस्टॉटलच्या 'पोएटिक्स' या ग्रंथाचे केलेले भाषांतरही एक उत्कृष्ट भाषांतर म्हणून प्रसिद्ध आहे. शास्त्रीय ग्रंथांच्या भाषांतरासाठी योग्य ते पारिभाषिक शब्द शोधणे, त्यांचा बिनचूकपणे, सुसंगत पद्धतीने वापर करणे हे कठीण काम आहे. त्यामुळे शास्त्रीय ग्रंथाच्या भाषांतरांसाठी लक्ष्यभाषेत सहज समजेल अशी परिभाषा तयार करणे हे भाषांतरकाराचे प्रमुख कार्य आहे. शास्त्रीय ग्रंथात इतर फापट पसाऱ्याची अपेक्षा नसते. अगदी मोजक्या शब्दात मजकुराची मांडणी करणे आवश्यक असते.

शास्त्रीय ग्रंथांची भाषा परिभाषानिष्ठ असते. भारतीय भाषांमध्ये परिभाषा नसल्याने संस्कृत भाषेतील शब्दांचा वापर केला आहे. ललित साहित्यातील बोली भाषेमुळे त्याचे भाषांतर करणे कठीण होते.

### १अ.१.१.२- ब) विविध साहित्य प्रकारांचे भाषांतर:

ललित साहित्याचे भाषांतरही एक प्रकारची नवनिर्मितीच आहे. मूळ लेखकाची भूमिका समजावून घेणे, कलाकृतीचे सम्यक आकलन होणे आणि त्याची लक्ष्यभाषेत पुन:निर्मिती करणे या टप्प्यातून जावे लागते. प्रत्येक साहित्य प्रकाराचा आत्मा कशात आहे हे शोधून, तो ज्या शैलीत अभिव्यक्त केला गेला आहे तो जसाच्या तसा भाषांतरित करणे ही दुरापास्त गोष्ट आहे. परंतु भाषांतरकाराला लेखकाची साहित्यप्रेरणा, सृजनप्रक्रिया, भाषिक अर्थनिर्णयन, संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, भाषिक वातावरण इत्यादी बाबींचा विचार मूळ भाषेच्या लेखकाप्रमाणेच करावा लागतो. या भाषांतरात 'काय सांगायचे' आहे किंवा 'कसे सांगितले आहे' या दोन्हींचा समन्वय साधावा लागतो. विषयाच्या आकलनाबरोबरच भाषिक आकलन व त्याचा उपयोग हा महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणी, वाक्प्रचार, व्यंजना, लक्षणा या शब्दशक्तींची जाण या बरोबरच व्याकरणिक, अर्थवाही शब्दांची मांडणी याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

इतर कोणत्याही साहित्य प्रकारांच्या भाषांतरापेक्षा कवितेचे भाषांतर ही अधिक कठीण गोष्ट असते. भाषांतरकाराला कवितेचे शब्द आणि त्यातून सूचित होणारा आशय समजून घेऊन कवितेचा 'घाट' आणि 'रचनाबंध' भाषांतरात उतरवणे महत्त्वाचे असते. जेव्हा समतुल्य रचनाबंध भाषांतराच्या भाषेत उपलब्ध नसतील तेव्हा भाषांतराला नवे रचनाबंध तयार करावे लागतात. नाटक या प्रकारामध्ये घाट, संरचनात्मक तत्त्वे आणि भाषाही भाषांतरकाराला विशेष लक्षात घ्यावी लागते. नाटकातील दृश्यात्मकता, सांस्कृतिक संदर्भांचे देशीकरण यांचे सममूल्य प्रस्थापित करावे लागते. परंतु सांस्कृतिक भिन्नतेमुळे मूळ संहितेतील भाषेच्या सांस्कृतिक अर्थांचे पदर भाषांतरात निर्माण करण्याचा प्रश्न भाषांतरकारासमोर आव्हानात्मक ठरतो.

### १अ.१.१.२- क) धार्मिक ग्रंथाचे भाषांतर:

धार्मिक ग्रंथ हे भाविकांच्या श्रद्धेचा विषय असतो. त्यातील मंत्र, पदे, ऋचा इतर मजकूर यांचे भाषांतर मूळ अर्थ समजावून घेऊन केले पाहिजे. येथे धर्मश्रद्धांना धक्का न पोहचता भाषांतर करावे लागते.

धार्मिक ग्रंथाचे भाषांतर ही शास्त्रीय ग्रंथाच्या भाषांतराइतकेच काटेकोर असावे लागते. धार्मिक ग्रंथांच्या भाषांतरामध्ये मूळ ग्रंथातील संकल्पना लक्ष्यभाषेत योग्य प्रकारे व्यक्त करता येत नाहीत. बायबलमधील स्पिरिट, इव्हिल स्पिरिट, गॉड्स स्पिरिट, सोल या संकल्पना मराठीत आणताना भारतीय वेदांमधील संकल्पनांचा त्यांच्यावर प्रभाव पडतो. धार्मिक लोक इतके कट्टर असतात, की याबाबतीत थोडी देखील तडजोड करायला तयार नसतात. पंडिता रमाबाईंनी 'बायबलचे' भाषांतर करताना (१९२२) 'पुत्र' हा शब्द घ्यायला नकार दिला. कारण 'पुत्र' शब्दाची मुळातली संस्कृतमधील व्युत्पत्ती 'पुत नाम्न:नरकात् त्रायते असौ' अशी आहे. यामधली नरक कल्पना ख्रिस्ती धर्मात नसल्यामुळे त्यांनी तो शब्द वापरला नाही. तसेच 'परमेश्वर' हा शब्दही टाळला आहे. कारण ईश्वर एकच असताना त्याच्यासाठी 'परम', 'अंबर', ज्येष्ठ, कनिष्ठ, असे सापेक्ष शब्द संभवत नाहीत असे त्यांचे मत होते.

रत्नाकर हरी केळकर यांनी (१९८५) बायबलचे भाषांतर करताना मूळ ग्रीक शब्दांऐवजी मराठी पर्यायी शब्द न घेता त्या शब्दांचा अर्थ व अन्वयार्थ शोधून पार्श्वभूमी व इतिहासासह सविस्तर टिपणे दिलेली आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले बायबलचे भाषांतर हे अनुरूप, मार्मिक झाले आहे.

### १अ.१.१.३. भाषांतरकार आणि भाषांतर:

भाषांतरकाराला स्त्रोत भाषेचे आणि लक्ष्यभाषेचे परिपूर्ण ज्ञान असणे पूरेसे नाही, तर दोन्ही भाषांचे अद्ययावत शास्त्रीय ज्ञान त्याला असावे. भाषाविज्ञानातील ध्वनिपरिवर्तन, अर्थपरिवर्तन यांचा अभ्यास असणे गरजेचे आहे. आदर्श भाषांतरकाराचे वाचन हे सातत्यपूर्ण असले पाहिजे. भाषांतरित रचना मूळ भाषेतील कृतीसारखी किंबहुना तीच मूळ आहे असे वाचकाला वाटणेही उत्तम भाषांतराची कसोटी आहे. भाषांतरात ‘काय सांगायचे’ आहे किंवा ‘कसे सांगितले’ आहे याचा समन्वय उत्तम भाषांतरात साधला जातो. भाषांतर ही एक कला आहे. ती सहज साध्य नसून परिश्रमाने प्राप्त होणारी कला आहे. आदर्श भाषांतरकार स्वप्रशिक्षित असतो. सरावाने त्याचा आत्मविश्वास वाढू लागतो आणि अनुभवामुळे त्याला सफाईदार भाषांतर करता येते. त्याला स्वत:ची भाषांतर करण्याची शैली घडवता येते. भाषांतर, अनुवाद आणि रूपांतर हे चांगले करण्यासाठी त्याला सफाईदार भाषांतर करता आले पाहिजे.

आजच्या संगणक युगात विविध भाषांमध्ये भाषांतर करणे शक्य झाले आहे. त्यामध्ये नवीन पद्धती सतत निर्माण होत आहेत. पण शेवटी संगणक यंत्राच्या काही मर्यादा पडतात. यंत्रयुगामुळे, तंत्रज्ञानामुळे जग आता जवळ आले आहे. त्यामुळे विविध देश, त्यांची संस्कृती, त्यांचे साहित्य यांच्यामध्ये आदानप्रदान होत आहे. यामुळे भाषांतराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १अ.१.२ अनुवाद संकल्पना

इंग्रजीमध्ये अनुवाद या शब्दाला Translation असा प्रतिशब्द वापरला आहे. परंतु अलीकडे Translation शब्दाचा अर्थ भाषांतर असा घेतला आहे. २१ व्या शतकाला ‘अनुवादाचे युग’ म्हटले जाते. विविध भाषा आणि त्या भाषेतील साहित्याचा अभ्यास करण्याबरोबरच परस्परातील संस्कृती, ज्ञान–विज्ञान आत्मसात करण्यासाठी अनुवादाचा उपयोग होऊ लागला आहे.

‘पूर्वसिद्ध मजकुराचे स्पष्टीकरण, विवरण अथवा विस्तार म्हणजे अनुवाद होय. मोल्स्वर्थच्या Repeating Another Speech or Ones own Tautology असे त्याचे अर्थ दिले आहेत.
आपटे यांच्या ‘संस्कृत कोशात’ ‘Repetition, Repetition by way of Explanation, Illustration or mentioned such as paraphrase or free translation, supplementary repetition’ असे त्याचे अर्थ दिले आहेत.

दाते यांच्या शब्दकोशात Translation पुन्हा पुन्हा सांगणे, पाठ सांगणे, स्पष्ट करणे असे अर्थ दिले आहेत. हे सर्व अर्थ ‘भाषांतर’ या शब्दाच्या रूढ अर्थापेक्षा खूप व्यापक आहेत.

त्यामध्ये धोकंपट्टी, स्पष्टीकरण, पुनरावृत्ती, गद्यरूपांतर, टीका इत्यादी सर्व प्रकारांचा समावेश होतो. यावरून अनुवाद ही संज्ञा व्यापक आहे हे स्पष्ट होते.

'अनुवाद या व्यापक संज्ञामध्ये भाषांतर ही सामावणारी तिचा एक प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे. भाषांतर हाही अनुवादच असल्याने त्यातही सारांश, विस्तार, स्पष्टीकरण, गद्यरूपांतर, पद्यरूपांतर इ प्रकार संभवतात. पण एक भाषिक अनुवादामध्ये सहसा न आढळणारा एक प्रकार भिन्नभाषिक अनुवादामध्ये आढळतो. तो म्हणजे एका संहितेचा अर्थ शब्दश: दुसऱ्या भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे, हा होय. याच प्रकाराला रूढ अर्थाने भाषांतर असे म्हणण्याचा प्रघात आहे. भिन्नभाषिक अनुवादाला रूपांतर म्हणण्याचा प्रघात आहे. त्यामध्ये मूळ संहितेला शब्दश: चिकटून न राहता तिच्या स्थूल आशयावरच लक्ष केंद्रित केलेले असते. भाषांतरामध्ये मूळ कृतीचा शब्दश: अर्थ देण्याचा प्रयत्न असतो, पण त्याचबरोबर मूळ कृतीतून मिळणारा सौंदर्यानुभव, वक्तृत्वानुभव इ. शैलीजन्य अनुभवही वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न असतो. मूळ कृतीचा स्थूलाशय वाचकांपर्यंत पोचवण्याच्या कौशल्यापेक्षा तिचा शब्दश: अर्थ तिच्या शैली घटकांसह दुसऱ्या भाषेत उतरवण्याचे कौशल्य सूक्ष्म असून भाषांतर मीमांसेमध्ये त्याचाच प्रामुख्याने विचार असतो.

'एकूण अनुवाद प्रक्रियेविषयी सार्वकालिक अशी काही तत्त्वे आपण सांगू शकत नाही. अनुवाद ही सापेक्ष प्रक्रिया आहे. अनुवाद कशाचा, कोणासाठी आणि कोण करतो आहे या प्रश्नांच्या उत्तरावर अनुवादाचे स्वरूप अवलंबून असते.

अनुवादक कोणत्या वाचक वर्गासाठी अनुवाद करतो यावरही अनुवादाचे स्वरूप ठरते. एखाद्या मराठी साहित्यकृतीचा इंग्रजी अनुवाद इतर अमराठी भारतीयांसाठी असेल तर सांस्कृतिक संदर्भांचा खुलासा फार करण्याची आवश्यकता नसते. पण अ-भारतीय इंग्रजी वाचकाला सामाजिक, सांस्कृतिक तपशील पार्श्वभूमी स्वरूपात द्यावे लागतात.'

### १.अ.१.२.१ अनुवादकाची भूमिका:

'अनुवादक हा वेगवेगळ्या भाषांवर प्रभुत्व असणारा असावा लागतो. याचबरोबर उत्कृष्ट अनुवादासाठी अनुवादकास संबंधित दोन्ही भाषेतील संस्कृतीची उत्तम जाण असावी लागते. दोन भाषिक समूहांच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जाणिवांची माहिती असावी लागते.

अनुवाद ही बहुभाषिक प्रक्रिया असल्याने ती एका भाषेतून किंवा अनेक भाषांतून अभिस्तरीत होत असते. अनुवाद करताना बऱ्याचदा साहित्यिक अभिव्यक्तींचा चुकीचा अर्थ लावला जातो, समाजाच्या भावना भडकतील अशा स्वरूपाचे लेखन तो करतो अशा साहित्यकृती जर अनुवादित झाल्या तर सामाजिक संघर्ष निर्माण होतो.

"अनुवाद करतांना केवळ संस्कृतीची माहिती असून चालत नाही तर त्या भाषिक समूहांच्या भौगोलिक रचनेची माहिती असावी लागते. शब्दांच्या मूळ अर्थापर्यंत जायचे असेल तर त्या प्रदेशाची भूगोलाची माहिती असणे गरजेचे असते. कारण भाषानिर्मिती आणि भाषाविकास यांवर भौगोलिक रचनेचा प्रभाव असतो."

भारतीय भाषांमध्ये ललित साहित्याचे परस्पर अनुवाद होतात. भारतीय भाषांचा अनुवादासाठी सर्वाधिक संपर्क इंग्रजीशी येतो. ही भाषांतरे साधारणपणे तीन वर्गात मोडतात.

१) एका भारतीय भाषेतून दुसऱ्या भारतीय भाषेत.

२) भारतीय भाषेमधून इंग्रजीत

३) इंग्रजीतून भारतीय भाषेत

पहिल्या वर्गातील भारतीय भाषांतर्गत अनुवादीत परस्पर देवघेव समान पातळीवर असते.

इंग्रजीतून भारतीय भाषांमध्ये अनुवाद होतात ते भारतीय भाषांची क्षमता वाढवण्यासाठी, त्यांना अधिकाधिक पुष्ट बनवण्यासाठी होतात.

मूळ भाषा आणि साध्य भाषा या दोन्ही भारतीय भाषाच असतील तर, सामाजिक जडणघडण, सांस्कृतिक परंपरा यांत थोडफार वेगळेपणा असला तरी ते समजायला फारशी अडचण येत नाही. पण त्यापैकी एक भाषा परकीय असेल तर ही गोष्ट महत्त्वाची ठरते, मुळात ज्या गोष्टी त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक परंपरेतच नसतील तर त्या उलगडून सांगाव्या लागतात. उदा. मंगळगौरी, झोपाळा, उष्टं-खरकटं, तीट असे भाषाबाह्य संदर्भ स्पष्ट करून सांगावे लागतात.

'मूळ भाषा आणि साध्य भाषा या जोडीतील भाषांच्या संरचना, त्यांचे स्वभाव यांच्याशी, मूळ पाठ्याशी ते निगडित असतात. इंग्रजी आणि मराठी या भाषा घेतल्या तर उनोक्ती हे इंग्रजी संवेदना स्वभाषाचे वैशिष्ट्य आहे. भावनांचे प्रदर्शन, विशेषणांची खैरात, उद्गार चिन्हांची रेलचेल इंग्रजी भाषेच्या स्वभावातच बसत नाही. पण भावुकता, अतिशयोक्ती या गोष्टी मराठीत नैसर्गिक वाटतात. त्यामुळे मराठीचे इंग्रजीत जसेच्या तसे भाषांतर केल्यास ते अकारण अतिशयोक्ती वाटेल. आणि इंग्रजीचे जसेच्या तसे मराठीत केल्यास ती उनोक्ती ठरेल. मूळ लेखकाचे शैली वैशिष्ट्य हाही मूळ पाठ्याचा प्राण असतो. पाठ्याच्या आशयाचा तो अविभाज्य भाग असतो. या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यास भाषांतराची हानी होते. उदाहरणार्थ – शेक्सपियरच्या 'ऑथेल्लो' या नाटकात शेक्सपियरने ऑथेल्लोच्या तोंडी साधीसरळ भाषा दिली आहे पण शिरवाडकरांनी त्याची सौंदर्यपूर्ण भाषा वापरली आहे हे पात्राच्या स्वभावाशी विसंगत झाले आहे.'

मूळ लेखक आणि अनुवादक एकाच काळातील असतील तर ते परस्परांशी संपर्क ठेवू शकतात. अनुवादक आपल्या शंकांचे समाधान खुद्द मूळ लेखकाकडून करून घेऊ शकतात. पण मूळ पाठ्य जुन्या काळातील असेल तर मात्र वेगळे प्रश्न पडतात. उदाहरणार्थ – तुकारामांच्या अभंगाचे भाषांतर करताना अनुवाद भाषेचे रूप काहीसे जुनवट वापरावे की आधुनिक? अशा वेळी मूळ पाठ्याचे दोन अनुवाद झाले तरी दोन्ही वेगवेगळ्या तऱ्हेने परिणामकारक ठरतात. ललित साहित्यात असे अनुवाद उपकारकच ठरतात. पण वैचारिक वाङ्मय असेल तर त्याचा अनुवाद आधुनिक भाषेत होणे अधिक उपयुक्त असते. कारण यातून समकालीन समाजाला बोध घेता येणे सहज शक्य असते.

'भिन्नभाषिक अनुवादामध्ये रूपांतर आणि भाषांतर असे प्रकार असतात. त्याचप्रमाणे एक भाषिक अनुवादामध्येही केवळ आशयनिष्ठ आणि आशयरूपनिष्ठ असे प्रकार संभवतात. उदा. – ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर १९ व्या शतकात हंसराज स्वामींनी समकालीन भाषेत तिचा समओवी अनुवाद केला. तो समओवी अनुवाद असून जवळजवळ शब्दश: केलेला आहे. करंदीकरांनी विसाव्या शतकात त्याचे अर्वाचीनीकरण केलेले आहे. त्यांचाही अनुवाद समओवी असून शब्दश: केलेला आहे. हंसराजस्वामींचा भर ज्ञानेश्वरी ओवीचा आशय स्पष्ट करून तिच्यातील तत्त्वज्ञान सुबोध करण्यावर आहे. तर विंदा करंदीकरांचा प्रयत्न ज्ञानेश्वरांच्या मूळ कृतीचा आशय त्याच्या सौंदर्यानुभवांसह वाचकांपर्यंत पोचवण्याचा आहे. हे दोन्ही प्रयत्न एक भाविक असल्याने त्यांना भाषांतर म्हणता येणार नाही. हंसराज स्वामींच्या अनुवादाला आशयनिष्ठ शब्दानुसार आणि विंदा करंदीकरांच्या अनुवादाला शैलीनिष्ठ शब्दानुवाद म्हणता येईल. शैलीनिष्ठ अनुवादाला सर्जक अनुवाद आणि शैलीनिष्ठ भाषांतराला सर्जक भाषांतर असे डॉ. कल्याण काळे यांनी म्हटले आहे.'

१९७५ ते १९९१ या काळात सुप्रसिद्ध कन्नड लेखक डॉ. शिवराम कारंत यांच्या कादंबऱ्या मराठीत अनुवादित झाल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद वेगवेगळ्या अनुवादकांनी केले असून त्यामध्ये एकवाक्यता दिसून येते. अनेकवेळा साहित्य अकादेमी, नॅशनल बुक ट्रस्ट, कॉन्टिनेंटल प्रकाशन, मेहता प्रकाशन, चंद्रकला प्रकाशन या संस्थांनी ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या लेखकांच्या कादंबऱ्या अनुवादित करून घेतल्या आहेत.

डॉ. शिवराम कारंत यांच्या 'तनमनाच्या भोवऱ्यात' आणि 'डोंगराएवढा' या कादंबऱ्यांचे अनुवाद करताना अनुवादक डॉ. उमा कुलकर्णी यांनी त्यांना प्रादेशिक संदर्भांचे कसे अडथळे आले यावर सविस्तर लेखन केले आहे. त्यांच्या कन्नड प्रदेशातील विशिष्ट प्रकारचा सुवासिक तांदूळ, विशिष्ट जातीचे आंबे, वनराई या शब्दासाठी लेखकाशी संपर्क करून शब्दांचे अर्थ समजून घ्यावे लागले होते. काही वेळा त्यांना बोली रूपांचा वापर करावा लागला. म्हणी, वाक्प्रचारांचा अनुवाद रसभंग करणारे वाटतात.

डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या 'वंशवृक्ष' या कादंबरीमध्ये एके ठिकाणी गोज्जु भात डब्ब्यात नेल्याचा उल्लेख आला आहे. गोज्जु भात या शब्दाचा अनुवाद करता न आल्याने तो शब्द अनुवादकाला तसाच ठेवावा लागला. अशा काही मर्यादा भाषांतरकारावर पडतात.

मूळ पाठ्यातील आशयाशी इमान राखून मूळ लेखकाला जे अभिप्रेत आहे ते अनुवाद भाषेत स्वाभाविक वाटेल, वाचकाला खटकणार नाही अशा पद्धतीने आणणे ही अनुवादकाची सर्वात मोठी जबाबदारी असते. त्याला दोन्ही भाषांशी सांस्कृतिक – साहित्यिक – भाषिक इमान राखायचे असतात. असे अनुवादाचे नियम, तत्त्व सांभाळून अनुवाद केले तरी अनुवादकाचा अनुभव, त्यांची कामाबद्दलची ओढ हे घटक महत्त्वाचे आहेत.

## १अ.१.३ रूपांतर संकल्पना

अनुवाद, रूपांतर आणि भाषांतर या तिन्ही प्रक्रिया एकसारख्या कार्य करीत असल्या तरी या तिन्ही प्रक्रियांची उद्दिष्ट व कार्यपद्धती भिन्न स्वरूपाची असते. 'एखाद्या कलाकृतीचा आशय दुसऱ्या रूपामध्ये, प्रकारामध्ये पुन्हा मांडणे म्हणजे रूपांतर होय.' डॉ. रमेश धोंगडे यांनी विश्वकोशात ही व्याख्या दिली आहे. "परभाषेतील साहित्यकृतीचा आकृतिबंध

साधारणपणे तसाच ठेवून बाकीचे अर्थाचे आणि रूपाचे बारकावे वगळणे, बदलणे, नव्याने आणणे म्हणजे रूपांतर."

रूपांतर करताना भाषांतरकर्ता हा मुक्त स्वातंत्र्य घेत असतो. यावेळी तो केवळ स्त्रोत भाषेतील मध्यवर्ती कल्पना व आशयसूत्र घेत असतो आणि ते लक्ष्यभाषेच्या चौकटीमध्ये बसवत असतो. यामुळे मूळची असलेली साहित्यकृती पूर्णपणे बदलून जाते. म्हणून याला रूपांतर असे म्हटले जाते. थोडक्यात परभाषेतील साहित्यकृतीतील पात्रांची नावे, स्थल, काल व वागण्या–बोलण्यातील रीतीतील बदलांसह मूळ साहित्य कृतीचे दुसऱ्या भाषेत जे रूप सिद्ध होते त्याला 'रूपांतर' असे म्हणतात. उदाहरणार्थ – 'झुंजारराव (गो. ब. देवल) हे शेक्सपीअरच्या 'ऑथेल्लोचे' रूपांतर होय. रूपांतरांचा उपयोग चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, साहित्यक्षेत्र इत्यादीमध्ये केला जातो.

रूपांतरकाराला रूपांतर करताना काही नियमाचे पालन करावे लागते.

१) 'उगमभाषा-मूळ भाषा' आणि 'लक्ष्यभाषा' याचे रूपांतरकारास चांगले ज्ञान हवे.

२) मूळ भाषेतील मजकुराशी प्रामाणिक राहून आशय विस्कळीत होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे.

३) दोन भाषांमधील व्याकरणाचे व भाषिक वैशिष्ट्यांचे ज्ञान असणे गरजेचे आहे.

४) त्या त्या भाषेतील असलेल्या शब्दांच्या अर्थछटा, वाक्प्रचार, प्रतीके यांच्यावर तिथल्या प्रदेशाचा आणि संस्कृतीचा प्रभाव याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

५) रूपांतरकार हा व्यासंगी असावा लागतो. इतिहास, पुराण, अध्यात्म, संस्कृती यांचे संदर्भ त्याला माहीत असणे आवश्यक आहे.

'अनुवादात भाषांतरापेक्षा थोडी अधिक सवलत घेता येते. कारण अनुवाद हे एक प्रकारचे स्वैर भाषांतरच असते. रूपांतर मात्र मुळापासून अधिक दूर जाते. एखादे मूल दत्तक घ्यावे, त्याचे नामकरण करावे, त्याच्यावर आपले संस्कार करावे, आपल्याकडील चालीरीती व सवयी त्याला शिकवाव्या अशाप्रकारे. पिंडप्रकृती जरी मूळची राहिली तरी दर्शनवर्तन मात्र मुळापासून वेगळे व्हावे तसे रूपांतराचे असते.

इंग्रजीतील शेक्सपिअरच्या 'रोमिओ अँण्ड ज्युलिएट' या नाटकाचे रूपांतर मराठीत अनेकांनी केले आहे. 'शशिकला आणि रत्नपाल' हे नारायण कानिटकर यांनी, 'सं. ताराविलास' नावाने दत्तात्रय केसकर यांनी, 'सं. शालिनी' नावाने तुकाराम जावजी यांनी केले आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या मूळ कादंबरीचे नाटकात रूपांतर केले आहे.

१९६० ते १९७० या कालखंडात लोकप्रिय कादंबऱ्यांची नाट्य रूपांतरे मोठ्या प्रमाणावर झाली. श्री. ना. पेंडसे, जयवंत दळवी, अनिल बर्वे, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, वसंत कानेटकर यांसारख्या नाटककारांनी नाट्यरूपांतर या क्षेत्रात नवनवीन प्रयोग केले आहेत.' रूपांतरकाराला आपल्या कौशल्याने कलाकृतीत कलानिर्मितीचे अधिक स्वातंत्र्य अनुभवता येते. त्याची अभिव्यक्ती करता येते. काहीवेळा कलाकृतीचे रूपांतर इतके

एकजीनशी, एकरूप पद्धतीने होते की मूळ कलाकृतीपेक्षा रूपांतरित कलाकृती रसिकांमध्ये लोकप्रिय होते, त्यामुळे रूपांतराचे महत्त्व वाढताना दिसते.

## १अ.१.४ अर्वाचीनीकरण संकल्पना

एका भाषेत व्यक्त झालेला विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे म्हणजे भाषांतर. पूर्वसिद्ध मजकुराचे स्पष्टीकरण, विवरण अथवा विस्तार म्हणजे अनुवाद होय. भाषांतर, अनुवाद लेखनाच्या क्रिया सामान्य नसून स्त्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा या दोन्हीवर अनुवादकाचे सारखेच प्रभुत्व असावे लागते. ज्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनातून मूळ साहित्यकृती जन्माला येते तिचे यथार्थ आकलन अनुवादकाला होणे आवश्यक असते. 'अनुवाद' म्हणजे केवळ शब्दाला प्रतिशब्द देणे नव्हे. मूळ साहित्यकृतीतील जीवनाशय आणि जीवनचैतन्य परभाषेत जिवंतपणे संक्रमित करणारी ती एक प्रक्रिया असते. अनुवादामध्ये भिन्नभाषिक अनुवाद असतात. त्यात रूपांतर आणि भाषांतर असे प्रकार असतात. त्याचप्रमाणे एकभाषिक अनुवाद केले जातात. त्याच्यामध्ये आशयनिष्ठ आणि आशयरूपनिष्ठ असे प्रकार संभवतात. ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवावर' एकोणिसाव्या शतकात हंसराज स्वामींनी समओवी टीका लिहिली आहे. कविवर्य विंदा करंदीकरांनीही विसाव्या शतकात त्याचे अर्वाचीनीकरण केलेले आहे. ज्ञानेश्वरांची भाषा एकोणिसाव्या शतकात दुर्बोध झाल्यामुळेच हंसराज स्वामींनी समकालीन भाषेत तिचा अनुवाद केला. तो समओवी अनुवाद असून जवळ जवळ शब्दश: केलेला आहे. विंदांनी आपला अनुवाद समओवीमध्ये शब्दश: रूपाने केलेला आहे. पण हंसराज स्वामीपेक्षा त्यांचा त्यामागचा उद्देश वेगळा आहे. हंसराज स्वामींचा भर ज्ञानेश्वरी ओवीचा आशय स्पष्ट करून तिच्यातील तत्त्वज्ञान सुबोध करण्यावर आहे. तर विंदा करंदीकरांचा प्रयत्न ज्ञानेश्वरांच्या मूळ कृतीचा आशय त्याच्या सौंदर्यानुभवासह वाचकांपर्यंत पोचवण्याचा आहे. दोन्ही प्रयत्न एकभाषिक असल्याने त्यांना भाषांतर म्हणता येणार नाही. हंसराज स्वामींच्या अनुवादाला 'आशयनिष्ठ शब्दानुवाद' आणि विंदा करंदीकरांच्या अनुवादाला 'शैलीनिष्ठ शब्दानुवाद' म्हणता येईल. मूळ साहित्यकृती वाचल्यानंतर जो सौंदर्यानुभव वाचकाला येतो, तशाच प्रकारचा अनुभव देण्याचे हे दोन्ही प्रकार आहेत.

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी| एक तरी ओवी अनुभवावी||' असा चिंतनात्मक अभिप्राय तेराव्या शतकातील नामदेवांनी दिला. त्यानंतर संत एकनाथांनी तीनशे वर्षानंतर (इ. स. १८८४) प्रथम तिचे संशोधन केले व शुद्ध प्रत तयार केली. पुढे इंग्रजांच्या काळात ज्ञानेश्वरीची पहिली मुद्रित आवृत्ती इ.स.१८४५ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रेरणेने छापली गेली. पुढे नाना महाराज साखरे यांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' (१९९५) प्रसिद्ध झाली. सांप्रदायिकांत महाराजांनी सुलभतेने सांगितलेल्या अर्थामुळे ती विशेष लोकप्रिय झाली. यानंतर अनेक ज्ञानेश्वरीच्या आवृत्त्यांची निर्मिती झाली.

मुंबई विद्यापीठाने १९९४ मध्ये संपादक अरविंद मंगरूळकर, विनायक मोरेश्वर केळकर यांनी तीन खंडात प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी ही व्याकरणाच्या अंगाने, रूपविचार, तत्त्वज्ञान व काव्य या अंगांनी अर्थपूर्ण ज्ञानेश्वरी आहे. अर्थ स्पष्ट करताना व्युत्पत्ती, तत्त्वज्ञान, योग, ज्ञान, कर्म शब्दांच्या अर्थासह दृष्टान्तांच्या अर्थासह स्पष्ट केली आहे. हे आधुनिक

मराठीतील ज्ञानदेवीचे रूप वाचकांना रसास्वाद देणारे झाले आहे. हे अर्वाचीनीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे.

रत्नाकर हरी केळकर यांनी (१९८५) 'बायबल'चे भाषांतर करताना मूळ ग्रीक शब्दांऐवजी मराठी पर्यायी शब्द न घेता त्या शब्दांचा अर्थ व अन्वयार्थ शोधून पार्श्वभूमी व इतिहासासह सविस्तर टिपणे दिलेली आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले बायबलचे भाषांतर हे अनुरूप मार्मिक झाले आहे.

## १अ. २ ललित साहित्याचे भाषांतर – सांस्कृतिक भेदांचे संदर्भांचे महत्त्व

ललित साहित्य कृतींचे भाषांतर हा अत्यंत कठीण प्रकार समजला जातो. कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादी ललित वाङ्मयाचे प्रकार आहेत. कथा, कादंबरी, नाटक यांसारख्या गद्य प्रकारामध्ये भाषेचे स्वरूप व्यवहार भाषेसारखेच असते. विशिष्ट भाषेतील साहित्य म्हणताना विशिष्ट भाषेची संपूर्ण संस्कृती या भाषेमधून व्यक्त होत असते. या संस्कृतीचा परिचय, अनुभव साहित्यकृतीच्या माध्यमातून वाचक घेत असतो. अशा सांस्कृतिक देवाण –घेवाणीच्या गरजेमुळेच साहित्याची भाषांतरे केली वा करविली जातात. मानवता, विश्वात्मक सत्य याचे आकलन होण्यासाठी भाषांतरे केली जातात. राष्ट्रीय एकात्मतेसाठी, ज्ञानप्रसारासाठी, मनोरंजनासाठी भाषांतरे केली जातात. अनेकवेळा भाषांतरे स्वयंप्रेरणेने केली जातात. एखाद्याला एखादी साहित्यकृती आवडली तर ती इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी भाषांतरे केली जातात. भाषांतराच्या एखाद्या भाषेतील वाङ्मय एकसूरी, चाकोरीत अडकलेले, कंटाळवाटे होऊ शकते. भाषांतरांमुळे अन्य भाषेतील साहित्य स्वभाषेत येऊ शकते.

ललित साहित्याची भाषांतरे ही वाचकाला परभाषेतील साहित्याचा, संस्कृतीचा आस्वाद घेता यावा, परभाषेतील समाज, संस्कृती, जीवनपद्धती यांचा परिचय व्हावा तसेच वाचनातून आनंद मिळावा या उद्देशाने केले जाते.

## १अ.२.१ ललित साहित्याचे भाषांतर

'भाषांतरात मूळ कृतीचे सारे सौंदर्य, चिरंजीविता मिळणार नाही. पण आरशातल्या प्रतिबिंबासारखे प्रतिबिंब बघता येईल. ललित वाङ्मयात 'काय सांगितले' आहे या बरोबरच 'कसे सांगितले' आहे हेही तितकेच महत्त्वाचे असते. ललित वाङ्मयामध्ये कोशातील भाषेचा वापर न करता वाच्यार्थ्याच्या पलीकडे जाऊन व्यंजना, अलंकार, शैली, भाषेची प्रकृती तसेच सांस्कृतिक विश्व हे घटक सहजपणे आणावे लागतात. तसेच समकालीनता राखावी लागते. मूळ कृतीमधील सांस्कृतिक वातावरण भाषांतरात जिवंतपणे साकारावे लागते.

**१.आ.१.१ कादंबरी : वाङ्मय प्रकार:**

पु. ल. देशपांडे यांनी केलेले अर्नेस्ट मिलर हेमिंग्वे यांच्या 'द ओल्ड मॅन अँड द सी' या इंग्रजी कादंबरीचे 'एका कोळीयाने' हे भाषांतर उत्कृष्ट झाले आहे. 'परंतु त्याच्या शीर्षकाच्या संदर्भात मतभेद व्यक्त झाले आहेत. शीर्षकाचे भाषांतर 'म्हातारा आणि समुद्र' असेच हवे होते असे मत व्यक्त झाले आहे. या कादंबरीत एका म्हाताऱ्या मच्छीमाऱ्याच्या एकाकी

मुशाफिरीची आणि प्रचंड माशांशी झालेल्या लढाईची कथा आहे. भाषांतरासाठी पुलंनी मच्छीमाऱ्याच्या जीवनाशी संबद्ध असलेल्या शब्दाचे मराठी प्रतिशब्द शोधून काढले. तसेच त्या विषयातील तज्ज्ञ आणि प्रत्यक्ष मच्छीमारी करणाऱ्या कोळ्यांकडून माहिती मिळवली. यामधून परेदशी मच्छीमारांचे जग मराठी भाषेत आणले आहे. पु.लं.ना जगातील वाङ्मयात उत्कृष्ट ठरलेल्या एका कलाकृतीला मराठीत आणण्याचे श्रेय मिळाले आहे.' भाषांतर म्हणजे केवळ पर्यायी शब्द एकापुढे एक ठेवणे नव्हे तर मूळभाषेतील शब्दांचा वाच्यार्थ आणि त्यातला गर्भित असलेला व्यंग्यार्थ भाषांतराच्या भाषेत संक्रमित होणे गरजेचे असते.

### १.आ.१.२ कविता : वाङ्मय प्रकार:

कवितेची भाषाही इतर साहित्य प्रकारांप्रमाणे सार्वत्रिक नसते 'ती आत्मलक्ष्यी आणि जास्तीत जास्त व्यक्तिकेंद्री असते. यामुळे मूळ भाषेतही सर्वसामान्यांना तिचे आकलन कठीण झालेले असते. त्यामुळे लक्ष्यभाषेत तिचा आशय नेमकेपणाने शब्दबद्ध करणे कठीण गोष्ट असते. लक्ष्यभाषेतील अचूक शब्दांची निवड करणे, समर्पक छंदाची मांडणी, ध्वन्यानुभवाची प्रतिनिर्मिती इत्यादी कौशल्ये पणाला लावावी लागतात. त्यामुळे कवितेचे भाषांतरही सर्वात कठीण बाब आहे.'

'१९६२–६३च्या दरम्यान दिलीप चित्रे यांनी 'सत्यकथा' या मासिकांत 'आधुनिक कवितेला सात छेद' ही लेखमाला लिहिली. बोदलेयर, रँबो, हॉपकिन्स, रिल्के, इझरापाऊंड, वॉलेस स्टीव्हन्स हार्ट, क्रेन या पाश्चिमात्त्य–युरोपियन कवींच्या महत्त्वाच्या कवितांचे भाषांतर केले आहे. त्या त्या कवीच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख त्यात आहे. दि. पु. चित्रे यांनी त्या त्या कवीची अनुभव घेण्याची रीत, त्यांचे भाषिक भान, त्यातून व्यक्त होणारा विश्वबोध विचारात घेतला आहे. दि. पु. चित्रे यांनी कवितेतील ऐंद्रिय संवेदना, कवितेचा रचनाबंध, सांस्कृतिक अर्थ, संकेत व्यूहाचे भान ठेवले आहे. कवितेत भाषांतरकाराला कवितेच्या शब्दांच्या ध्वनीमधील लयात्मता भावता आली पाहिजे, शब्दांचे संघटन, त्यांचे ऐंद्रिय परिणाम या गोष्टी लक्षात घेऊन संवेदनांसकट भाषांतर करावे लागते' यातून भिन्न भाषिक पातळीवरील कल्पनाशील संकर होत असतो. यातून एक समांतर भाषांतर संस्कृती निर्माण होत असते. चित्रे यांनी भाषांतरित केलेल्या रँबोच्या खालील ओळी लक्षणीय वाटतात.

"मातीवर पालवी फुटलेय

मी फळाचा निद्राळू गर शोधतोय

फळाच्या भेगेतून उचलतोय मी

शुक्राचे भिंग आणि विष्णुपुष्प"

लक्ष्य भाषेतील या भाषांतरातील शेवटची ओळ स्त्रोत भाषेतील सांस्कृतिक संदर्भ संदर्भसंकराची मानसिकता तयार करतात. प्रत्येक भाषा ही स्वत:ची अस्मिता जपणारी असते आणि भाषांतरात तर दोन भाषांमधील आस्मितांची देवाणघेवाण अभिप्रेत असते.'

**१.आ.१.३ नाटक : वाङ्मय प्रकार:**

नाटक हा साहित्य प्रकार कादंबरी व काव्य यांच्यापेक्षा निराळा आहे. 'हा दृकश्राव्य कलाप्रकार आहे. नाटक प्रेक्षकांसमोर रंगमंचावर सादर केले जाते. 'म्हणजे सादरीकरणाच्या दृष्टिकोनातून नाटकाची संहिता लिहिली जाते आणि रंगमंचाशी संबंधित असणाऱ्या अभिनय, नेपथ्य, रंगभूषादी व्यवसायांशी ती संबद्ध असते. नाटक या प्रकाराचा घाट, संरचनात्मक तत्त्वे आणि भाषा ही भाषांतरकाराला विशेष लक्षात घ्यावी लागतात. नाटकातील भाषेला बोली भाषेचे स्वरूप जरी असले तरी त्या भाषेच्या ताल, लय, नाद, सूर योजनांचा कलात्मक वापर नाटकाच्या भाषेत करावा लागतो. नाटकाच्या भाषांतरात दृश्य, श्राव्य घटकांचे भान ठेवून संहितेतून नाट्यमय अनुभव साकार करावा लागतो. परभाषेतील नाटक प्रेक्षकांपुढे सादर करताना प्रेक्षक नाटक आपले म्हणून कसे स्वीकारतील याकडे लक्ष द्यावे लागते.' भाषांतरकारांसमोर मूळ संहितेच्या देशीकरणाचा प्रश्न उभा राहिलेला असतो. उदा. वि. वा. शिरवाडकर यांनी मूळ शेक्सपिअरला मराठीत आणण्याच्या प्रयत्नात 'ऑथेल्लो' या नाटकातील पात्रांची नावे, स्थळांची नावे बदलून ती भारतीय तसेच मराठीत केल्यामुळे त्या पात्रांची ऐतिहासिकता लक्षात येत नाही. 'ऑथेल्लो, रॉडरिगो, आयागो, कॅशियो, बियान्का, डेस्डिमोना ही मूळची नावे बदलून ती महेश्वर, रामदेव, सोमनाथ, जयवंत, अश्विनी, दमयंती अशी ठेवली आहेत. मूळ संहितेचे अनुभवविश्व ज्या गोष्टीवर उभे आहे, त्याकडे दुर्लक्ष केल्याने ते नाट्यार्थाच्या दृष्टीने हानिकारक ठरतात. शेक्सपीअरचे नाटक ब्लँकव्हर्समध्ये आहे. गद्य व पद्याचा मिलाफ त्यात आहे. परंतु मराठीत ब्लँक व्हर्ससाठी समान वृत्त वा छंद नाही. परंतु चांगला भाषांतरकार मुक्त छंदाचा निर्मितिक्षम सर्जक वापर करून तिचे चांगले भाषांतर करू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे विंदा करंदीकरांचे 'राजा लियर'. यात मूळ शेक्सपिअरच्या 'King Lear' (१९७४) भाषांतरात नव्याने चतुष्खंडी निर्यमक मुक्त छंदाचा वापर करून ब्लँक व्हर्सचा वापर केला आहे.'

एकूण ज्या भाषांची सांस्कृतिक विश्वे बरीचशी सारखी असतात, त्या भाषांमध्ये भाषांतर व्यवहार सुकर ठरतो. ज्या भाषांमध्ये सांस्कृतिक अंतर अधिक, त्यांचे भाषांतरही अवघड ठरते. भाषांतरकार स्वभाषेची समृद्धी वाढवण्याचे महत्त्वाचे कार्य करतो, आणि नाटकाच्या भाषांतरांच्या बाबतीत तर हे कार्य अधिकच आव्हानात्मक ठरते.

एकूणच ललित कृतींचे भाषांतर करतांना त्यांच्या आकृतिबंधांचा, भाषेचा, संस्कृतीचा सखोल अभ्यास असणे भाषांतरकाराला गरजेचे असते.

## १अ. २.२ सांस्कृतिक भेदांचे महत्त्व

### १अ. २.२.१ साहित्य आणि संस्कृती:

जगभरातील साहित्यामध्ये काही प्रमाणात भिन्नता असली तरी साहित्याची काही समान वैशिष्ट्ये, रचना विशेष, आकृतिबंध असतात. साहित्य ह्या ललित कलेमध्ये आशय आणि आविष्कार या दोन्ही गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. मानवी मनातील मूलभूत भावनांचा आविष्कार साहित्यातून होतो. लेखक कोणत्या तरी समाजाचा घटक असतो. त्यामुळे साहित्यातील आशय समाज जीवनातीलच असतो. लेखक त्याच्या कल्पनाशक्तीच्या माध्यामातून या आशयाची जुळणी वैशिष्ट्यपूर्ण करून साहित्य निर्माण करीत असतो.

त्यामुळे साहित्यातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संस्कृतीचे प्रतिबिंब पडत असते. साहित्याचा आशय समाजाच्या संस्कृतीचे निदर्शक असतो. साहित्यातून प्रत्यक्ष समाज जीवनाचे दर्शन घडत असते आणि आचार, विचार, व्यवहार यांचे दर्शन घडत असते. उदा. इंग्रजी राजवटीबरोबर पाश्चात्त्य संस्कृतीच्या साहचर्याने जी नवीन संस्कृती परंपरा उदयाला येऊ लागल्या होत्या त्याचे दर्शन आपल्याला हरिभाऊंच्या कादंबरीतून दिसून येते. तत्कालीन मध्यमवर्गीय संस्कृतीचे दर्शन त्यांच्या कादंबऱ्यातून दिसते.

### १अ. २.२.२ ललित साहित्यकृतींची भाषांतरे:

मूळ साहित्यकृती ज्या भाषेतून घडली त्याची पूर्ण ओळख भाषांतरकाराला असणे आवश्यक आहे. ही भाषांतरे कोणत्या वाचकांसाठी आहेत, हे लक्षात घेऊन करायला हवीत. मूळ लेखकाच्याच संस्कृतीतील, एकाच भाषागोत्रातील भाषा बोलणाऱ्यांसाठी असतील, तर प्रश्न सुकर होतो. सांस्कृतिक संदर्भ सहज कळतात. पण पाश्चात्त्य संस्कृतीमधील वाचकांना संदर्भ स्पष्ट करून भाषांतर करावे लागते.

आर. के. नारायण यांच्या इंग्रजी निवडक कथा, कादंबरी याचा अनुवाद मधुकर धर्मापुरीकर, उल्का राऊत, सरोज देशपांडे यांनी केला आहे. 'मालगुडी डेज', 'स्वामी ॲण्ड फ्रेंड्स', 'दि गाईड', 'द इंग्लिश टिचर', 'मालगुडीचा नरभक्षक', 'महात्म्याच्या प्रतिक्षेत' यांच्या भाषांतरामुळे मराठी वाचकांना ग्रामीण भागाचे, सरंजामशाहीचे, पारंपरिक मूल्यांचे व एकूण दक्षिणात्य संस्कृतीचे दर्शन घडते.

सतीश आळेकरांचे 'महानिर्वाण' हे नाटक गौरी देशपांडे यांनी इंग्रजीमध्ये करताना शब्दार्थनिष्ठ, संदेशननिष्ठ अनुवाद पद्धतीचा वापर करून 'अमेरिकन इंग्लिश'मध्ये अनुवाद केला आहे. या नाटकातील भाषाभिन्नतेची समस्या आणि सांस्कृतिक भिन्नतेची समस्या सोडविण्यासाठी कार्यात्मक सममूल्याचा अवलंब केला आहे. मराठी संस्कृतीचे अनेक संदर्भ नाटकातून येतात. उदा. पिंड, काकड आरती, अग्निनारायण, कीर्तनकार, सप्तपदी या संस्कृतिविशिष्ट शब्दांचा अनुवाद करताना इंग्रजीतील समान परिणाम साधणाऱ्या या शब्दांची योजना केली आहे. वाक्प्रचार, म्हणी ह्या भाषाविशिष्ट असतात. त्यासाठी इंग्रजीमधील समांतर वाक्प्रचारांचा सुंदर उपयोग केला आहे. नाटकातील अभंग, श्लोक, गाणी यांचा अनुवाद करताना गौरी देशपांडे यांनी मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य घेतले आहे.

### १अ. २.२.३ मर्यादा

सांस्कृतिक भिन्नतेमधून अनुवाद करताना काही मर्यादा पडतात. पिंडाला कावळा शिवणे, मडके फोडणे, दहावा, तेरावा, श्राद्धगंगा मुखात घालणे यामधील हिंदू धर्मातील अंत्य संस्काराचे विधीप्रथा, परंपरा यांना जे भारतीय संस्कृतीचे संदर्भ आहेत ते पाश्चात्त्य प्रेक्षक वर्गास कळणे अशक्य आहे. नाटकाशिवाय इतर वाङ्मयप्रकारांचा अनुवाद करताना अनुवादक तळटीपा देऊन असे सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट करू शकतो. परंतु नाटक प्रेक्षकांसमोर सादर करावयाचे असल्याने तळटीपांसारखे वाचकांना उपयोगी पडणारे उपाय अवलंबणे निष्फळ ठरते.

काही वेळा परदेशात नाट्यप्रयोगाच्या आधी नाटकाची पार्श्वभूमी, मुख्य कथासूत्र आणि महत्त्वाचे सांस्कृतिक संदर्भ विशद करणारी छोटी पुस्तिका वाटूनही समस्या सोडविण्याचा

प्रयत्न केला जातो. 'घाशीराम कोतवाल 'या नाट्यप्रयोगासाठी अशा पुस्तिकेचा उपयोग केला जात होता.

१९७० नंतर आजतागायत सुमारे पस्तीस मराठी नाटके इंग्रजीमध्ये अनुवादित झाली आहेत. नाटकाच्या भाषांतरांच्या बाबतीत जे खरे आहे ते कवितेच्या भाषांतराच्या बाबतीतपण खरे आहे. कवितेत कवीची जाणीवपूर्वक अभिव्यक्ती आलेली असते. कवीची शैली, कवितेमधील सूचितार्थ हे सर्व भाषांतरात, अनुवादात स्पष्ट करता येतीलच असे नाही. ज्या भाषेत आणि ज्या संस्कृतीत कविता लिहिली गेली असेल त्या भाषेत आणि संस्कृतीतच सूचितार्थाच्या परंपरा कार्य करीत असतात. त्यामुळे जे सांगितले आहे आणि जे सांगितलेले नाही पण सुचविलेले आहे ते शोधणे हे अनुवादकाचे कर्तव्य असते. इथे सांस्कृतिक, शब्दार्थाचे आव्हान असते. त्यावेळी कवितेतल्या वास्तवाचा आभास निर्माण करण्यासाठी सोप्या भाषेचा वापर केला जातो. त्यामुळे काही वेळा कवितेचे भाषांतरकार पुष्कळदा तिचे बाह्य रूप सादर करण्यावर समाधान मानताना दिसतात किंवा दुसऱ्या भाषेत स्वीकार्य ठरावी यासाठी मूळ कवितेच्या जवळपास जाईल असे ढोबळ रूपांतर करताना दिसतात. विंदा करंदीकरांच्या, मर्ढेकरांच्या कवितांचे भाषांतर करताना सांस्कृतिक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यासाठी गद्यात स्पष्टीकरणे देऊन कंसात शब्दांचा विस्तार, तळटीपा, मथळे अशा अनेक साधनांचा उपयोग करावा लागला आहे.

## आपली प्रगती तपासा.

**प्रश्न- आपल्या वाचनातील मूळ कलाकृती आणि भाषांतरित कलाकृती यातील शब्दांच्या सांस्कृतिक संदर्भांचे महत्त्व पटवून द्या.**

## १.३ सारांश

एकूणच भाषांतर, रूपांतर, अनुवाद आणि अर्वाचीनीकरण या संकल्पना या एकमेकींपेक्षा भिन्न आहेत. त्यातील भेद लक्षात घेऊनच साहित्याचे दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे शक्य होते. तसेच भाषांतर करत असताना त्यातील शब्द किती महत्त्वाचे असतात हेही आपण पाहिले. शब्द आणि त्याचे अर्थ यांचा जो संबंध असतो तो जसाच्या तसा दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण मूळ भाषेतील शब्दाचा जो खोल, अनेकपदरी अर्थ असतो तो लक्ष्य भाषेत वरवर व्यक्त होऊ शकतो. तसेच मूळ भाषेची जी सांस्कृतिक पार्श्वभूमी असते ती दुसऱ्या भाषेची असतेच असे नाही. ही बाब ध्यानात घेऊन त्याचे मूळ अर्थ टिपनाद्वारे देणे ही देखील भाषांतरकाराची गरज असते. तसेच साहित्य प्रकार, भाषेचे नीट आकलन अशा अनेक गोष्टी भाषांतरात महत्त्वाच्या ठरतात.

## १.४ संदर्भग्रंथ सूची


१) 'मराठी भाषास्वरूप आणि उपयोजन' – यशवंत कानिटकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००३.

२) 'भाषांतरमीमांसा' – संपादन – डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९९७.

३) 'अनुवाद, भाषांतर आणि रूपांतर' – संपादक – डॉ. वसंत शेकडे, डॉ. सतीश कामत

४) 'व्यावहारिक मराठी' – संपादक – डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००४ द्वितीया वृत्ती.

५) 'ती फुलराणी' – पु. ल. देशपांडे, मौज प्रकाशन, दहावी आवृत्ती २००९.

६) 'मराठी कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरे' – कल्पना कामत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९१९.

७) 'महानिर्वाण समीक्षा आणि स्मरणे' – संपादक – रेखा इनामदार साने, राजहंस प्रकाशन, पहिली आवृत्ती १९९९.


## १.५ संभाव्य प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) भाषांतर ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

२) भाषांतर म्हणजे काय ते स्पष्ट करून भाषांतराचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

३) भाषांतर आणि अनुवाद यातील साम्य, भेद स्पष्ट करा.

४) ललितसाहित्य कृतींच्या भाषांतराचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

५) 'ललितसाहित्याचे भाषांतरही एक प्रकारची नवनिर्मितीआहे', हे विधान स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) मूलनिष्ठ भाषांतर आणि लक्ष्यनिष्ठ भाषांतर

२) शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतर

३) धार्मिक ग्रंथाचे भाषांतर

४) रूपांतर आणि मराठी नाटक

५) अनुवाद आणि भाषांतर

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भाषांतर म्हणजे काय?

२) रूपांतर म्हणजे काय?

३) मराठीत भाषांतराची सुरूवात कधी झाली?

४) भाषांतर करताना कोणते दोन मुद्दे लक्षात घ्यायचे?

५) अनुवादाची क्षेत्रे कोणती आहेत?

*****

# १ आ

## भाषांतर : सैद्धान्तिक परिचय

**आ .१ ललित साहित्याचे भाषांतर: भाषिक समस्या**

**२. ललित साहित्याचे भाषांतर: शैली विषयक समस्या**

**घटक रचना**


१.१ उद्देश

१.२ प्रस्तावना

१आ.१ ललित साहित्याचे भाषांतर : भाषिक समस्या

१आ.१.१ भाषांतर : भाषिक समस्या - विषय विवेचन

१आ.१.२ भाषांतर आणि साहित्यप्रकार

१आ.१.३ विविध अभ्यासकांची मते

१आ.२ ललित साहित्याचे भाषांतर : शैलीविषयक समस्या

१आ.२.१ ललित साहित्याचे भाषांतर : शैलीविषयक संदर्भांचे महत्त्व

१आ.२.२ शैलीची चार अंगे

१.३ सारांश

१.४ संदर्भग्रंथसूची

१.५ नमुना प्रश्न


## १.१ उद्देश

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील:

१. भाषांतर करत असताना येणाऱ्या भाषिक समस्यांचे ज्ञान होईल.

२. भाषेचे सांस्कृतिक संदर्भ किती महत्त्वाचे असतात आणि भाषांतर करताना त्यामुळे कोणत्या अडचणी निर्माण होतात हे ध्यानात येईल.

३. ललित साहित्याची शैली म्हणजे काय हे कळेल.

४. तसेच ललित साहित्यातील शैलीविषयक समस्यां ध्यानात येतील.

## १.२ प्रस्तावना

स्वतःच्या भाषेत असणाऱ्या साहित्याला अधिक समृद्ध करण्यासाठी काही विचारवंत ज्या साधनांचा मुक्त हस्ते उपयोग करतात, ते साधन म्हणजे भाषांतर. भाषांतराच्या अर्थाने अनेक समानार्थी शब्द रुढ आहेत. रुपांतर, अनुवाद इत्यादी शब्द वापरले जातात. परंतु या शब्दाचा अर्थ भाषांतराच्या जवळ जाणारा असला तरी तंतोतंत जुळणारा नाही. भाषांतराला हिंदीमध्ये अनुवाद तर इंग्रजीत Translation म्हणतात.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रावर ब्रिटिश राज्य आले. त्यानंतर मेकॉले या विचारवंताने पाश्चात्त्य विज्ञान व इंग्रजी भाषा यांचे शिक्षण देणाऱ्या शाळा काढल्या. राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनाने मुद्रण कला सुरु झाली. नियतकालिके, पाठ्यपुस्तके तयार झाली. या सर्व प्रक्रियेतून भाषांतराला एक प्रभावी माध्यम म्हणून मान्यता मिळाली. भाषांतराची प्रक्रिया तशी बरीच जुनी आहे. या भाषांतराच्या प्रक्रियेला स्थलकालाच्या मर्यादा नसतात. अनुभवांचे आत्मनिवेदन किंवा आत्माविष्कार करणे ही माणसाची मूलभूत प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीचा संबंध भाषांतराच्या मुळाशी असून दुसऱ्याचा अनुभव किंवा मनोगत जाणून घेण्याची गरज भाषांतराच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. माणसा माणसांत संपर्क साधण्याचे भाषा एक जसे माध्यम आहे. त्याचप्रमाणे भिन्न भाषांना व भिन्न भाषिकांना एकत्र जोडण्याचे भाषांतर हे एक साधन आहे. म्हणूनच Translation is a bridge to join two gulf streams असे म्हटले जाते.

## १आ.२ भाषांतर : भाषिक समस्या - विषय विवेचन

**"विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा आणि एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर."**

अन्य भाषेत जे सांगितले आहे ते अन्यभाषा बोलणाऱ्याला समजले पाहिजे त्यासाठी भाषांतर हेच एक साधन आहे. जे ज्ञान ग्रीक व लॅटिन भाषेतील ग्रंथात होते ते इंग्रजी भाषेतील ग्रंथात उपलब्ध झाले. आणि इंग्रजीद्वारे ते अन्य युरोपीय व आशियायी भाषांतून व्यक्त झाले आणि स्थानिक व प्रादेशिक भाषांतून व्यक्त होऊ लागले. संस्कृत भाषेतील ग्रंथांची प्राकृत भाषेत भाषांतरे झाली तशीच इंग्रजी व अन्य युरोपीय भाषेत भाषांतरे झाली. भाषांतराची प्रक्रिया ही एका अर्थी मानवी व्यवहारात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे अनिवार्य असते.

लहान मूल प्रारंभी बोलू शकत नाही. परंतु आपल्या शारीरिक हालचालीतून, विभ्रमांतून व आवाजातून स्वतःला व्यक्त करीत असते. त्याच्या प्रकटीकरणाची ती एकाअर्थी सांकेतिक भाषाच असते. ही भाषा जर आईला नेमकी समजली तर तिच्याकडून योग्य प्रतिसाद मिळेल. आईला जर नीट समजली नाही तर प्रतिकूल सादही मिळणे शक्य आहे. मूल रडू लागले तर एक आई म्हणते 'भूक लागली हो बाळाला?' तर दुसरी आई म्हणते, "काय झाल कार्ट्याला बोंबलायला?" एका आईच्या उद्गारातून वात्सल्य प्रकट होते. तर दुसरीच्या उद्गारातून त्रागा प्रकट होतो. याचे एक भाषिक कारण असे की लहान अर्भकाच्या सांकेतिक भाषेचा अर्थ स्वतःच्या भाषेत समजून घेण्याची क्षमता भिन्न भिन्न आहे. एकमेकांना समजून घेण्यासाठी भाषांतर अनिवार्य असते. भाषा अनेक प्रकारच्या असतात. या उदाहरणातील सांकेतिक भाषेप्रमाणेच मौखिक भाषाही असते. तिला लिपी असतेच असे नाही. अनेक आदिवासी जमातीची मौखिक भाषा अजून लिपीबद्ध नाही, पण तिचे भाषांतर करता येणार नाही, असे नाही, किंबहुना भाषांतर करता आले तरच त्या मौखिक भाषेतला अर्थ व आशय समजू शकेल.

वाणीशिवाय भाषा असूच शकत नाही. ज्याला वाणीच नाही त्याला भाषाही नाही. ज्याला वाणी आहे त्याला भाषा असते. भाषा म्हणजे वाणीतून उद्भवणाऱ्या भिन्न घटकांची सुव्यवस्था अथवा अर्थपूर्ण संघटना. हे घटक संकेत किंवा चिन्ह यांच्या रुपातच असतात.

ध्वनी हा मूळ घटक. ध्वनीचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द हा दुसरा घटक आणि शब्दाचा अर्थपूर्ण समूह म्हणजे वाक्य. हा तिसरा घटक. भाषेचे हे घटक असतात. प्रत्येक भाषेत हे घटक असतात. मुक्या माणसाला बोलता येत नाही. त्यामुळे त्याला त्या घटकांचे उपयोजन करता येत नाही परंतु तो बोटांच्या आणि हाताच्या विवक्षित संकेतांनी अथवा खुणांनी अनुच्चारित स्वरुपात हे घटक व्यक्त करीत असतो. ती त्याची सांकेतिक भाषा असते. त्या भाषेतील अर्थ समजण्यासाठी सांकेतिक भाषेचे प्रचलित अथवा प्रमाण भाषेत लिप्यंतर करावे लागते. म्हणजे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाषांतराच्या प्रक्रियेशिवाय मुक्या-बहिऱ्यांच्या बोलण्यातील, त्यांच्या सांकेतिक भाषेतून व्यक्त होणारा आशय समजणार नाही. तरी त्यांनी पाठविलेला संदेशही संकेत आणि संकेतसिद्ध भाषेचे भाषांतर करुनच पोचविला जातो.

सांकेतिक भाषा, बोलभाषा, बोलीभाषा ग्रांथिक वा प्रमाण भाषा अशी भाषेची विविध रुपे आहेत. ही सर्व विचार व्यक्त करण्याची साधनेच आहेत. या विविध भाषारुपातून व्यक्त झालेले विचार अन्य भाषांतून व्यक्त होऊ शकतात. म्हणजे या सर्व भाषांच्या बाबतीत भाषांतर ही प्रक्रिया उपयोजावी लागते. म्हणून भाषा, भाषांतर यांच्यातील हा अनोन्य संबध लक्षणीय आहे. भाषा म्हटली की भाषांतर ओघाने येतेच.

भाषा हे विचार व्यक्त करण्याचे एक साधन आहे. ध्वनी, शब्द आणि वाक्य हे भाषेचे घटक आहेत. हा पारंपरिक विचार यापूर्वी उल्लेखिला आहेच. आधुनिक भाषावैज्ञानिकांना भाषेच्या संबंधातला हा विचार मान्य नाही. सोस्युर हा त्यांच्यापैकी एक आहे. त्याला भाषेचा पारंपरिक विचार मंजूर नाही. म्हणजे भाषेचा इतिहास, भाषेची वैशिष्ट्ये, भाषेचे ज्ञानात्मक-भावात्मक (Conginitive Dentative - Emotive) कार्य इत्यादीत सोस्युरला स्वारस्य आहे. जीवनाच्या वेगवेगळ्या स्तरांवर भाषेचा उपयोग होतो. भाषेची हे सांदर्भिक विशेष नाही. ते त्याला मान्य नाही. कोणत्याही बाह्य वस्तुमुळे भाषेचे स्वरुप निश्चित होत नाही. प्रत्येक भौतिक वस्तूला घडण असते. आधुनिक भाषावैज्ञानिकांच्या मते, भाषा ही एक वस्तूच आहे. आणि भाषेलाही तिची स्वतःची घडण आहे.

सोस्युरचे मत असे की, भाषा ही स्वतःच्या अंतर्गत नियमांनी कार्य करणारी स्वयंपूर्ण व्यवस्था आहे. 'शब्द' हा भाषेचा घटक असला तरी शब्द हे स्वतंत्र चिन्ह आहे. प्रत्येक शब्दचिन्ह हे दुसऱ्या शब्दचिन्हापासून वेगळे असते. आणि वेगळेपणानेच ते निर्धारित होते. सोस्युरचे म्हणणे असे की, भाषेत ही चिन्हे मूलभूत एककासारखी असतात. आणि या मूलभूत एककांची परस्परांशी संबंध असलेली व्यवस्था म्हणजे भाषा. भाषा हा सुद्धा एक घाट आहे. असे सोस्युरचे मत आहे. भाषिक संदर्भात विचार करताना सोस्युरच्या मताचा विचार करणे अपरिहार्य होते.

भाषा या वेगवेगळ्या असतात. प्रत्येक समाजाच्या, समाजातील गटाच्या, पोटजातीतील गटाच्या, पोटजातीच्या भाषा भिन्न भिन्न असू शकतात. आणि म्हणूनच एक भाषा बोलणाऱ्या व्यक्तीला दुसरी भाषा बोलणाऱ्या व्यक्तीशी संवाद साधणे अत्यंत कठीण जाते. एका भाषेतील साहित्यकृती भाषा जाणणाऱ्या अन्य भाषिकाला समजू शकत नाही. इथेच भाषांतर ही संकल्पना आपल्याला आवश्यक ठरते. भाषांतर ही संकल्पना नसेल तर दोन संस्कृतीचे परस्परांशी आदान प्रदान होणार नाही. त्यामुळे मागासलेली संस्कृती मागासलेलीच राहील. खुद्द भारताच्या बाबतीतही हेच घडलेले दिसते. इंग्रज आपल्याकडे

आले. त्यांची भाषा आपण आत्मसात केली. इंग्रजी साहित्य, इंग्रजाचे ज्ञान आपण भाषांतरित करुन घेतले म्हणून आज आपली प्रगती होऊ शकली. भाषांतराची प्रक्रिया झाली नसती तर ज्ञानाची सर्व कवाडे बंदच राहिली असती. विकास खुंटला असता. म्हणून translation is a bridge to join two gulf streams असे यथार्थपणे म्हटले जाते. ट्रान्स म्हणजे पलीकडे. लेशन म्हणजे स्थलांतर. ट्रान्सलेशन म्हणजे दुसरीकडे घेऊन जाणे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जाणे.

भाषांतराच्या लाटा मराठी साहित्याच्या सातशे वर्षाच्या वाटचालीत तीन वेळा येऊन गेल्या बाराव्या, तेराव्या शतकात संस्कृत भाषेतील साहित्य, ज्ञान, वैचारिकता मराठीत आणण्यासाठी संत आणि पंत यांनी बहुमोल कार्य केले. संत ज्ञानेश्वर हे या कार्याचे जनक ठरतात. इंग्रजांच्या आगमनानंतर इंग्रजी साहित्य ग्रंथाशी, संस्कृतीशी परिचय झाल्यानंतर इंग्रजी साहित्याचे मराठीत भाषांतर करण्याची लाट आली. यालाच 'भाषांतर युग' म्हणतात. शेक्सपियर हा पाश्चात्त्य लेखक भाषांतरकारांच्या आवडीस, पसंतीस उतरला. त्याचप्रमाणे इसापनीती, अरबी भाषेतील सुरस गोष्टी अशीही भाषांतरे झाली. अलीकडच्या काळात इंग्रजी तंत्रज्ञान मराठीत आणण्यासाठी तसेच इंग्रजी साहित्य मग ते भारतीयांनी लिहिलेले असेल तरीही त्याचे भाषांतर करण्याची लाट आलेली दिसते. उदा. 'सुटेबल बॉयचे' 'शुभमंगल' हे अरुण साधूंनी केलेले भाषांतर. किंवा मनोहर माळगावकरांच्या 'कान्होजी आंग्रचे' पु.ल. देशपांड्यांनी केलेले भाषांतर. 'प्रिन्सेस'चे भा. द. खेर यांनी केलेले भाषांतर इत्यादी. भाषांतर हा शब्द संस्कृतमध्ये नाही. पण संस्कृतच्या शब्द साधनिकेत तो बसतो. त्याचा अर्थ 'दुसरी भाषा' असा आहे. भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर, त्याचा आशय आणि अभिव्यक्तीजन्य अनुभव यांसह दुसऱ्या भाषेत उतरविण्याची प्रक्रिया. ज्या भाषेत मूळचा मजकूर असतो तिला 'मूळ भाषा' असे म्हणतात. ज्या भाषेत मजकुराचे भाषांतर करावयाचे असते तिला 'लक्ष्य भाषा' असे म्हणतात.

प्रत्येक भाषेची शब्द, अर्थ, रुप, श्रृती आणि व्याकरण अशी पाच अंगे असतात. ती बदलती म्हणजे भाषा बदलते. भाषांतर करताना ज्या भाषेतून लक्ष्य भाषा साहित्य घेत असते त्या भाषेतील शब्द, रुप, श्रृती आणि व्याकरण हे लक्ष्य भाषेत बदलले जाते. परंतु अर्थ मात्र तसाच राहतो. म्हणजेच मूळ पाठ आणि भाषांतर यांची ऐकू येणारी व दिसणारी रुपे भिन्न असली तरी अर्थ एकच असतो.

'मूलनिष्ठ भाषांतर' आणि 'लक्ष्यनिष्ठ भाषांतर' कधी-कधी भाषांतरामागील उद्देशावरुन भाषांतराचे प्रकार ठरतात. मूळ भाषेतील संहिता शब्दशः समजावून सांगायची हा उद्देश असेल तर संहितेला आपोआप प्राधान्य दिले जाते. अशा भाषांतराला 'मूलनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात. मूलनिष्ठ भाषांतरामध्ये संहितेचे शब्दशः भाषांतर केले जाते. शब्द सामासिक असतील तर त्या समास घटकांचेही भाषांतर करण्याची दक्षता घेतली जाते. 'हरिणाक्षी' या संस्कृत शब्दाचे मराठी भाषांतरात- 'हरीणीच्या डोळ्यासारखे डोळे असणारी स्त्री' असे मुळाला धरुन भाषांतर केले जाते. पण मूळ संहितेची भाषा समजावून सांगण्याचा उद्देश नसेल तर मूळ संहितेच्या आशयाचे लक्ष्य भाषेच्या अंगाने भाषांतर केले जाते. हरिणाक्षी शब्दाचे भाषांतर 'सुंदर डोळ्याची स्त्री' असे केले जाते. याला 'लक्ष्यनिष्ठ भाषांतर' म्हणतात. भाषांतराचा भाषिक संदर्भात विचार करताना लक्ष्यनिष्ठ भाषांतराचा विचार करावा लागतो.

**अनुवाद:** भाषांतर करताना भाषिक संदर्भ महत्त्वाचे असतात.

प्र.ना. परांजपे - यांनी म्हटले आहे की, “अनुवादकाची मातृभाषा कोणती आहे व कोणत्या भाषेत अनुवाद करीत आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. एखाद्या परकीय भाषेवर मातृभाषेइतके प्रभुत्व असणे ही गोष्ट फारच अवघड आहे. एखाद्या भाषेचे आपल्या असलेले अबोध ज्ञान (Complence) व तिचा आपण करीत असलेला प्रत्यक्ष वापर (performance) यात खूप फरक असतो.”

भाषांतर आणि अनुवाद या दोन्ही संज्ञा हल्ली समानार्थी म्हणून वापरल्या जातात. अनुवाद या शब्दाचा मौखिक अर्थ एखाद्याच्या मागून बोलणे असा आहे. हे बोलणे दोन्ही प्रकारचे असू शकते. एखाद्याचे बोलून झाल्यावर प्रत्युत्तरादाखल बोलणे आणि एखाद्याच्या किंवा स्वतःच्या बोलण्याची पुनरावृत्ती करणे.

अनुवाद या शब्दाला स्वतंत्र पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे. वैदिक वाङ्मयामध्ये धार्मिक कृत्यातील निरनिराळ्या कृती करण्याचे आदेश ज्यातून दिलेले असतात. अशा मजकुराला विधिवाक्ये असे म्हणतात. आणि विधिवाक्याचे विवरण करणाऱ्या मजकुराला ‘अनुवाद’ असे म्हणतात. विधिवाक्यात एकदम नवा मजकूर असल्याने त्याला विशेष महत्त्व असे. अनुवादामध्ये विधिवाक्यातील मजकुरांची पुनरावृत्ती असल्याने त्याला गौणत्व देण्यात येत असे. ‘विधिवहितस्य अनुक्चनम् अनुवादः । न अनुवादपुनरुकत्योः विशेषः शब्दाभ्यासोपते न्यायसुत्र विध्यनुवाद्योः विधिन्यीयान् अपुर्वार्थप्रकल्पात इति’ (शंकराचार्य) सध्या आपण अनुवाद उपयोग जवळजवळ याच अर्थाने करतो.

पूर्व सिद्ध मजकुराचे स्पष्टीकरण, विवरण अथवा विस्तार म्हणजे अनुवाद होय. मोल्सवर्थच्या कोशात Respecting another’s Speech or one's own tautology असे त्याचे अर्थ दिले आहेत. आपट्यांच्या संस्कृत कोशात Repetition repetition by way of explanation illustration or corroboration, explanatory repetition or reference to what is already mentioned such as paraphrase or free translation असे त्याचे अर्थ आहेत. दात्यांच्या शब्द कोशात त्याचे ‘पुन्हा-पुन्हा सांगणे’, ‘पाठ करणे’, ‘स्पष्ट करणे’ असे अर्थ दिले आहेत. हे सर्व अर्थ भाषांतर या शब्दाच्या रुढ अर्थापेक्षा खूप व्यापक आहेत. त्यामध्ये घोकंपट्टी, पद्य रुपांतर टीका इत्यादी सर्व प्रकारांचा समावेश होतो. यावरुन अनुवाद ही संज्ञा तुलनेने खूपच व्यापक आहे असे दिसते.

अनुवादाचे दोन प्रकार पडतात. १) भाषिक अनुवाद २) अनेक भाषिक अनुवाद. मल्लीनाथाची टीका योगवसिष्ठावरुन तयार झालेले ‘योग विसष्ठासार’, ‘लघुयोगवसिष्ठसार’. (शंकराचार्य) निरनिराळ्या भारतीय भाषांमधून झालेली रुपांतरे. हे सर्व भिन्न भाषिक अनुवाद होत. या भिन्न भाषिक अनुवादांनाच व्यापक अर्थाने भाषांतर असे म्हणता येईल.

अनुवाद ही व्यापक संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावणारी, तिचा एका प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे. भाषांतर हाही अनुवादच असल्याने त्यातही सारांश, विस्तार, स्पष्टीकरण, गद्य रुपांतर इ. प्रकार संभवतात.

**एक भाषिक अनुवाद** | **भिन्न भाषिक अनुवाद**

**आशयनिष्ठ**
**आशय रुपनिष्ठ**

**मूलनिष्ठ भाषांतर**
**लक्ष्यनिष्ठ रुपांतर**

एक भाषिक अनुवादामध्ये केवळ आशयनिष्ठ आणि आशयरुपनिष्ठ असे प्रकार संभवतात. ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभावावर एकोणिसाव्या शतकात हंसराज स्वामींनी समओवी टीका लिहिली. त्यात त्यांचा सर्व भर ज्ञानेश्वरी ओवीचा आशय स्पष्ट करुन तिच्यातील तत्वज्ञान सुबोध करण्यावर आहे. तर कविवर्य विंदा करंदीकरांनीही विसाव्या शतकात ज्ञानेश्वरीचे अर्वाचीनीकरण केलेले आहे. विंदाचा प्रयत्न ज्ञानेश्वरांच्या मूळ कृतीच्या आशय सौंदर्यानुभवासकट वाचकांपर्यंत पोहचविण्याचा आहे. हंसराज स्वामींच्या अनुवादाला आशयनिष्ठ शब्दानुवाद आणि विंदा करंदीकरांच्या अनुवादाला शैलीनिष्ठ शब्दानुवाद म्हणण्यात येईल.

एका भाषिक अनुवादामध्ये सहसा न आढळणारा एक प्रकार भिन्न भाषिक अनुवादामध्ये आढळतो. तो म्हणजे एका भाषेतील संहितेचा अर्थ शब्दशः दुसऱ्या भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे. या मूलनिष्ठ अनुवादाला रुढ अर्थाने भाषांतर म्हणण्याचा प्रघात आहे. भिन्नभाषिक अनुवादातील सारांश, विस्तार, स्पष्टीकरण, गद्य रुपांतर, पद्य रुपांतर या लक्षनिष्ठ प्रकारांना रुपांतर म्हणण्याचा प्रघात आहे.

रुपांतर, भाषांतर म्हणजे मूळ साहित्यकृतीची अथवा अन्य मजकुराची लक्ष्य भाषेत शब्दशः केलेली प्रतिनिर्मिती होय. पण ज्यावेळी व्यावहारिक कारणांमुळे मूळ संहितेची शब्दशः प्रतिनिर्मिती शक्य नसते त्यावेळी लक्ष्यभाषेत फक्त तिचा स्थूलाशय आणण्याचा प्रयत्न केला जातो त्याला ‘रुपांतर’ असे म्हणतात. रुपांतराचा उद्देश मूळ कृतीचा मुळातला विस्तार टाळून लक्ष्य भाषेत तिची सुटसुटीत प्रतिनिर्मिती करणे हा असतो, त्यामागे कित्येक वेळा रंजनात्मकेचाही उद्देश असतो. प्राचीन पुराण कथांमधील कंटाळवाणा तपशील कमी करुन लक्ष्यभाषेत जी सुटसुटीत आख्यान काव्ये निर्माण केली जातात त्यामध्ये कित्येक वेळा रंजनात्मकतेचा उद्देश असतो. म्हणजे मूळ कृतीतील परकीय अथवा अपरिचित वातावरण बदलून लक्ष्यभाषकांना रुचेल, भावेल, मानवेल अशाप्रकारे ती त्याच्यासमोर सादर करणे हा होय. यामध्ये लक्ष्यभाषा भाषकांच्या संस्कृतीचा पेहेराव, मूळ कृतीचा सर्व तोंडवळाच बदलला जातो. देवलांनी शेक्सपीअरच्या ‘ऑथेल्लोचे’ रुपांतर ‘झुंझारराव’ या नाटकात केले. प्राचीन मराठी वाङ्मयात आध्यात्मिक ग्रंथ रामायण, महाभारत इ. ग्रंथाची मुख्यतः रुपांतरेच झाली आहेत. दुसऱ्या भाषेतील साहित्यकृतीची ही रुपांतरे असल्यामुळे व्यापक अर्थाने त्यांना भाषांतर असेही म्हटले जाते. एखाद्या संस्कृतीची वाङ्मयीन जडणघडण करण्यात भाषांतराइतकीच रुपांतरेही महत्त्वाची असतात.

नेहमीच्या वापरात भाषांतर हा शब्द प्रचलित असल्यामुळे भाषांतर, अनुवाद आणि रुपांतर यांच्या अर्थाच्या दृष्टीने बऱ्याच वेळा गफलत केली जाते. भाषांतर आणि रुपांतर हे भिन्न भाषिक अनुवादाचे दोन उपप्रकार आहेत हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

भिन्न भाषिक अनुवादामध्ये आपण जसे रुपांतर आणि भाषांतर असे प्रकार केले त्याप्रमाणे एक भाषिक अनुवादामध्येही केवळ आशयनिष्ठ आणि आशयरुपनिष्ठ असे प्रकार संभवतात. ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर एकोणिसाव्या शतकात हंसराजस्वामीनी समओवी टीका लिहिली आहे. कविवर्य विंदा करंदीकरांनीही विसाव्या शतकात अलीकडे त्याचे अर्वाचीनीकरण केलेले आहे. ज्ञानेश्वरांची भाषा एकोणिसाव्या शतकात दुर्बोध झाल्यामुळेच हंसराजस्वामींनी समकालीन भाषेत तिचा अनुवाद केला. तो समओवी अनुवाद असून जवळजवळ शब्दशः केलेला आहे. पण हंसराजस्वामीपेक्षा त्यांचा त्यामागचा उद्देश वेगळा आहे. हंसराजस्वामींचा सर्व भर ज्ञानेश्वरी ओवीचा आशय स्पष्ट करुन तिच्यातील तत्त्वज्ञान सुबोध करण्यावर आहे. तर विंदा करंदीकरांचा प्रयत्न ज्ञानेश्वरांच्या मूळ कृतीचा आशय त्याच्या सौंदर्यानुभवासह वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा आहे.

भाषांतराचा विचार करत असताना भाषिक संदर्भांची विविध अंगानी चर्चा केली जाते. भाषांतर म्हणजे काय? मूळ भाषा, लक्ष्य भाषा व त्याचे परस्पर संबंध, भाषेतील चिन्हीकरण आणि त्यातील यादृच्छिकता, भाषांची चिन्हे, वाक्प्रयोग, भाषेचे घटक, भाषेची व्याकरणिक अवस्था इत्यादी घटकाचा विचार भाषिक संदर्भात केला जातो. आणि या भाषिक घटकाचा विचार केल्यावर भाषांतराची संकल्पना अधिकाधिक स्पष्ट होत जाते.

भाषांतराची सर्वसामान्य कल्पना म्हणजे एका भाषेतला आशय दुसऱ्या भाषेत प्रतिनिर्माण करणे ही होय. पण सर्जक भाषांतर हे केवळ आशयाच्या प्रतिनिर्मितीपाशी थांबत नाही. त्यात फक्त आशयाची प्रतिनिर्मिती नसते तर संपूर्ण सौंदर्यानुभवाची प्रतिनिर्मिती करण्याचा प्रयत्न असतो. त्यासाठी या सौंदर्यानुभवाचे घटक निश्चित करुन भाषांतरात प्रतिनिर्मिती करण्याचा प्रयत्न असतो. त्यात ध्वनीयोजना, शब्दयोजना, वाक्यरचना, वाक्प्रचार, म्हणी, सांस्कृतिक शब्द, सामाजिक संकेत, उपमा, अलंकार, प्रतिमाने, छंद प्रकार इ. चा समावेश होतो.

छंदशास्त्र, साहित्य शास्त्र, चिन्ह मीमांसा, लोक विद्या व लोक साहित्य, भाषिक दृष्टिकोन, सांस्कृतिक इतिहास अशा विविध क्षेत्रामध्ये त्याला गती होती आणि सर्वच क्षेत्रांमधील त्याचे कार्य मौलिक स्वरुपाचे आहे. भाषेविषयी सैद्धांतिक पातळीवर नवीन आणि व्यापक स्वरुपाची तत्त्वे मांडणाऱ्या पाश्चात्त्य परंपरेतल्या विचारवंतांची जी यादी जार्ज स्टायनरने दिलेली आहे तिच्यात याकोबसनचा अंतर्भाव आहे. प्लेटो, विको, विल्हेम, व्हॉन, हंबोल्ट, कोलरिज, सोस्यूर, याकोबसन अशी भाषिक विचाराची परंपरा स्टायनर मानतो.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून सुरु झालेल्या युरोपीय भाषाभ्यासाच्या परंपरेतील एक अग्रणी म्हणून याकोबसनचे स्थान वादातीत आहे. एकोणीसशे साठ नंतरच्या अमेरीकन भाषाविज्ञानावर, फ्रान्समध्ये सुरु झालेल्या सरंचनावादी चिन्ह मीमांसेवर त्याच्या लेखनाचा सखोल ठसा उमटलेला जाणवतो. अनेक भाषा जाणणारा तो भाषिक विद्वान होता. याकोबसनच्या चौफेर कार्याचा परिचय करुन घेणे अवघड आहे. मात्र त्याच्या काही महत्त्वाच्या पैलूंचा येथे उल्लेख करायला हवा.

१) स्वनिमिक, सिद्धांतामध्ये क्रांती घडवून आणणाऱ्या “स्वनिम” या संकल्पनेसंबंधीची युरोपीय भूमिका “व्यवच्छेदक घटक” या कल्पनेच्या साहाय्याने मांडण्याचे मुख्य श्रेय याकोबसनला देण्यात येते. “द्विपर्यायित्व" की “द्विपैलूत्व” (binarism) या तत्त्वाची मांडणी व पाठपुरावा त्याने स्वनिमिक पातळीवर तसेच भाषिक संरचनेच्या इतर पातळ्यांवरही केला.

२) रशियन भाषेतील पदिम विचारात विभक्ती प्रत्ययांचा विचार अर्थापासून वेगळा काढून संस्थात्मक पातळीवर करण्याचे महत्त्वाचे पाऊल याकोबसनने प्रथम उचलले.

३) भाषिक संरचनेत अन्वयनिष्ठ (Synatagmatic) आणि गणनष्ठ (Bradigamatic) असे दोन पैलू असतात. या सोस्यूर प्रणीत तत्त्वाचे उपयोजन त्याने प्रथम भाषिक अर्थ संघटनेच्या संदर्भात केले आणि त्याच्या आधारे वाचाभंगाच्या दोन प्रकारांचे विश्लेषण केले.

४) अन्वयनिष्ठ आणि गणनिष्ठ या भाषिक संरचनेच्या दोन पैलूचे उपयोजन साहित्याच्या अभ्यासात कसे होऊ शकते यावर त्याने केलेले लेखन हा आधुनिक शैली विज्ञानातला फार महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या दोन पैलूंचाच आविष्कार साहित्य भाषेच्या अर्थसंघटनेच्या संदर्भात होत असतो व त्यातून सान्निध्यनिष्ठ आणि रुपकनिष्ठ अशा दोन प्रकारच्या अर्थाच्या संघटना तयार होत असतात. त्याच्या विचाराने साहित्याच्या चिन्ह मीमांसेमध्ये बहुमोल भर घातलेली आहे. (Linguisties and roetics in sebeak) या विचाराचा अधिक विस्तार पुढे डेविडलॉज या ब्रिटिश अभ्यासकाने the modes of modern writing या ग्रंथात केलेला आहे.

५) भाषेच्या विविध कार्यांचे वर्गीकरण करण्यासाठी त्याने मांडलेली संकल्पनात्मक चौकट ही सुद्धा चिन्हमीमांसा आणि भाषेचा कार्यलक्ष्यी अभ्यास या क्षेत्रामध्ये मूलभूत स्वरुपाचा ठरलेला आहे. पारंपरिक भाषिक विचारात केवळ वर्णनात्मक आणि भावव्यंजक अशी दोनच कार्ये नोंदविलेली होती आणि वर्णनात्मक कार्य हे सर्जनशील काव्यात घडत असते. वर्णनात्मक कार्य हे ‘शास्त्रीय गद्यात’, तर भावव्यंजक कार्य हे ‘सर्जनशील काव्यात’ घडत असते. अशी सुलभ विभागणी आय. ए. रिचर्डससारख्या आधुनिक इंग्लीश समीक्षकानेही केलेली आहे. याउलट याकोबसनने परिणामलक्ष्यी, संदर्भलक्ष्यी चिन्ह, व्यवस्थालक्ष्यी आणि सौंदर्यलक्ष्यी अशी मांडणी केली.

थोडक्यात सोस्यूरच्या संरचनात्मक आणि चिन्ह मीमांसात्मक तत्त्वांना कार्यलक्ष्यी आणि सौंदर्यलक्ष्यी तत्त्वाची जोड देणे, तसेच भाषिक आणि साहित्यिक अभ्यासाच्या युरोपीय आणि अमेरिकन परंपरांना परस्परसंपर्कात आणणे हे याकोबसनच्या भाषिक संशोधनाच्या व सिद्धांतनाच्या कार्याच्या गाभ्याचे पैलू म्हणता येतील.

याकोबसनच्या भाषांतरावरील लेखात दोन प्रमुख तत्त्वाची चर्चा केलेली आहे. एक म्हणजे भाषेची चिन्हात्मकता तर दुसरे भाषांतरणीयता. भाषांतराची आणि भाषिक अर्थाची संकल्पना याकोबसनने चिन्ह मीमांसात्मक तत्त्वाच्या साहाय्याने मांडलेली आहे. आणि भाषांतरणीयता या तत्त्वाची चर्चा काव्याच्या भाषांतराच्या संदर्भात केलेली आहे. या सर्व चर्चेमध्ये अनेक पारंपरिक कल्पनांचा व भूमिकांचा प्रतिवादही याकोबसनने केलेला आहे.

भाषा म्हणजे वास्तवाची एक प्रकारची प्रतिकृती व प्रतिबिंब असते. हा विचार प्लेटो ऑरिस्टॉटलपासून सुरु होऊन थेट रसेल आणि विट्गिन्श्टाइनचे प्रारंभीचे लेखन यांच्यामार्फत चालत आलेला आहे. हा पारंपरिक तत्त्वाज्ञानामधील विचार नाकारुन भाषा ही एक चिन्हव्यवस्था असते, हे आधुनिक भाषा विज्ञानातील आणि चिन्ह विचारातील मूलभूत प्रमेय याकोबसनने वापरलेले आहे. एखादा शब्द आपल्याला समजतो म्हणजे त्याचा "अर्थ" आपल्याला समजतो. अर्थ म्हणजे प्रत्यक्ष वस्तू नसून त्या शब्दाचे जे ध्वनिरुप असतो- यांच्यातील नाते वा संबंध होय. (ज्याला चिन्ह विचारात चिन्ह म्हणतात- त्याचा आणि त्या शब्दाने वास्तवातील ज्या वस्तूचा निर्देश होतो - याला 'चिन्हित' म्हणतात.) भाषिक चिन्हांच्या बाबतीत हा संबंध संकेतनिष्ठ व यादृच्छिक असतो. म्हणजे चिन्हकांच्या स्वरुपावरुन चिन्हांचे अनुमान करता येण्यासारखे नसते. कारण चिन्हक व चिन्हीत यांच्यात शारीर साधर्म्यही नसते. किंवा कार्यकारण संबंधही नसतो. त्यामुळे केवळ वस्तुचा अनुभव घेतला की शब्दाचा अर्थ आपोआप समजतो, हे पारंपरिक गृहीत कृत्य भ्रामक आहे. भाषा म्हणजे अशा संकेतनिष्ठ व यादृच्छिक चिन्हक-चिन्हीत संबंधांची व्यवस्था होय. तेव्हा या संबंधांचे ज्ञान असल्याशिवाय भाषिक चिन्हांचा अर्थ समजणार नाही.

तत्त्वज्ञानामध्ये 'दर्शक व्याख्या' (ostensive definition) म्हणून व्याख्येचा एक प्रकार उल्लेखिला जातो. परंतु याप्रकारे केवळ बोट दाखवून भाषिक चिन्हाची व्याख्या देता येणार नाही, असा आक्षेप याकोबसनने येथे घेतलेला आहे. याचे कारण असे की, व्याख्या करण्यासाठी जी बोट दाखवण्याची क्रिया वापरलेली आहे ती काही चिन्हांतीत क्रिया मानता येणार नाही. काही संस्कृतीमध्ये बोट दाखविण्याच्या क्रियेलाच एक चिन्हात्मकता (उदा. तिला अशुभकारक मानणे) प्राप्त झालेली असते. तेव्हा भाषा आणि वास्तव यांच्या संबंधाविषयीचा आणि भाषिक अर्थ विषयीच्या पारंपरिक विचाराला येथे याकोबसनने आव्हान दिलेले आहे.

याकोबसनच्या विचारांमागे सोस्यूर प्रणीत चिन्हविचार तर आहेच, परंतु या लेखामध्ये सी. एम. पिअर्स (१८३९-१९१४) या अमेरीकन तर्कशास्त्रज्ञाच्या काही तत्त्वाचाही त्याने वापर केलेला आहे. हे स्पष्ट दिसते. कोणत्याही चिन्हाचा अर्थ समजून घेताना पुन्हा अपरिहार्यपणे चिन्हेच वापरावी लागतात, हे पिअर्सच्या चिन्हमीमांसेमधील मूलभूत तत्त्व याकोबसन मांडतो. भाषांतर हे व्यापक अर्थाने चिन्हमीमांसेमधील मूलभूत तत्त्व याकोबसन मांडतो. भाषांतर ही व्यापक अर्थाने चिन्हांतराचीच प्रक्रिया असते. भाषेचा सर्वसामान्य वापर असो वा भाषा वैज्ञानिक असो दोघांनाही चिन्हांतरणाची प्रक्रिया वापरावीच लागते.

चिन्हांतरण ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी याकोबसनने चिन्हांतराचे तीन प्रकार मानले आहेत. एकाच भाषेत चिन्हांतर होऊ शकते. उदा. १.मराठीच्या शब्दकोषात मराठी शब्दाचे अर्थ इतर मराठी शब्दात सांगितलेले असतात. २.एका भाषेतून दुसऱ्या भाषेत चिन्हांतर होते. याला साधारणतः भाषांतर म्हटले जाते. ३.शिवाय एका चिन्हव्यवस्थेमधून (उदा. चित्र) दुसऱ्या चिन्ह व्यवस्थेमध्ये (त्या चित्राचे विवरण भाषेत करणे) चिन्हांतर होऊ शकते.

वास्तव हे नेहमी चिन्हांकित होऊनच आपल्या अनुभवाचा विषय बनत असेल तर एका भाषेतून दुसच्या भाषेत चिन्हांतरण वा भाषांतरण संभवतच नाही. असा विचार साहजिकच

पुढे येऊ लागतो. आधुनिक भाषाविज्ञानात या प्रकारचे 'अभाषांतरणीयते' चे तत्त्व एडवर्ड सपीर आणि बेंजमिनली बोर्फ यांनी भाषा व सांस्कृतिक वास्तू यांच्या संदर्भात मांडलेले आहे. त्याच्या भूमिकेला भाषिक सापेक्षतावाद linguistic relativism असे नाव आहे. भाषेच्या व्याकरणिक घडणीमुळे वास्तवाच्या घडणीचे ज्ञानही निश्चित होत असते. आणि प्रत्येक भाषेची व्याकरणिक घडण भिन्न असल्यामुळे भाषांतर हे मुळातच अशक्य असते, या अतिरेकी सापेक्षतावादी भूमिकेचा प्रतिवाद याकोबसनने केलेला आहे. भाषाभाषांमधील व्याकरणिक भिन्नत्वावर अतिरेकी भर दिल्याने सापेक्षतावादी भूमिका निर्माण होते. याकोबसनची स्वतःची भूमिका साधारण्य आणि भिन्नत्व यांना योग्य तो न्याय देणारी आहे. मानवाचा ज्ञानात्मक अनुभव व त्याचे वर्गीकरण म्हणजेच वास्तवाचा अनुभव व त्याचे वर्गीकरण यांचे मूलभूत स्वरुप सार्वत्रिक असते असे याकोबसन मानतो. भाषांच्या व्याकरणिक घडणी भिन्न असल्या तरी त्यांचा मानवी ज्ञानात्मकतेशी थेट संबंध असत नाही. कारण व्याकरण हे काही वास्तवाची प्रतिकृती वा प्रतिबिंब असत नाही. वास्तवासंबंधीचे सामान्य स्वरुपाचे सममूल्यत्व सापडू शकते आणि त्यावरच भाषांतर अवलंबून असते.

**बर्ट्रांल्ड रसेल** याच्या मते, “चीज” या खाद्यपदार्थाशी अभाषिक परिचय असल्याशिवाय चीज हा कोणालाही समजणार नाही. परंतु रसेलच्या मूलभूत तत्त्वाचा आपण पाठपुरावा केला आणि पारंपरिक तत्त्वज्ञानात्मक समस्यांच्या भाषिक पैलूवर भर दिला तर मात्र आपल्याला असे म्हणावे लागेल की इंग्लिश भाषेच्या शब्द व्यवस्थेमध्ये चीज या शब्दाला कोणता अर्थ मिळालेला आहे. याची माहिती असल्याखेरीज हा शब्द कोणालाही समजणार नाही. ज्या खाद्य संस्कृतीमध्ये चीजचा अभाव आहे अशा संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एखाद्या माणसाला चीज हा इंग्लिश शब्द समजायचा असेल तर एक म्हणजे त्याचा इंग्लिश मधील अर्थ 'दह्यावर दाब देऊन बनविलेला खाद्यपदार्थ' असा होता, हे माहिती हवे, आणि दुसरे म्हणजे, दही या शब्दांशी त्याचा निदान भाषिक परिचय तरी असायला हवा. सुधा किंवा अमृत यांचे आपण कधीच प्राशन केलेले नसते. 'सुधा' 'अमृत' आणि मिथ्यकथांतून या गोष्टीचे प्राशन करणारे देव या शब्दाशी आपला फक्त भाषिक परिचय असतो. आणि असे असूनही हे शब्द आपल्याला समजतात. आणि त्याचे उपयोजन कोणत्या संदर्भामध्ये करायचे याचे ज्ञानही आपल्याला असते.

'चीज', ‘सफरचंद', 'अमृत', 'परिचय', ‘परंतु', ‘केवळ' हे शब्द या किंवा इतर कोणताही शब्द वा शब्द प्रयोग घ्या. त्यांचा अर्थ हे एक भाषावैज्ञानिक तथ्य आहे, किंवा अधिक नेमकेपणे व अधिक व्यापक पातळीवर बोलायचे तर ते एक चिन्ह वैज्ञानिक तथ्य आहे. काही मंडळी चिन्हाला अर्थ देण्याऐवजी प्रत्यक्ष वस्तूलाच अर्थ देऊ पाहतात. त्यांच्याविरुद्ध अगदी सरळ आणि अचूक युक्तिवाद करायचा, तर असे म्हणता येईल की 'चीज' व 'सफरचंद' यांचा अर्थ कधी कोणी हुंगून पाहिलेला नसतो**.** चिन्हार्थ (Signatum) हा चिन्हाशिवाय (Signum) संभवतच नाही चेडर किंवा कॅमम्बेअर (चीजचे दोन प्रकार) यांच्याशी अभाषिक परिचय कितीही असला तरी त्यावरुन 'चीज' शब्दाच्या अर्थाचे अनुमान करता येणार नाही. तसे अनुमान करता येण्यासाठी भाषिक व्यवस्थेची मदत घ्यावीच लागेल. एखाद्या अपरिचित शब्दाची ओळख पटायची असेल, तर भाषिक चिन्हाचा एक ताफाच उभा करावा लागतो. 'चीज' हे एका विशिष्ट नमुन्याचे नाव आहे की कॅमम्बेअरच्या कोणत्याही चीज खोक्याला चीज म्हणतात. कॅमम्बेअर या विशिष्ट प्रकारचेच नाव चीज आहे की कोणत्याही चीज

प्रकाराला चीज म्हणतात. चीज म्हणजे दुधापासून बनवलेला कोणताही खाद्यपदार्थ की अल्पोहारातील कोणत्याही पदार्थ की, आत काहीही असलेला एखादा खोका म्हणजे चीज, याचा उलगडा नुसते बोट दाखवून होणार नाही. किंबहुना सरतेशेवटी पुढील प्रश्नही विचारता येईल. शब्द हा एखाद्या विशिष्ट वस्तूचे केवळ नाव असतो. अर्पण करणे, विकणे, निषिद्ध ठरविणे, शाप देणे यांसारख्या अर्थाचे सूचनही त्यातून होत असते. बोट दाखविणे या क्रियेतून शाप देण्याचा अर्थही खरे पाहता व्यक्त होऊ शकतो. काही संस्कृतीमध्ये, विशेषतः अफ्रिकेमध्ये बोट दाखविणे ही क्रिया अशुभकारक आहे.

भाषा वैज्ञानिकाच्या दृष्टीने तसेच सर्वसामान्य भाषकाच्या दृष्टीने कोणत्याही भाषिक चिन्हाचा अर्थ म्हणजे त्या भाषिक चिन्हाचे इतर कोणत्या तरी वेगळ्या पर्यायी चिन्हाच्या द्वारे केलेले भाषांतर होय. चिन्हाचे सखोल मर्म जाणून घ्यायचा प्रयत्न करणारा सर्वश्रेष्ठ अभ्यासक पिअर्स याने वारंवार असे प्रतिपादन केलेले आहे, की या वेगळ्या पर्यायी चिन्हामध्ये ते (मूळ) चिन्ह अधिक विकसित होत असते. बॅचलर या चिन्हाचे अधिक सुस्पष्ट विवरण हवे असेल, तेव्हा 'अन्-मॅरीड मॅन' या चिन्हात त्याचे भाषांतर करता येईल. वाचिक चिन्हाच्या अर्थ विवरणाचे तीन विभिन्न प्रकार दाखविता येतील. मूळ चिन्ह हे त्याच भाषेतील इतर चिन्हामध्ये चिन्हांतरित होऊ शकेल, वेगळ्या भाषेतील चिन्हांत चिन्हांतरित होऊ शकेल किंवा वेगळ्या, अ-वाचिक चिन्हांच्या व्यवस्थेमध्ये त्याचे चिन्हांतरण होऊ शकेल. भाषांतराच्या या तीन प्रकारांना वेगळी नावे द्यायला हवीत.

१) भाषांतर्गत भाषांतर किंवा वेगळ्या शब्दांत पुनर्मांडणी. (re*w*arding), २) आंतरभाषीय भाषांतर किंवा खरेखुरे भाषांतर (Translation Proper) ३) आंतरचिन्ह व्यवस्थानिष्ठ भाषांतर किंवा चिन्हांतरण (Transmulation) म्हणजे वाचिक चिन्हाचे अवाचिक चिन्ह व्यवस्थेच्या साहाय्याने केलेले अर्थविवरण.

एखाद्या शब्दाच्या भाषांतर्गत भाषांतरामध्ये साधारण समानार्थी असा दुसरा शब्द वापरलेला असतो. किंवा आडवळणाने अप्रत्यक्ष अर्थ सूचन केलेले असते. परंतु तत्त्वतः समानर्थता म्हणजे अर्थाचे संपूर्ण समतुल्यत्व असू शकत नाही उदाहरणार्थ, ब्रह्मचर्य पाळणारा प्रत्येक जण अविवाहित असतो. पण अविवाहित असणारा प्रत्येक जण ब्रम्हचर्य पाळणारा असेल असे नाही एखाद्या शब्दाचे, थोडक्यात म्हणजे शब्द व्यवस्थेमधील उच्चतम पातळीवरील एकक चिन्हाचे, अर्थ विवरण करताना कधी-कधी अनेक एकक चिन्हाची योजना करावी लागते, म्हणजेच त्या घटकाचा निर्देश करणारा (अनेक शब्दांची योजना करणारा) संदेशच हे अर्थविवरण करु शकतो. (Every bachelor is an unmarried man, and ever*y* unmarried man is a bachelor) किंवा प्रत्येक ब्रह्मचाऱ्याने लग्न न करण्याचे बंधन पाळले पाहिजे आणि लग्न न करण्याचे बंधन ज्याच्यावर आहे तो प्रत्येक जण ब्रह्मचारी असतो.

हाच प्रकार आंतरभाषीय भाषांतराच्या पातळीवरही घडतो. येथे ही भाषिक व्यवस्थांच्या एकक-चिन्हांमध्ये संपूर्ण समतुल्यत्व आढळत नाही आणि परक्या भाषा व्यवस्थेतील एकक चिन्हांचे वा संपूर्ण संदेशाचे अर्थ विवरण पर्याप्तपणे देण्यासाठी (आपल्या) भाषेत संपूर्ण संदेशच वापरावे लागतात. (म्हणजे शब्दाला शब्द, असे भाषांतर होऊ शकत नाही.) प्रमाण रशियन भाषेत स्थिर हा रुपदृष्ट्या सारखा, परंतु अर्थदृष्ट्या असमान शब्द चीजसाठी

वापरला जातो. परंतु 'चीज' हा इंग्रजी शब्द त्याच्याशी पूर्णपणे एकरुप आहे, असे म्हणता येणार नाही. कारण कॉटेज चीज हा चीजचा प्रकार असला तरी (त्यासाठी सामान्य वापरला जाणारा रशियन शब्द 'स्थिर-cblp-syr') हा मात्र स्थिरचा प्रकार नाही. 'चीज घेऊन ये' असे (इंग्लिशमध्ये विचित्र वाटणारे वाक्य) रशियन माणूस (रशियन भाषेत) म्हणू शकतो. प्रमाण रशियनमध्ये दह्यावर दाब देऊन शिवाय आंबवण्याची प्रक्रिया केलेली असेल, तरच त्या खाद्य पदार्थाला 'स्थिर' म्हणतात.

बहुतेक वेळा मात्र एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करताना एका भाषेतील एकक चिन्हांसाठी दुसऱ्या भाषेतील संदेश, अशी प्रक्रिया घडते. या प्रकारचे भाषांतर हे एखाद्याचे बील प्रत्यक्ष न देता दुसऱ्याने त्याचा तर्जुमा द्यावा (Reported Speech) अशा स्वरुपाचे असते. एखाद्या मूळ संदेशाचे पुनर्चिन्हांकन करुन वेगळ्या भाषेत संदेश पाठविण्याची क्रिया भाषांतरकार येथे करीत असतो. तेव्हा दोन भिन्न चिन्ह व्यवस्थांमध्ये दोन समतुल्य संदेश भाषांतरामध्ये अस्तित्वात येत असतात.

विभिन्नतेमध्ये समतुल्यत्व हा भाषेपुढचा मूलभूत प्रश्न असून भाषा विज्ञानामधील तो एक केंद्रवर्ती स्वरुपाचा विषय आहे. वाचिक संदेशाचे ग्रहण करणारा प्रत्येक जण जसा अर्थ विवरणकार असतो, तसाच भाषा वैज्ञानिक हा सुद्धा अर्थ विवरणकारच असतो. कोणताही भाषिक नमुना जोपर्यंत त्याच चिन्ह व्यवस्थेमधील इतर चिन्हांमध्ये व अन्य चिन्ह व्यवस्थेमधील चिन्हांमध्ये भाषांतरीत होत नाही तोपर्यंत भाषेच्या विज्ञानाला त्या नमुन्याचे अर्थ विवरण करताच येणार नाही. दोन भाषांच्या तुलनेमध्ये त्यांच्या परस्पर भाषांतरणियतेची वा भाषांतरक्षमतेची वा भाषांतर योग्यतेची तपासणी अनुस्यूत असते. आंतरभाषिय संदेशनाची क्रिया विशेषतः भाषांतराच्या रुपात, सर्वदूर पसरलेली आहे व तिच्यावर भाषिक विज्ञानाचा वचक सतत राखणे आवश्यक असते. दोन भाषांमधील व्यवच्छेदक भेद दर्शविणारे द्विभाषिक शब्दकोश तात्त्विकदृष्ट्या तसेच व्यवहारिकदृष्ट्या किती उपयुक्त ठरतात, ते वेगळे सांगायला नको. दोन भाषांत समतुल्य अशा सर्व चिन्ह एककांच्या वाच्यार्थ व लक्ष्यार्थाच्या तुलनात्मक व्याख्या काळजीपूर्वक देणाऱ्या द्विभाषिक शब्दकोशाची फार निकडीचा गरज आहे. त्याचप्रमाणे दोन भाषांमधील व्यवच्छेदक भेद दर्शविणाऱ्या द्विभाषिक व्याकरकाणांनीसुद्धा त्या दोन भाषांमधील व्यवच्छेदक भेद दर्शविणाऱ्या द्विभाषिक व्याकरणांनी सुद्धा त्या दोन भाषा आपापल्या परिने व्याकरणिक संकल्पनाची निवड करीत असतात आणि त्याचे नियमन करीत असतात. ते निश्चित करुन मधून मधून ती गुंतागुंत पार कापून काढायचा प्रयत्न होत असतो. बी.एल.वोर्फ याने स्वभावत:च तर्कशास्त्रज्ञ असणाऱ्या सर्वसामान्य माणसाची कल्पना अत्यंत चित्रमय रीतीने मांडलेला आहे, हा स्वभावत: तर्कशास्त्रज्ञ असणारा सर्वसामान्य माणूस पुढीलप्रमाणे युक्तिवाद करतो. असे मानले जाते, विभिन्न भाषिक पार्श्वभूमी असणाऱ्या भाषिकांना स्वतःच्या पार्श्वभूमीनुसार तथ्यांची घडणच वेगवेगळी झालेली आढळते व त्यामुळे तथ्येही त्यांच्या दृष्टीने वेगवेगळी असतात. रशियन राज्यक्रांतीनंतरच्या पहिल्या काही वर्षामध्ये काही अतिरेकी क्रांतिकारक रशियन नियतकालिकांमधून पारंपरिक भाषेत क्रांतिकारी स्वरुपाचे बदल घडवून आणायला हवेत, असा युक्तिवाद करीत असत, विशेषत: 'सुर्योदय' आणि 'सुर्यास्त' यांसारखे दिशाभूल करणारे वाक्यप्रयोग निपटून काढण्यावर त्यांचा भर असे. या शब्दांच्या मागे ट्रॉलिमीच्या (विश्वरचनेच्या) कल्पनेवर आधारलेल्या प्रतिमा असल्या तरी आपण आजही त्या शब्दांचा वापर करतो आणि तसे करीत असताना

कोपर्निकसचा (विश्वरचनेचा) सिद्धांत काही आपल्याला नाकारायचा नसतो. उगवणाऱ्या आणि अस्ताला जाणाऱ्या सुर्याविषयीच्या आपल्या नेहमीच्या गप्पांचे रुपांतर (सुर्याभोवती) फिरणाऱ्या पृथ्वीच्या चित्रामध्ये आपण सहजपणे करु शकतो. याचे कारण असे, की प्रत्येक चिन्ह भाषांतरणीय असते, कोणत्याही चिन्हाचे भाषांतर आपण आपल्याला अधिक विकसित व अचूक वाटणाऱ्या चिन्हामध्ये करु शकतो.

एखादी भाषा बोलता येण्याच्या शक्तीमध्ये अनुस्यूत असणारी आणखी एक शक्ती असते. ती म्हणजे भाषेविषयी बोलण्याची शक्ती होय. तिच्यामुळेच अतिभाषिक व्यवहार शक्य होतो. आणि आपण जो शब्दसंग्रह वापरत असतो त्याचे परिकरण आणि पुनर्व्याख्या करणे शक्य होते ते नील्स बोर याने दाखवून दिले आहे. सुस्पष्ट असणारा सर्व प्रायोगिक पुरावा सर्वसामान्य भाषेत मांडला गेला पाहिजे, (कारण) या भाषेत प्रत्येक शब्दाचा व्यावहारिक उपयोग आणि त्या शब्दाची अचूक व्याख्या यांचे नाते परस्पर पूरकतेचे असते.

सर्व ज्ञानात्मक अनुभव आणि त्याचे वर्गीकरण हे अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही भाषेत व्यक्त करता येते. येथे शब्दाचा अभाव असेल, तेथे संज्ञा विकसित करता येतात, शब्दांची उसनवारी करणे वा उसनवारी केलेल्या शब्दाचे भाषांतर करणे, किंवा नवे शब्द घडविणे वा असलेल्या शब्दांची अर्थच्यूती करणे आणि अखेरीस आडवळणाची शब्द योजना करुन अर्थसूचन करणे, अशा अनेक मार्गानी या विशिष्ट संज्ञाचे परिष्करण करता येते व त्यांना उठावदार बनविता येते. उदा. ईशान्य सायबेरियातील चक्ची (Chakchee) या जमातीची साहित्यिक भाषा नव्यानेच जन्मलेली आहे. या भाषेत ‘स्क्रू’ साठी ‘फिरणारा खिळा’, ‘स्टील’ साठी ‘कठिण लोखंड’, ‘पत्र्या’साठी ‘पातळ लोखंड’, ‘खडू’ साठी ‘लिहायचा साबण’, ‘हृदय’ साठी ‘धडधडणारे हृदय’ अशा संज्ञा घडविल्या गेल्या आहेत.

Cold beef and Pork hotdoy हा इंग्लिश मधील वाक्यप्रयोग, दुहेरी विरोधाभास असूनही अर्थाच्या दृष्टीने गोंगाट किंवा गडबड-गोंधळ करणारा नाही. त्याचप्रमाणे वर पाहता आत्मघाती वाटणाऱ्या व आडवळणाने अर्थसूचन करणाऱ्या वाक्प्रयोगांमुळेही संदेशवहनात काही अडथळा निर्माण होत नाही. उदा. घोड्याशिवाय चालणाऱ्या ट्रॅमसाठी प्रारंभी रशियन भाषेत ‘विजेची घोडागाडी’ असा शब्दप्रयोग केला जाई, किंवा विमानासाठी ‘कोर्याक’ या भाषेमध्ये ‘उडणारे जहाज’ या अर्थाचा वाक्प्रयोग होतो. या वाक्प्रयोगांतून घोडा-गाडीला समतुल्य असणारा, विजेवर चालणारा पर्याय आणि जहाजाला समतुल्य असणारा हवेत उडणारा पर्याय असे अर्थ प्रतित होतात.

ज्या भाषेत भाषांतर करायचे, तिच्यामध्ये एखाद्या विशिष्ट व्याकरणिक घडणीचा अभाव असला तरी त्यामुळे मूळ भाषेतील मजकुरातील संकल्पनात्मक माहितीचे शब्दशः भाषांतर होणे अशक्य असते, असे मुळीच नव्हे. आणि, व, किंवा या पारंपरिक उभयान्वयी अव्ययांना आणि, वा, किंवा या नव्या उभयान्वयी अव्ययाची जोड आता मिळालेली आहे, याची चर्चा काही वषापूर्वी Federal prose - How to write in, and / or for washing ton या गंमतीदार पुस्तकात आलेली आहे. या तीन अव्ययापैकी फक्त शेवटचे अव्यय सॅम्येड या भाषा समूहातील भाषामध्ये आढळते. उभयान्वयी अव्ययाची यादी वेगवेगळी असली तरी शासकीय गद्यामध्ये Federal prose आढळणारे तीनही प्रकारचे संदेश पारंपरिक इंग्लिशमध्ये, त्याचप्रमाणे सॅम्येड भाषांमध्येही स्पष्टपणे भाषांतरित होऊ शकतात.

शासकीय गद्य १) John and peter. 2) John or peter. 3) John and / or peter will come.

पारंपरिक इंग्लिश Join and peter or one of them will come

सॅम्येड भाषा १) जॉन आणि किंवा पीटर

दोघेही येतील २) जॉन आणि किंवा पीटर यांच्यापैकी एकजण येईल.

एखाद्या भाषेत जर एखाद्या व्याकरणिक प्रवर्ग नसेल, तर शब्दाच्या साहाय्याने त्या व्याकरणिक प्रवर्गाचा अर्थ त्या भाषेत आणता येतो. जुन्या रशियनमधील द्विवचनात्मक अर्थ (दोन या) संख्या वाचक शब्दाचा उपयोग करुन (द्विवचन नसणाऱ्या भाषांमध्ये आणता येतो. मात्र या प्रकारचा व्याकरणिक प्रवर्ग एखाद्या भाषेत नसेल तर त्या भाषेतून तो प्रवर्ग असणाऱ्या भाषेत भाषांतर करताना अधिक अडचणी येतात. She has brothers या इंग्लिश मधील वाक्याचे भाषांतर द्विवचन व बहुवचन या दोहोंत भेद करणाऱ्या भाषेत करताना 'तिला दोन भाऊ आहेत' आणि 'तिला दोनपेक्षा अधिक भाऊ आहेत' या विधानापैकी एका पर्यायाची निवड भाषांतरकाराला स्वतःलाच करावी लागते. किंवा 'तिला दोन किंवा दोन पेक्षा अधिक भाऊ आहेत' असे म्हणून निर्णय वाचकावर सोडावा लागतो. ज्या भाषेत व्याकरणिक वचन नसते, त्या भाषेतून इंग्लिशमध्ये भाषांतर करताना आपल्या brother किंवा Brother's या दोन पर्यायापैकी एकाची निवड करावी लागते किंवा She has either one or more than one brother असे म्हणून भाषांतर वाचणाऱ्यावर निर्णय सोपवावा लागतो.

भाषा एकमेंकीपासून भिन्न असतात. त्या त्यांच्यातून काय व्यक्त होणे आवश्यक आहे या मुद्याबाबत असतात. त्याच्यातून काय व्यक्त होणे शक्य आहे याबाबत नव्हे. कोणत्याही भाषेतील प्रत्येक क्रियापद आहे किंवा नाही या स्वरुपाचे काही विशिष्ट प्रश्न उपस्थित करतेच करते. उदा. घटना पूर्ण, अपूर्णत्वाचा संदर्भ लक्षात घेऊन त्या घटनेविषयी कथन होते की नाही, जिच्याविषयी कथन होते आहे ती घटना प्रत्यक्ष बोलण्याच्या घटनेआधी घडलेली म्हणून प्रस्तुत केलेली आहे की नाही? विशिष्ट भाषेच्या चिन्ह व्यवस्थेमध्ये जे घटक अनिवार्यपणे यायला हवेत, त्यांच्यावरच ती भाषा निजभाषा म्हणून वापरणाऱ्यांचे लक्ष लागलेले असणे हे स्वाभाविकच म्हणायला हवे.

ज्ञानात्मक कार्याच्या बाबतीत भाषा ही तिच्या व्याकरणिक घडणीवर अगदी कमी प्रमाणात अवलंबून असते. कारण आपल्या अनुभवाची व्याख्या आणि अतिभाषिक प्रक्रिया यांचे परस्परांशी पूरक असे नाते असते. भाषेच्या ज्ञानात्मक पातळीवर अर्थविवरणाचे चिन्हांतरण, म्हणजेच भाषांतर केवळ अस्तित्वातच असते असे नाही, तर त्याची तेथे प्रत्यक्ष आवश्यकताच असते. ज्ञानात्मक अनुभवसामग्री शब्दातीत वा भाषांतरातीत असते. अशा प्रकारचे कोणतेही ग्रहीतकृत्य हे आत्मघाती ठरेल. मात्र विनोदी, चुटके, स्वप्ने, यातुविधी यामध्ये थोडक्यात, आपण ज्याला नेहमीच्या व्यवहारातील वाचिक मिथ्य कथा संग्रह म्हणून त्यामध्ये आणि सर्वाधिक प्रमाणात काव्यामध्ये व्याकरणिक जातींना दाट अशी अर्थ घटना प्राप्त झालेली असते. अशा परिस्थितीमध्ये भाषांतराचा प्रश्न किचकट आणि वादग्रस्त होऊन बसतो. व्याकरणिक लिंग ही जाती अनेकदा केवळ संरचनात्मक जाती

म्हणून मानली जाते. परंतु अगदी व्याकरणिक लिंगालासुद्धा एखाद्या भाषिक समानाच्या मिथक दृष्टिकोनामध्ये फार मोठे स्थान मिळालेले असते.

काव्यामध्ये भाषिक समरुपता ही साहित्यकृतीचे एक रचनातंत्र म्हणून वावरते. वाक्यरचनेचे आणि पदिम व्यवस्थेचे प्रवर्ग, मूळ धातू आणि त्याचे प्रत्यय, स्वनिम आणि त्याचे (व्यवच्छेदक) घटक-थोडक्यात, वाचिक चिन्ह व्यवस्थेचा कोणताही मूलघटक यांची मांडणी साधर्म्य आणि विरोध या तत्त्वाच्या साहाय्याने केली जाते. व त्यातून त्या घटकांचा परस्परांशी संघर्ष होऊ शकतो. परस्परांच्या शेजारी राहून त्यांच्यात विरोध येऊ शकतो किंवा त्यांच्यात सान्निध्यसंबंध निर्माण होऊ शकतात. या घटकांना व त्यांच्यामधील परस्पर प्रक्रियांना खास स्वतःचा असा स्वायत्त चिन्हार्थ असतो. स्वनिमिक पातळीवरील साम्याकडे अर्थस्वरुपी संबंध म्हणून पाहिले जाते. द्वयर्थी उक्ती किंवा अधिक पंडिती वळणाची आणि कदाचित अधिक नेमकी संज्ञा वापरायची तर श्लेषोक्ती ही काव्य कलेवर अधिराज्यच गाजवत असते आणि हे तिचे अधिराज्य अनिर्बंध असो व मर्यादित असो, काव्य हे स्वभावतः भाषांतरातीतच असते. (त्याच्या बाबतीत) फक्त सर्जक चिन्हांतरणच शक्य असेल. म्हणजे काव्यात्म घाटामधून दुसऱ्या काव्यात्म घाटामध्ये किंवा शेवटी आंतरचिन्ह व्यवस्थानिष्ठ चिन्हांतरण असेल- एका चिन्ह व्यवस्थेतून दुसऱ्या चिन्ह व्यवस्थेमध्ये, उदा. भाषिक कलेमधून संगीत, नृत्य, चित्रपट वा चित्रकला यांच्यामध्ये इटालियन भाषेमधील tradutfore traditore या पारंपरिक वचनाचे भाषांतर इंग्लिशमध्ये ‘the translator is a betrayer’ ‘भाषांतरकार हा दगाबाज असतो’. असे केले, तर मूळ इटालियनमधील यमकबद्ध वचनाचे सगोत्रतेच्या तत्त्वावर आधारलेले जे मूल्य आहे, तेच नष्ट होऊन जाते. त्यामुळे ज्ञानात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यावर आपल्याला या वचनाचे रुपांतर अधिक सुस्पष्ट अशा विधानात करावे लागते.

ललित साहित्याचे स्वरुप सर्वश्रुत आहे. यात रचनात्मक गुण एका बाजूला असावे लागतात, तर भाषा व्यवहारज्ञान दुसऱ्या बाजूला, उर्वरीत कल्पनाशीलता एका बाजूला असते. तर चतुर शब्दानुशासन किंवा शब्दप्रभुत्व दुसऱ्या बाजूला असते. यामुळे साहित्य सृजनामागच्या प्रेरणा, सृजन प्रक्रिया, सृजनाचे परिणाम या सर्वाबरोबर सृजनाचे साधन, भाषा, भाषिक संदर्भ, भाषिक वातावरण इत्यादी बाबींचा विचार जसा मूळ भाषेच्या लेखकाला करावा लागतो तसाच भाषांतरकाराला पण करावा लागतो.

ललित साहित्यातील अनुवाद व ललितेतर साहित्यातील अनुवाद हे वेगवेगळे प्रश्न असतात. भाषेचा वापरही वेगवेगळ्या प्रकारचा असतो. येथे फक्त ललित साहित्यकृतीच्या दृष्टीने विचार करायचा झाल्यास ती प्रथम एक कलाकृती असते. भाषा हे तिचे कलाद्रव्य असते. शिवाय साहित्यकृती ही जीवनाधिष्ठित सामाजिक जीवनातून फुललेली असल्यामुळे ते एक सामाजिक, सांस्कृतिक घटीतही असते. मुळात अनुवादक हा एक चांगला वाचक असतो. अनुवाद ही चोखंदळ वाचकाचीच निर्मिती असते. त्याने लावलेला तो साहित्यकृतीचा अर्थ असतो. अर्थात त्याचबरोबर मूळ लेखकाला त्यात काय म्हणायचे आहे. हेही तो वाचकांपर्यंत पोहोचवत असतो.

साहित्यात जे काही व्यक्त होते ते भाषिक स्वरुपातच व्यक्त होत असते. म्हणजे भाषिक द्रव्य व आशय एकरुप झालेले असतात. साहित्यात भाषेचे कार्यच असे वेगळ्या प्रकारचे असते.

एका भाषेत व्यक्त झालेला अनुभव दुसऱ्या भाषेत पोहोचवण्याचे काम अनुवादक करतो. म्हणूनच साहित्याचा अनुवाद ललितानुवाद असतो.

अनुवाद कशासाठी, कोणासाठी (म्हणजे वाचक कोणत्या भाषेतील आहे. प्रस्थान पाठातील कशाचा अनुवाद करायचा. उदा. कवितेचा अनुवाद करायचा असल्यास महत्त्व तालाला द्यायचे की अर्थाला) याची अनुवादकाने जी उत्तरे शोधली असतील त्यावर अनुवादाचे स्वरुप अवलंबून असते.

**उदा :** रामदासांच्या काव्यातील पुढील ओळी-

"जळत हृदय माझे जन्म
कोट्यानुकोटी
मजवर करुणेचा राघवा
पूरलोटी"

या समर्थ रामदासांच्या पंक्तीचा अनुवाद करायचा असल्यास यातील गेयता, तालबद्धता, नेमका शब्दार्थ यापेक्षा उत्कटतेला अधिक महत्त्व आहे. त्यालाच अनुवादात मग तो कुठल्याही प्रकारचा असो, त्याला प्राधान्य मिळेल.

गद्याचा अनुवाद करायचा झाल्यास तोही काही कमी गुंतागुंतीचा नसतो. प्रस्थान भाषा व इप्सित भाषा यांचा वेगळेपणा वाचकाला विचारात घ्यावा लागतो. सामाजिक शब्दांना प्राधान्य देणाऱ्या संश्लेषणात्मक घडण असलेल्या भाषेत मोठी वाक्यं असणं, संदर्भ संपृक्तता वाक्यावाक्यात असणं स्वाभाविक असते. भाषेची ही वैशिष्ट्ये ओळखून त्याच्या परिणामांच्या दृष्टीने अनुवादात वापर करुन घेणं आवश्यक असतं.

भाषेशी निगडित आणखी काही प्रश्न म्हणजे प्रादेशिक किंवा व्यक्तिनिष्ठ बोलीमध्ये असलेल्या कृतीचा अनुवाद बोली रुपात करावा की प्रमाण मानलेल्या भाषारुपात? तसेच काळाने दुरावलेल्या जुन्या कृतीचा अनुवाद करताना ईप्सित भाषेचेही जुने रूप निवडावे का? 'गारंबीचा बापू' या श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीतील कोकणातील निसर्ग, वातावरण, पात्राचे स्वभाव, बोलणे यांचा प्रत्यय मिळवायचा असेल तर अनुवादासाठी प्रादेशिक बोलीची निवड करणे क्रमप्राप्त आहे.

एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवाद करताना वाक्यरचनेमुळे प्रश्न उपस्थित होतो. हे व्याकरणिक प्रश्न स्थूलमानाने दोन प्रकारचे असतात. एक निव्वळ भाषिक व दुसरा सौंदर्यात्मक. एका भाषेतील अर्थ ईप्सित भाषेत पोहोचला म्हणजे झाले. वाक्यरचना कुठल्याही प्रयोगातील असो हा झाला भाषिक प्रश्न. कधी कधी मात्र विशिष्ट वाक्यरचना सौंदर्य वाढवण्यासाठी हेतुपुरस्सर केलेली असते. पण त्यामुळे ईप्सित भाषेच्या घडणीमुळे तशी वाक्यरचना नसेल तर मात्र अर्थाची हानी होते. ललितानुवाद ही एक आव्हान देणारी गोष्ट आहे ही आव्हाने भाषिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन वाचकवर्गाला अनुलक्षून अशी विविध असतात.

भाषांतराच्या जशा सांस्कृतिक समस्या असतात त्याप्रमाणे भाषिक समस्या देखील असतात. एका भाषेत प्रकट झालेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे म्हणजेच भाषांतर या

संदर्भात दोन प्रश्नांचा उहापोहा करावा लागेल. काय भाषांतरित करायचे आहे म्हणजे **आशय** व कसे भाषांतरित करायचे आहे म्हणजे **अभिव्यक्ती**.

भाषा हे अभिव्यक्तीचे माध्यम आहे. तेव्हा हे समजून घेण्यासाठी दोन भाषांमधील साम्य व वैधर्म्य यांचा विचार करणे आवश्यक असते. प्रत्येक शब्दाला वैश्विकतेची बाजू असते आणि स्वतःचं असं व्यक्तिमत्त्व असतं. ते जाणून घेण्यासाठी दोन स्वतंत्र भाषांच्या स्वरुपाची, आकृतिबंधाची व घडणीची माहिती करुन घेतली पाहिजे. उदा. दोन भाषांमधील स्वर, प्रत्यय, रुपिम शब्दसमूह, वाक्यविचार, वाक्यबंधविचार, पाठ्यविचार या सर्व पातळ्यांवर केलेला तौलनिक अभ्यास भाषांतरातील समस्यावर प्रकाश टाकायला उपयोगी पडेल.

### अ) वाक्यविचार व शब्दविचार:

भाषांतराच्या दृष्टीने वाक्य हा घटक प्रमाण किंवा मध्यवर्ती ठरेल. अर्थात त्याच्या सर्वांगाच्या चर्चेची व्याप्ती खूपच आहे. त्यामुळे शब्द हा प्रयोग उचित ठरेल.

भाषांतर आणि शब्दविचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, शब्द हा कशाचा तरी निदर्शक असतो. तो काही तरी सांगण्यासाठी, दाखविण्यासाठी, व्यक्त करण्यासाठी माध्यम म्हणून वापरला जातो. म्हणजे शब्दाला प्रतिकात्मक मूल्य असते. प्रत्येक शब्दाचे भाषाबाह्य जगाशी नाते असते. म्हणजेच त्याची आशयाची बाजू ही शब्द विचाराची परिमिती असते. उदा. 'झाड' या शब्दाला मराठीत एक अर्थ आहे. या शब्दांचे मराठीतील इतर शब्दाशी काय नातं आहे आणि हा शब्द मराठीत कसा वापरला जातो. उदा. 'झाड' या शब्दाबरोबर ‘मोठं' हे विशेषण वापरु शकू व ‘पातळ' हे वापरु शकणार नाही. या संदर्भात भाषाशास्त्रज्ञ ‘नीडा’ याने केलेले विधान लक्षात घेणे रंजक ठरेल. तो म्हणतो- दोन विधानात एका शब्दाला तोच अर्थ नसतो. एका भाषेत दोन संपूर्ण समानार्थी शब्द नसतात. दोन भाषांतील संबंधित शब्द कधीच एकमेकांशी तंतोतंत जुळणारे नसतात. आंतरभाषिक आर्थिक विचार एका भाषेत साधारणत: एका संदर्भात वापरले जाणारे शब्द अनेक असतात. उदा. बाज, खाट, बिछाना, पलंग, दिवाण इ. यातील भाषांतरित करताना कोणता शब्द cot किंवा bed ने भाषांतरित करणे योग्य ठरेल हे ठरवावे लागते. समानार्थी शब्दाचे भाषांतर करताना त्याच्या अर्थाच्या तीव्रतेनुसार किंवा व्याप्तीनुसार ज्याची चढत्या क्रमाने मांडणी करुन, हे शब्द दुसऱ्या भाषेतील कोणत्या शब्दाने भाषांतरित करता येतील. हे ठरवणे सोपे जाईल. (उदा. ताप He is ill, She has fever)

### ब) शब्दार्थ आणि संदर्भ:

ढोबळ मानाने गोळाबेरीज अर्थ सांगणे जरा सोपं असते पण वाङ्मयीन भाषांतरात अर्थाचे बारकावे किंवा निरनिराळ्या छटा आणणं अवघड असतं. भाषांतर करताना एका विशिष्ट संदर्भात वापरलेला शब्द विशिष्ट प्रतिशब्दाने भाषांतरित करावा लागतो. उदा. जोराने बोलणे, जोराने प्रतिपादन करणे इ. शब्द loudly emphallcally अशा वेगवेगळ्या शब्दांनी भाषांतरित करावे लागतील आणि हेही शब्द सर्व संदर्भात लागू पडतील असे नाही.

**क) भाषांतर आणि प्रतिमा:**

भाषांतर होऊ शकत नाही अशा जागा भाषांतरात वारंवार येतात. ब्रेश्तच्या कवितेत एक ओळ आहे. Des tisch list gedeckt याचा इंग्रजीच अर्थ the table is set असा आहे. त्याचा मराठीत अर्थ 'पानं वाढली आहेत', असा होतो. म्हणजेच मूळ जर्मन वाक्यातील एकही शब्द इथे भाषांतरित केलेला नाही. पण प्रतिमा मात्र वापरली आहे. प्रत्यक्ष जीवनात दिसणारी गोष्ट आणि त्याची माणसाच्या मनात असणारी प्रतिमा वेगळी असते.

म्हणून भाषे-भाषेतील फरक समजून घेताना भाषा व जीवन तसेच भाषा व भाषासमाज यातील परस्पर नातं समजून घेणं आवश्यक आहे. अपरिहार्य आहे. कारण विशिष्ट संदर्भात एखाद्या शब्दाचा शब्दकोशात दिलेला अर्थही तोकडा पडतो.

भाषा ही मानवी व्यवहारात, विचार, भावना अनुभवादींच्या प्रकटीकरणाचे माध्यम म्हणून वापरली जाते. भाषिक व्यवहार हा नेहमी संस्कृतिविशिष्ट असतो. म्हणून एका भाषेतून व्यक्त होणारे व ग्रहण केले जाणार अर्थ देखील संस्कृतिविशिष्ट असतात. ज्याप्रमाणे कोणत्याही दोन संस्कृती कधीही, जशाच्या तशा सारख्या असू शकत नाहीत. ते कमी-अधिक फरकानेच सारखे असू शकतात. प्रत्येक भाषेतील भाषिक व्यवहार हा त्या व्यवहाराच्या सांस्कृतिक चौकटीतच विशिष्ट रीतीने अर्थपूर्ण ठरतो. म्हणूनच भाषांतर करताना एका भाषिक कृतीतील अर्थसंभार दुसऱ्या भाषिक कृतीने जसाच्या तसा यायला हवा, ही अपेक्षाच व्यर्थ आहे. एका भाषिक कृतीतील अर्थाला शक्य तितका समतुल्य (equivalent) ठरेल असा अर्थसंभार दुसऱ्या भाषिक कृतीत ग्रंथीत करणे म्हणजे भाषांतर होय. म्हणून भाषांतर ही समतुल्यतानिर्मितीची भाषिक कृती होय. म्हणून भाषांतरकार हा किमान दोन व अनेकदा त्याहीपेक्षा अधिक सांस्कृतिक चौकटीमध्ये वावरत असतो. स्त्रोत भाषेतील साहित्यकृतीचे भाषांतर दुसऱ्या भाषेत व त्याचे तिसऱ्याच भाषेत असेही होताना दिसते.

भाषांतराचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की भाषांतरकार एकाच वेळी वाचक आणि लेखक अशा दोन्ही भूमिका बजावत असतो. मूळ साहित्यकृतीचा तो वाचक असतो, तर भाषांतरीत साहित्यकृतीचा तो लेखक असतो आणि लेखन वाचनाचा व्यवहार हा पुन्हा संस्कृतीविशिष्ट असल्याने तो दोन व्यवस्थांमध्ये वावरत असतो. लेखनाच्या आणि वाचनाच्या काही परंपराविशिष्ट संकेत असतात. अनेकदा लेखक व वाचक या परंपराचे उल्लंघन करीत असले, तरी मुळात त्या परंपरा माहीत असणे गरजेचे असते. एका भाषेतील साहित्यकृती समजून घेण्यासाठी त्या भाषेतील साहित्य व्यवहाराचे विशिष्ट संकेत माहीत असायला हवेत. एकतर साहित्याची भाषा दैनिक व्यवहाराची भाषा नव्हे. लिहिताना लेखक दैनंदिन व्यवहारातील अनुभवाचे रुपांतरण एका निराळ्या सौंदर्यपूर्ण अनुभवात करत असतो. हे करताना तो त्या साहित्य परंपरेने उपलब्ध करुन दिलेल्या संरचनात्मक तत्त्वाचा, घाटाचा, भाषिक तत्त्वांचा, रुपांचा वापर एका विशिष्ट कालावकाशात, विशिष्ट बिंदूवरुन करत असतो. हा वापर कधी पारंपरिक पद्धतीने होतो; तर कधी लेखक रुढ संकेतांच्या पलीकडे जाऊन त्यांची फेर मांडणी व पुनर्रचना करतो. तर कधी नवीन संकेतांचे पायंडे पाडतो. भाषिक पातळीवरची रचना विन्यासापासून ते शैली विन्यासापर्यंत तो अनेक पातळ्यांवर भाषेला नवनवोन्मेषशालीनी बनवीत असतो. व या सर्वातून अनुभवाची सश्लिष्ट व व्यामिश्र रचना

करत असतो. वाचकही लेखकाप्रमाणेच अर्थग्रहणाच्या पारंपरिक संकेताबरोबरच नवनव्या संकेतांचा वापर करीतच असतो आणि त्या अर्थाने तोही अर्थाची निर्मिती करतच असतो.

## आ.१.३ भाषांतर आणि साहित्यप्रकार

नाटक हा साहित्यप्रकार कादंबरी व काव्य यांच्यापेक्षा निराळा आहे. एकतर हा साहित्यप्रकार दृक-श्राव्य कलाप्रकार आहे. कारण नाटक मुळात प्रेक्षागारात, रंगमंचावर काही विशिष्ट प्रेक्षकांपुढे सादर करण्यासाठी लिहिले जाते. म्हणजेच सादरीकरणाच्या दृष्टिकोनातून नाटकांची संहिता लिहिली जाते आणि रंगमंचाशी संबंधित असणाऱ्या अभिनय, नेपथ्य, रंगभुषादी व्यवस्थांशी ती संबंधित असते. कविता वा कादंबरी जशी बहुतांशी व्यक्तिगत वाचनासाठी असते, तसे नाटकाचे नाही. (काही नाटकांचे कधीच प्रयोग होत नाहीत हे वेगळे पण हे अपवादात्मकच होय.) नाटक या प्रकारचा घाट संरचनात्म तत्त्वे आणि भाषा ही भाषांतरकाराला विशेष लक्षात घ्यावीच लागतात. विशेषतः भाषिक पातळीवर कोणत्या समस्या येऊ शकतात, हे लक्षात घेण्यासाठी नाटकाच्या भाषिक वैशिष्ट्यांना समजावून घेतले पाहिजे. कारण सरतेशेवटी भाषांतरकारासमोर असते ती संहित, भाषिक कृती आणि या भाषिक कृतीच्या अंगोपांगातूनच नाटक सादरीकरणाच्या विविध दिशा खुल्या करत असते.

नाटकाच्या भाषेचे स्वरुप जरी 'बोली' भाषेचे असले, तरी ही बोली आणि व्यवहारातील बोली भाषा यांत महंतर आहे. बोली भाषेच्या नाद, लय, ताल, सूरयोजना या साऱ्या वैशिष्ट्यांचा कलात्मक वापर तर नाटकाच्या भाषेत आढळतोच, पण त्यापलीकडे जाऊन, दृश्यात्मकता व नाट्यमयता हा या भाषेचा प्राण असतो, असे म्हणावे लागते. नाटकाच्या भाषेला स्वतःचे असे एक निखालस दृश्यात्मक स्वरुप (gestare) असते. नाद, ताल, लय, सूर योजना इतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'स्तब्धता' भाषिक चिन्हांमधून गुफलेली असते. नाटकाच्या भाषांतरकाराला ही दृश्यात्मकता पाहू शकणारे अंतश्चक्षू व नाद स्तब्धतांचे संगीत ऐकणारे अंत:करण असणे अतिशय आवश्यक असते. ही दृश्यात्मकता व ध्वनीस्तब्धता भाषिक चिन्हांमधूनच गुंफलेल्या असतात. ज्या संहितेच्या पलीकडे असतात. असे मानायचे कारण नाही. कारण सरतेशेवटी संहितेतूनच नाट्यमय अनुभव मुळात आकाराला येतो. त्याच्या शक्यता ओळखून विकसित करण्याची क्षमता दिग्दर्शक पुढे वापरत असेलही, पण मुळात संहिता ही भाषिक कृतीच महत्त्वाची असते.

म्हणी, सुभाषिते, वाक्संप्रदाय इत्यादीमधून प्रत्येक भाषेची स्वयंभू, स्वतंत्र आणि स्वायत्त अशी जडणघडण आणि धाटणी आपल्या लक्षात येते. भाषेच्या या जडणघडणीत काही सामाईक तत्त्वे आणि पद्धतशीर रचना जशा आढळतात तशी काही अनन्यसाधारण आणि तऱ्हेवाईक वैशिष्ट्येही आपणास पहावयास मिळतात. मूळ साहित्यकृतीची भाषा आणि ग्राहकभाषा या दोन्हीही जडणघडण आणि धाटणी यात अशाप्रकारे मुळातच भाषांतरकाराला, प्रथमतः आणि प्राधान्याने जाणवते. दोन भाषांच्या क्रिया-प्रतिक्रियात्मक संबंधातून निर्माण होणाऱ्या अटळ संघर्षमय परिस्थितीला त्या सामोरे जात तो जागोजागी तडजोडी करतो आणि त्याला पडलेल्या प्रश्नांची कोणत्या ना कोणत्या प्रकारे सोडवणूक करतो. काही सामाईक तत्त्वे भाषांच्या संरचनांना पायाभूत असल्यामुळे म्हणजे प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ज्ञ रोमन याकोबसनच्या शब्दात, भाषाच्या समानतत्त्व अधिष्ठततेच्या

स्वरुपामुळे भाषांतर प्रक्रिया संभवनीय ठरते. भाषेची वैश्विक तत्त्वे (language untlersals) अशीच एक भाषाशास्त्रीय संकल्पना आहे. तिला अनुसरुन मूलभाषा आणि ग्राहकभाषा वांशिकदृष्ट्या ज्या प्रमाणात परस्परांना समीप किंवा दूर असतात त्या प्रमाणात भाषांतर सुकर / दुष्कर असते. एकूण एक बुद्धीगम्य अनुभवाचे आविष्करण करण्याचे म्हणजेच संकल्पनाचे सामर्थ्य मुळातच प्रत्येक भाषेच्या ठिकाणी वसत असते. या दृष्टीने पाहता एक भाषा दुसरीपेक्षा वेगळी समजण्याचे कारण नाही असे मानतात. पण प्रत्यक्षात मात्र वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक एखादा अनुभव घेतात. पण त्या अनुभवाची अभिव्यक्ती आपापल्या भाषात वेगवेगळ्या प्रकारे करताना दिसतात. म्हणून अनुभव एक पण आशयाभिव्यक्तीच्या तऱ्हा मात्र निरनिराळ्या अशी एक मजेदार गोष्ट भाषांतरकाराच्या लक्षात येते. त्यामुळेच विविध भाषांच्या भाषकांना अनुभव जरी एक असले तरी त्यांचे लेखन समान, सारखे असू शकत नाही, असे बेन्जमिन वॉर्कसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्ती असलेल्या अमेरीकन भाषाशास्त्रज्ञालाही जाणवते. भाषांतरकाराच्या समोरच्या प्रश्नांची खरी गोम इथे आहे. अर्थपूर्ण अनुभवाचे संज्ञापन एका भाषेतून दुसऱ्या भाषेत कसे करावयाचे ही त्याच्या दृष्टीने कसोटीची वेळ असते. म्हणून त्याच्या जवळ निव्वळ संज्ञापन कौशल्य असून भागत नाही तर सर्जनशीलताही हवी असते. दुभाष्याप्रमाणे एका भाषेतील संदेश दुसऱ्या भाषेत करण्याइतपत तात्पुरत्या ढोबळ स्वरुपाची त्याची जोखीम नसते, तर आशयाभिव्यक्तीचे सारे वैभव, सारा खजिना, तिच्या साऱ्या थाटामाटासह आणि डामडौलासह एका भाषेतून दुसऱ्या भाषेत त्याला आणावा लागतो. म्हणून मूलभाषेतील पाठ्य / संहितेवर त्याचे सारे लक्ष केंद्रीत झालेले असते. साहित्यकृतीत साकार झालेले विश्व शेवटी शब्दबद्ध असल्याकारणाने भाषांतर्गत असते.

## आ.१.४ विविध अभ्यासकांची मते

**ऑरिस्टॉटलच्या** मते, ''माणसाच्या मनाच्या अनुभूतीचे प्रस्तुतीकरण म्हणजे भाषण. भाषण म्हणजे दुसऱ्या शब्दात एक प्रकारचा भाषिक आविष्कार, भाषेचे वाचिक रुप जसे लेखन म्हणजे भाषेचे लिखित रुप.''

**एडवर्ड सपिर** या अमेरीकन वंश-भाषा शास्त्रज्ञाच्या मते, ''भाषा म्हणजे पूर्णतया मानवी आणि प्रयत्न साध्य (Non instinctive) अशी संप्रेषण पद्धती, त्यातून कल्पना, भावना, इच्छा याचे संप्रेषण होते आणि हे संप्रेषण जिच्या साहाय्याने होते तो स्वेच्छा-निर्मिती संज्ञाची व्यवस्था होय.''

**आर. एच. रॉबिन्सकृत** व्याख्या अशी ''भाषा म्हणजे एक संज्ञा व्यवस्था विशुद्ध वा यादृच्छिक संकेतावर आधारित भाषकांच्या बदलत्या गरजा आणि परिस्थिती यानुसार अमर्यादितरित्या विस्तारक्षम व परिवर्तनशील अशी संकल्पना होय.''

तसेच **आर. डब्लु लॅगॅकर** भाषेची व्याख्या करताना तिचे स्वरुप, वैशिष्ट्ये आणि कार्ये सांगतात. ''मानवी भाषा अमर्यादित आहे, ती म्हणजे विविध संकेताचे अमर्यादित संच त्यात खूपखूप संरचनात्मक व्यामिश्रता आहे. तिची संरचना किमान दोन पातळ्यावर (स्वन आणि अक्षर) असते. ती मुख्य दुवा असून ज्ञान वहन करणारी असते. भाषेच्या अभ्यासाचे भाषिक स्तर हे सर्वात महत्त्वाचे अंग आहे. भाषेचे मुख्य चार स्तर आहेत. स्वन, शब्द, वाक्य आणि

अर्थ. यातील प्रत्येक स्तरावर भाषेची एकेक, स्वतंत्र सरंचना कार्य करीत असते. म्हणूनच भाषेला संरचनांची संरचना म्हणतात.

साहित्यिकाला काय किंवा भाषांतरकाराला काय, केवळ भाषिक ज्ञान असणे पुरेसे नाही त्याच्याजवळ विपुल संप्रेषण-कौशल्यही अपेक्षित असते. आशयांच्या पातळीवर सुयोग्य पर्याय शोधनासाठी त्यास भाषिक, सांप्रेषणिक वाक्प्रयोग (usage) कधी त्यांच्या उपयोजन मूल्यानुसार तर कधी अंत:प्रेरणेनुसार, भाषेची सर्व उपलब्ध सामर्थ्य सामग्री वापरुन उपयोजावे लागतात, किंवा कधी कधी नव्याने बुद्धीपरस्पर निर्माण करावे लागतात. उदा. मराठीतील राम राम किंवा नमस्कार याचे इंग्रजीत भाषांतर करताना Good morning / Good noon / Good evening असे करावे लागेल. तसेच इंग्रजी Hello (परिचित), Hi (अतिपरिचित) यांना मराठी पर्यायी रुपे शोधणे दुष्कर होईल. इंग्रजीतील मराठी पाटलोन म्हणून येत असेल तर हेमिंग्वेच्या 'the old man and the sea' या कादंबरीच्या पु. ल. देशपांडेकृत 'एका कोळीयाने' या भाषांतरात 'tavern' साठी 'टावरान' तसेच 'dentuso' या शार्क जातीच्या माशासाठी 'दंताड्या' ही नवनिर्मिती रुपे भाषांतरकाराची सर्जनक्षमता दर्शवत नाहीत का?

इंग्रजी 'gentleman' वर्ग - निर्देशक संकल्पना असल्यामुळे त्यासाठी मराठीत 'सभ्यपुरुष', 'सज्जन' असे म्हटले जात असले तरी संप्रेषण पातळीवर त्यास समानार्थी समजणे कठीण आहे. पण अशाप्रकारे भाषांतर केले जाते. तेव्हा भाषांतरकार, अगतिकतेपायी मुळातील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ नजरेआड करुन सममूल्यकाचा आधार घेताना दिसतो. संप्रेषण पातळीवर आशयाची हानी अटळ असते. पण उपयोजमूल्याच्या दृष्टीने कार्य पातळीवर त्यांना अन्य पर्याय नसल्यामुळे, सममूल्यक म्हणून स्वीकारणे भाग आहे. या साऱ्या चर्चेतून संप्रेषणाचा भाषणात संस्कृतीशी आंतरिक, अतूट संबध असतो. हे ध्यान्यात येते.

'संप्रेषण क्षमता' ही संकल्पना डेल हाईम्ज या समाजभाषा शास्त्रज्ञांने मांडली. चॉम्स्कीच्या 'भाषिक क्षमता' या संकल्पनेशी तिचा संबंध जोडता येतो. भाषिक क्षमतेत भाषारुपाचे ज्ञान अभिप्रेत आहे तर संप्रेषण-क्षमतेत त्या भाषारुपाचे सुनियोजन उपयोजन व त्यातील कौशल्य अभिप्रेत आहेत.

हाईम्जच्या शब्दात ही भाषा, तिची वैशिष्ट्ये आणि उपयोग यांचाशी निगडित (भाषिकाचा) दृष्टिकोनमूल्ये आणि हेतूंशी एकसंघ, एकात्म झालेली असते. थोडक्यात सूत्रमय पद्धतीने हा विचार असा मांडता येईल**. संप्रेषण क्षमता = भाषिक क्षमता + उपयोजन मूल्य**

भाषिक पातळीचा विचार करता, एखाद्या प्रसंगाच्या वर्णनातील पाठ्य विशिष्ट घटक त्यांच्या संदर्भनिष्ठ अर्थासह एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आणता येत नसतील तर तिथे भाषांतर अक्षमतेचा आढळ होतो असे मानले जाते. ग्राहकभाषेत संकल्पना पातळीवर म्हणजेच रुप-पातळीवर मूलभाषेतील रुपाची समानअर्थी सममूल्यके नसतील तर प्रसंगी त्या बाबी पुरती, भाषांतर अक्षमता संभवते. अशा भाषांतर प्रयत्नात कधी ओढून तानून तर कधी मारुन मुटकून आशयाची समानता आणण्याची धडपड केलेली दिसते. अशा परिस्थितीत भाषांतर विरुपित झालेले असू शकते. पण नेमके याच ठिकाणी भाषांतरकाराला आपले कसब पणाला लावण्याचे आव्हान व आवाहन असते. हे आव्हान स्वीकारण्यास दुसऱ्या शब्दात,

भाषांतर अक्षमतेला भाषांतरक्षम करण्यास तो समर्थ ठरला, तर त्याचा भाषांतर प्रयत्न केवळ यशस्वी नाही तर सर्जनशीलही होतो असे म्हणता येईल.

भाषा मानवी मनातील कल्पनांचा केवळ उद्गार म्हणजे वाचिक आविष्कार नाही; तर त्यांना आकार व संरचना प्रदान करणारे संघटक तत्त्व आहे. भाषेने जसे घडवले तसे निसर्गचित्र किंवा विश्वदर्शन प्रत्येक जण स्वीकारत असतो. भाषिक सापेक्षतेचे तत्त्व सांगते की, ज्याची भाषिक पार्श्वभूमी समान, एकसारखी नाही अशा साऱ्या निरीक्षकांना पुराव्यादाखल एकच एक म्हणजे तीच ती, एक सारखी प्रत्यक्षानुभूती येत असतानाही समसमान विश्वदर्शन घडत नाही.

उदा. मराठीतील त्याने कित्येक पावसाळे पाहिले, या वाक्यातील अनुभव सूचक पावसाळे, साठी इंग्रजीत समानाशयी winters असा शब्दप्रयोग केला जातो. भाषिक, सांस्कृतिक सापेक्षता तत्त्व हे दोन्ही घटक भाषांतर क्षमता या संकल्पनेच्या विरोधी जाताना दिसतात.

भाषा हा घटक समाजाचा घटक आहे. तेव्हा भाषांतर करताना या अभिव्यक्तीच्या माध्यमाला समजून, उमजून कार्य करावे लागते. दोन भाषांमध्ये काही समान गोष्टी असतात. तर काही ठिकाणी वैधर्म्य असते. साहजिकच भाषांतर करताना भाषेच्या संदर्भात काही अडचणी येतात.

भाषांतरकर्त्यासमोरची पहिली अडचण म्हणजे भाषेच्या स्वभाव वैशिष्ट्याची प्रत्येक भाषेची घडण वेगळी व स्वभाव विशिष्ट असा असतो. अगदी पहिला भाग म्हणजे व्याकरणाचा. मराठी भाषेत क्रियापद हे वाक्याच्या, शेवटी येते. उलटपक्षी इंग्रजीत ते पूरक वाक्य आधी कर्त्याला लागून येते. म्हणजे मराठी वाक्याची मांडणी जवळजवळ इंग्रजी वाक्याउलट होते. डॉ. विलास सारंगांनी भाषांतराचा विचार करताना सांगितले आहे की, मराठी भाषेची घडण सिंथेटीक आहे तर इंग्रजी ही ॲनाथिटिक आहे. म्हणजे वेगवेगळ्या कल्पना व्यक्त करताना मराठीतील मूळ शब्दाबरोबर इतर शब्द वापरले जातात. उदा. 'माणसाला' या शब्दात माणूस आणि 'ला' या घटकाचे सिंथेसिस झाले आहे. इंग्रजीतील-मध्ये-to man मूळ शब्दाच्या स्वरुपात काही बदल होत नाही. संपूर्ण कल्पनेचे to आणि man या घटकात ॲनेलिसिस केले जाते. सिथेंटीक भाषामध्ये वाक्यातील शब्द क्रमांकास जास्त स्वातंत्र्य घेतल्यास संदिग्धता निर्माण करता येते. मराठी सारख्या भाषेत जेथे शब्दाचे स्वरुप वेगवेगळ्या संदर्भात बदलते म्हणून भाषेच्या घडणीतील या विविधतेमुळे भाषांतर करताना समस्या निर्माण होते.

**माधव आचवल:** माधव आचवल म्हणतात, "प्रत्येक भाषेची व्याकरणाची एक स्वाभाविक चौकट असते. तिच्यामुळे कानांना जाणवणारी एक विशिष्ट अस्सलता प्रत्येक भाषेला अंगभूतच असते. मराठीत किंवा तिच्या बोली भाषेत क्रियापदे वाक्याच्या शेवटी येतात. (उदा. बघितली, बसतीय इ.) तसेच क्रियापदाचे रुप ही कर्त्याच्या लिंगभेदानुसार ठरत असल्यामुळे वाक्याच्या रचनेत शब्दाची एक लय, एक ठेका जाणवतो. इंग्रजीत अगदीच विरुद्ध वाक्य रचनेत क्रियापद कोठेही येऊ शकते. वाक्याच्या शेवटीच मात्र येत नाही. तसेच त्याच्या रुपाचा, कर्त्याचा लिंगाशी काही संबंध येत नाही. त्यामुळे भाषा अनुवादात मूळ वाक्याची लय बरीच बदलून जाते. उदा. 'लटपट लटपट तुझ चालणं' यातील 'लटपट' या शब्दाचा मराठमोळेपणा इंग्रजीतील be quick असा करतात. म्हणून आचवल म्हणतात,

मूळ कृतीची अगदी शब्दशः भाषांतर करणे बोलीभाषेतील सगळी वैशिष्ट्ये, रचना, अव्यय, क्रियापदे इ. सारे विशेष आणि लबकी जपण्याचा प्रयत्न भाषांतरकाराने केला पाहिजे."

**प्र. ना. परांजपे:** यांनी म्हटले आहे की, "अनुवादकाची मातृभाषा कोणती आहे व तो कोणत्या भाषेत अनुवाद करीत आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. एखाद्या परकीय भाषेवर मातृभाषेइतके प्रभुत्व असणे ही गोष्ट फारच अवघड आहे. एखाद्या भाषेचे आपल्याला असलेले अबोधज्ञान (Competence) व तिचा आपण करीत असलेला प्रत्यक्ष वापर यात (performance) खूप फरक असतो."

मराठी जशी प्रत्यय घेणारी भाषा आहे तशी इंग्रजीत नाही. द्विधाभाव असलेला इंग्रजीतील वाक्यांश मराठीत भाषांतर करता येईलच असे नाही दोन्ही भाषेत पदरचनेत मोडतोड करुन अर्थवलय उमटवता येतात. भाषांतरात तसे करणे कठीण आहे.

**विंदा करंदीकर:** करंदीकरांना इंग्रजी भाषांतरात अलग अलग वाक्य एकत्र करुन कवितेचे सामर्थ्य कसे वाढवले जाते त्याचे उदाहरण देता येईल. विरामचिन्ह ही वृत्तीदर्शक असतात. old man and the sea या संबंध कादंबरीत केवळ दोनच उद्गार चिन्हे आहेत. भाषांतरकाराने ठायी-ठायी प्रत्येक परिच्छेदात चार-पाच उद्गार चिन्हे वापरुन नायकाची शांत स्थितप्रज्ञ वृत्ती कशी हरवून टाकून अकारण भडक नाटकीपणा निर्माण केला आहे.

इंग्रजीत केवळ / निर्जिव वस्तूंना 'it' सर्वनाम वापरतात. (काही अपवाद आहेत चंद्र, जहाज इ.) मराठीत चेतना गुणोक्ती असलेल्या ओळी इंग्रजीत अमूर्त निष्प्रभ होतात. इंग्रजीतील कॅपिटलचा उपयोग किंवा अभाव हा सहेतूक असतो. मराठीतील तू, तुम्ही, आपण, आम्ही आणि इंग्रजीतील you, we यांच्याही संबंधाचा विचार करणे गरजेचे आहे. वाचकास सामावून येणारा you आहे की नाही हे भाषांतरकाराने पाहिले पाहिजे मगच भाषांतर केले पाहिजे.

आपल्याकडे 'अ', 'द' वाटेल तसे वापरतात. उपपदांना कवितेत विलक्षण महत्त्व असते. उदा. इलियटच्या कवितेत दहा टक्के उपपदे असतात. त्याच्या कवितेचे मराठीत भाषांतर करीत नाहीत. आपली व्यक्तीगत प्रतिमा वाचकाने परिचित समजून स्वीकारावी. यासाठी दि |द हे इन्डेफिनेट आर्टकिल वापरतो. रोमँटिक कधी 'द' या ऐवजी 'अ' वापरतात.

इंग्रजीत मुळाक्षरी शब्द खूप तर मराठीत कमी आहेत. शेक्सपिअर खास परिणाम साधण्यासाठी शब्द बनवितो. उदा. Blow wind's and crak your chicks! Rey! Rey! यातले घणाचे आघात मराठीत आणणे कठीण आहे. मर्ढेकरांची संतवाणी इंग्रजीतील मध्ययुगीन शब्दातून भाषांतरित करण्यास पांडेच्या तोलाचा कवीच पाहिजे. उदा 'पंक्चरली जरी रात्र दिव्यांनी' ही ओळ इंग्रजीत भाषांतरीत होणे हे अशक्यच.

मध्ययुगीन मराठीतील शब्दलेखनातील अनुनासिक शब्दयुक्त संवाद इंग्रजीत आणणे कठीण आहे. म्हणूनच नारायण सुर्वे यांच्या 'नेहरु गेले त्या दिवसाची गोष्ट' या कवितेमधील ग्रांथिक व बोलीभाषेतील निवेदन-संवाद अन्य भाषेत उतरणार नाही. अरुण कोल्हटकर आपल्या कवितात व गौरी देशपांडे 'चक्र' कांदबरीचे एकाच ठिकाणी अमेरीकन व ब्रिटिश विशिष्ट बोली वापरतात. (स्लंग) म्हणून भाषांतर करताना प्रमाण भाषा वापरणे योग्य असते. अगदी आवश्यक तेथेच बोली भाषेचा वापर संयुक्तिक ठरते.

कवी कवितेत ध्वनीचा मुद्दाम उपयोग करतो का? की त्याच्या भाषेची प्रकृती साध्यभूत होते? या बाबत विविध मते असली तरी काही प्रमाणात ध्वनी अर्थास पोषक ठरावेत. मराठीची प्रकृती ही याला कारणीभूत असेल. इंग्रजीत ३५२ व्यंजने आहेत तर मराठीत ३९९ व्यंजने आहेत. मराठीतील 'आ' स्वर इंग्रजीत कमी वेळा येतो. इंग्रजीत आघाता (स्ट्रेस) महत्त्वाचा. मराठीत लघगुरु विचारात घेऊन मात्र लेखन करावे लागते. संस्कृत वाक्यरचना तर आणखी ताठर. इंग्रजी कवितेचे मराठीत भाषांतर करण्यासाठी मुक्तछंद वापरणे श्रेयस्कर आहे असे सारंगांनी सांगितले आहे.

**विलास सारंगांच्या मते:** भाषिक रचनेखालील रुपक व प्रतिमा सृष्टीचे रुप हे विशिष्ट लक्षात घेतले पाहिजे तरच भाषिक रचना क्षुल्लक तपशीलही गाळता कामा नयेत. मर्ढेकरांच्या कवितेनिष्ठ 'कढई' इंग्रजीतील Greel (ग्रील-जाळी) झाल्यामुळे रुपक हरवते. भाषांतरकाराने भाषिक स्वरुपणाकडे अतिशय काळजीपूर्वक अवधान द्यावे. the poetry is in word's (काव्य शब्दात आहे) म्हणून भाषांतरकाराने पृष्ठावरील शब्द भाषांतरित करावेत असा विलास सारंगाचा आग्रह आहे. भाषांतराच्या व्यवहारातील सर्वात मोठी अडचण कोणती असेल तर, ती म्हणजे शब्दांच्या बाबतीतल्या संकेतांची भाषांतर करीत असताना लेखकाला भाषांतर कर्त्याला केवळ शब्दाजवळ थांबून चालत नाही तर शब्दाच्या वा शब्द प्रयोगाच्या मागे जे दृढमूल संकेत असतात तेथपर्यंत जावे लागते. आणि त्या संकेतांना जवळ असणारे स्वभाषेतील संकेत शोधावे लागतात. असे केले तरच भाषेचे वैशिष्ट्य कायम राखता येते.

# १आ.२ ललित साहित्याचे भाषांतर : शैलीविषयक समस्या

### १आ.२.१ ललित साहित्याचे भाषांतर : शैलीविषयक संदर्भांचे महत्त्व-शैलीच्या व्याख्या

१) आशयाचे वेष्टण म्हणजे ‘शैली’

२) शैली म्हणजे भाषेचा कलात्मक उपयोग. शैली म्हणजे लेखकच. (ए स्टाईल इज द मॅन हिमसेल्फ)- ब्यूफाँ

३) साहित्यकृतीत रचनेच्या काही समान बाबी असतात; ती म्हणजेच शैली. - सुधीर रसाळ

४) एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रुपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे 'शैली' - भालचंद्र नेमाडे

मानवी व्यवहाराच्या अनेक क्षेत्रात शैली ही संज्ञा रीत, पद्धत, लकब, वळण व धाटणी कौशल्य, वैशिष्ट्य, तंत्र किंवा स्टाईल अशा अनेक अर्थानी वापरली जाते.

### १आ.२.२ शैलीची चार अंगे

**अभ्यासकांनी शैलीची चार अंगे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे:**

१) साहित्यकृतीची शैली

२) वैयक्तिक शैली

३) युगशैली

४) साहित्य प्रकाराची शैली

**१) साहित्यकृतीची शैली:**

एखाद्या साहित्यकृतीमधील भाषिक रुपांचा अभ्यास साहित्यकृतीच्या शैलीमध्ये येतो. त्या साहित्यकृतीतील आशय, पात्रे, जीवनदृष्टी यांना अनुकूल भाषिक रुपे संहितेत एकत्रितपणे येतात.

**२) वैयक्तिक शैली:**

वैयक्तिक शैली ही लेखकाचे स्वतःचे भाषिक वर्तन समजले जाते. लेखकाची वैयक्तिक शैली ही अन्य कुठल्याही लेखकाच्या शैलीपेक्षा काही खास भाषिक लकबीमुळे वेगळी ठरते.

**३) युगशैली:**

ऐतिहासिक प्रक्रियेचा अंगभूत घटक म्हणून साहित्यिक कालखंड अस्तित्वात येतात आणि या कालखंडामधील शैलीची रुपे त्या त्या कालखंडाची शैलीरुपे त्या कालखंडाची

आवश्यकता म्हणून साहित्याच्या भाषेत स्पष्टपणे दिसतात. या रुपांच्या समुच्चयाला युगशैली म्हटले जाते. युगशैलीचे काही नमुने पुढीलप्रमाणे आहेत.

१) 'श्रीप्रभू व्यारावती एक बीजे केले: संन्यासू स्वीकरीला मग रीधपूरा बीजे केले' या शैलीचा काळ आणि

२) 'सिंदे यांचे लस्करानजीक दोन कोशांवर मुकाम केला'

या वाक्यामधील शैलीचा काळ यांच्यात फरक जाणवतो.

**४) साहित्यप्रकाराची शैली:**

भाषिक अवकाश किती लांब आणि किती आखूड हा निकष प्रत्येक साहित्यप्रकार सांभाळत असतो. दहा पाने असणारी कादंबरी असू शकत नाही. त्याचबरोबर दीडशे पानांची लघुकथा नसते. भाषेच्या वर्णनात्मक आणि प्रतिकात्मक कार्याने आशयाला विशिष्ट घाट दिला जातो. भाषाशैलीच्या (कथात्मक) साहित्याचे तीन प्रकार केले जातात.

लेखकाच्या शैलीची वैशिष्ट्ये राखण्याचा भाषांतरकाराने प्रयत्न केला पाहिजे. भाषांतरकाराने जर दुर्लक्ष केले तर भाषांतराची हानी होते. याचे उदाहरण म्हणजे पु.ल.देशपांडे यांनी हेमिंग्वेच्या 'दि ओल्ड मॅन अँड द सी' याचे केलेले भाषांतर.

**अ) शब्द पुनरावृत्ती:** शब्दांची पुनरावृत्ती हे हेमिंग्वेच्या भाषेचे खास वैशिष्ट्य आहे. 'ही थॉट आणि दि ओल्ड मॅन थॉट' या शब्द प्रयोगांचा वापर हेमिंग्वे करतात. परंतु पु. ल. थॉटचे भाषांतर वेगवेगळ्या पद्धतीने करतात. उदा. म्हाताऱ्याला विचार आला, म्हाताऱ्याने विचार केला, असं त्याच्या मनात आलं, म्हातारा मनात म्हणाला, मनाशी म्हणाला, मनाशीच म्हणाला, मनाशी म्हणत होता, म्हणत होता, स्वतःशीच म्हणत होता, त्याला वाटे, त्याला वाटलं, वाटतं इ. रूपात भाषांतर होते.

त्याचबरोबर 'ही सेड अलाउड' याचे 'तो ओरडला, मोठ्याने ओरडला', 'जोरात ओरडला', 'मोठ्याने म्हणाला', 'एकदम मोठ्याने उद्गारला' असे विचित्ररित्या भाषांतर होते.

**ब)** 'एका कोळीयाने' या कादंबरीमध्ये पु. ल.नी मोठ्या प्रमाणावर उद्गारचिन्हे उपयोगात आणतात.

**उदा.** १) पहा काय गंमत आहे. २) पहा काय भयंकर प्रसंग आहे.

संपूर्ण कादंबरीत हेमिंग्वे तुरळक प्रमाणात उद्गारचिन्हे वापरतात.

**क)** संपूर्ण कादंबरीत हेमिंग्वे एकदाही डॅशचा उपयोग करीत नाही. कारण डॅश खूप वेळा खोटा सस्पेन्स निर्माण करतो. परंतु पु.ल. मोठ्या प्रमाणावर डॅशचा अवलंब करतात. उदा. Yes, If the boy were here. If the boy were here (हो, तो पोरगा इथे असता तर- पोरगा इथे असता तर...!) किंवा The old man was dreaming about the lions. (म्हाताऱ्याला स्वप्नं पडत होती-सिंहाची...) इ मध्ये डॅशचा वापर हा सस्पेन्स निर्माण करणारा आहे.

**ड)** हेमिंग्वेच्या भाषाशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अँडचा केलेला उपयोग. हे वैशिष्ट्य भाषांतरात आणण्याचा बऱ्यापैकी प्रयत्न पु.ल. करतात.

**उदा.** They sat on the terrace and many of the fishermen made fun of the old man and he was not angry.

“मग ते टावराणात (गच्चीवर) गेले. इतर कोळी म्हाताऱ्याची थट्टा करु लागले. पण त्याला राग आला नव्हता.”

हेमिंग्वे 'अँड' चा उपयोग गती आणि लय यांच्यासाठी वापरतात. परंतु पु.ल. त्याकडे दुर्लक्ष करतात. ‘आणि’, ‘पण’ या शब्दाचा अवलंब करतात. म्हणूनच अँड, ही थॉट, उद्गारचिन्हे या भाषा शैलीच्या गौण गोष्टी आहेत. या गोष्टींचा विचार आपण बहुधा करीत नाही. परंतु या गोष्टी फारच मौल्यवान असतात हे या दोन लेखकांच्या भाषाशैलीवरून कळून येतात.

असेच एक उदाहरण म्हणून ‘एका कोळीयाचेच’ घेता येईल. हेमिंग्वेची शैली साधी आणि अनलंकृत आहे. मूळ शीर्षकात याचे रोखठोक, साधेपणाचे प्रतिबिंब आहे. पण या शीर्षकाच्या मराठीकरणात मात्र धूसरता, संदिग्धता आहे. 'द ओल्ड मॅन अँड द सी' चे शीर्षक "म्हातारा आणि समुद्र" असे हवे पण ते त्यांना उगीचच पाठ्यपुस्तकातल्या पाठाच्या शीर्षकासारखे वाटते. पु.ल.देशपांडे म्हणतात, त्यांच्या लहानपणी “एका कोळीयाने एकदा अपुले जाळे बांधियले उंच जागी” अशी कविता शाळेत असताना होती. त्या गीतात आणि या कादंबरीच्या शीर्षकात त्यांना उगीचच साधर्म्य जाणवते म्हणून ‘एका कोळीयाने’ हे शीर्षक ते मूळ लेखकाच्या शैलीशी सुसंगत नसतानाही योजतात.

काव्यानुवाद शक्य असतो. परंतु लयबद्धता, नादबद्धता इंग्रजीत आणता येत नाही. यथार्थ अनुवाद कधी कधी करता येतो. परंतु नाद सौंदर्याची, माधुर्याची हानी इंग्रजी काव्यानुवादात होईल. ज्याचबरोबर मूळ कवितेतून श्रद्धेच्या भावना आढळतात. उदाहरणार्थ पसायदान.

तसेच कधी कधी सामासिक शब्द योजूनही काव्यानुवाद शक्य असतो. उदा. “तू माझी पक्षीणी... मी तुझे अंडज.”= “your mother bird...I your egg-born’’. म्हणूनच काव्यानुवादात यमक जुळण्यापेक्षा Trans creation महत्त्वाचे असते.

काव्यानुवाद करताना ज्या भाषेत अनुवाद करावयाचा आहे त्या भाषेतील मूळ कवितेतील आशय मानतात की, नाही याची चाचणी घेण्याची गरज असते. उदा. ‘ये रे ये रे पावसा’... या कवितेत 'पाऊस' आपल्याला हवाहवासा वाटतो. परंतु इंग्रजी भाषिकांना पाऊस हवासा वाटेलच असे नाही.

यमक, अनुप्रास, लयबद्धता मराठीत जर असेल आणि ती इंग्रजीत आणायची असेल तर इंग्रजीमधील कुठली तरी लयबद्धता स्वीकारावी लागते.

कुसुमाग्रजांची, ‘गर्जा जयजयकार’, ‘पृथ्वीचे प्रेमगीत’ या कविता जर मुक्त छंदात अनुवादित केल्या तर त्या कविताच वाटणार नाहीत. म्हणूनच यमकाचा भाग कवितेपुरता महत्त्वाचा ठरतो. रवींद्रनाथ टागोरांच्या ‘गीतांजलीचा’ गद्यरुप अनुवाद टागोरांनीच केला असला तरी तो चांगला अनुवाद नसल्याचे बोलले जाते.

मूळ लेखकाचे शैलीवैशिष्ट्ये हा देखील मूळ पाठाचा आत्मा असतो. पाठाच्या आशयाचा तो अविभाज्य भाग असतो. या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यास रुपांतरात हानी होते. उदा. 'ऑथेल्लो' या नाटकात ऑथेल्लोच्या तोंडी एक वाक्य आहे... I am black (माझा अंगवर्ण नाही गोरा.) अशी भरजरी भाषा शिरवाडकर योजतात. त्यामुळे ते पात्राच्या स्वभावाशी विसंगत वाटते.

त्याचबरोबर गौरी देशपांडे यांनी सतीश आळेकर यांचे 'महानिर्वाण' हे नाटक इंग्रजीत रुपांतरित केले आहे. उदाहरणार्थ, चाळकरी ५: न्या. न्या... अगदी प्रेताच्या टाळूवरचे लोणी खा.

Neighbor 5:_Yes, that would be the cream of the test....

चाळकरी ६: (प्रवेश करत) फार महाग झालंय हो अलीकडे !

Neighbor 6: (entering) I say! Its very expensive now days...!

मराठी नाट्यसंहितेमधील हा शाब्दिक कोट्यांचा भाग फार कौशल्याने गौरी देशपांडे यांनी रुपांतरित केला आहे. परंतु या नाटकात समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या दोन भाषांच्या संरचनेतील भिन्नत्वामुळे.

मूळ नाटकामधील एखादा भाषिक घटक जर अर्थाच्या दृष्टीने लक्षणीय कार्य करीत असेल आणि जर तो घटक लक्ष्यभाषेच्या संरचनेत अस्तित्वात नसेल तर रुपांतरकाराला निश्चितच अडचणी येतात.

**उदाहरणार्थः** (महानिर्वाण, पृष्ठ ५६)

रमा : आणि... आणि... त्यांना पण बोलाव.

नानाः त्यांना म्हणजे कुणाला ? मघापासून ते दिसले... त्यांना बोलाव हे चाललंय तुझं.

रमा : त्यांना म्हणजे सगळ्यांना रे... जे जे पोहोचवायला आले होते त्या सगळ्यांना असं म्हटलं मी...

Rama: So go and call everyone and nana, don't forget him.

Nana: Who? What is this? Who is this 'he' you keep talking about?

Rama: No no...! I mean 'they' you know, all of them that were here, call them (page 43)

मराठीत 'ते' हे सर्वनाम तृतीयपुरुषी अनेकवचन आणि आदरवाचक अशी दोन कार्ये करते... या भाषिक वैशिष्ट्यामुळे मराठी नाटकात अर्थदृष्ट्या धुसरता, अस्पष्टता व्यक्त करते. परंतु इंग्रजीत they हे सर्वनाम फक्त तृतीयपुरुषी अनेकवचनी वापरले जाते... आदरवाचक म्हणून he हे तृतीयपुरुषी एकवचनी सर्वनाम वापरले जाते.

इंग्रजी रुपांतरात he & they ही सर्वनामे वापरावीच लागतात. परंतु मराठी संहितेमधील ही धुसरता, संदिग्धता इंग्रजीमध्ये गौरी देशपांडे यांना देखील आणता आलेली नाही...

त्याचबरोबर या नाटकात सांस्कृतिक भिन्नतेमुळे रुपांतरात अडचणी निर्माण होतात... या नाटकात हिंदू धर्मातील अंत्यसंस्कार विधी, प्रथा, परंपरा यांच्यातील विरुपता आणि हास्यास्पदता धीटपणाने मांडली आहे.

पिंडाला कावळा शिवणे, मडके फोडणे, दहावे, तेरावे, श्राद्ध या व अशासारख्या शब्द प्रयोगांच्या मागे सांस्कृतिक संचित दडलेले आहे... ते इंग्रजी रुपांतरात आणणे अवघड आणि अशक्य आहे... तरी गौरी देशपांडे यांनी रुपांतरात आटोकाट चांगला प्रयत्न केला आहे...

भाऊ : पण तू आमची गंगा... तुझा नवरा गेल्यावर त्याच्या मुखात गंगा घालताना प्रथम पाहिले तेव्हाच ठरवलं की ही आमची गंगा.

Bhaurao: But I'm going to call you Ganga my Ganga.

I saw you first when you were pouring Ganga Water into you dead husbands mouth. I decided as that very moment that you shall be my Ganga (DD 60) (The dread Departures).

गंगा मुखात घालणे या शब्दांना जे धार्मिक, सांस्कृतिक संदर्भात महत्त्व आहेत ते भारतीय संस्कृतीबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या पाश्चात्त्य प्रेक्षकवर्गास कळणे अशक्यच आहे.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न -** आपण वाचलेल्या कोणत्याही कविता किंवा कादंबरीचे भाषांतर करा. व ते करत असताना आपणास आलेल्या भाषिक किंवा शैलीविषयक समस्यांचे विवेचन करा.

## १.३ सारांश

एकूणच भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत नेणे असे असले तरी भाषांतर करताना अनेक अडचणी संभवतात. प्रत्येक भाषेतील शब्दांच्या मागे सांस्कृतिक संचित असते. आणि हे सांस्कृतिक संचित परभाषेतील वाचकाला माहीत असतेच असे नाही. त्यामुळे असे भाषांतर हे शंभर टक्के नेमक्या अर्थासहित होतेच असे नाही. तसेच साहित्यातील विशिष्ट प्रकार हे दुसऱ्या भाषेत अस्तित्वात असतात असे नाही. त्यामुळे शैलीविषयक समस्याही निर्माण होतात. तसेच मराठीच्या बाबतीत विशिष्ट शब्द हे रूपक, प्रतीक, प्रतिमा म्हणून येतात. त्यांचे भाषांतर होताना त्यांचे हे विशिष्टत्व हरवण्याच्या

शक्यता वाढतात. तसेच यमक, वृत्ते यामुळे कवितेत असणारे नादसौंदर्य हे भाषांतरात गमावत असतात. अशा अनेक अडचणी, समस्यांची चर्चा आपण या घटकात केली. या गोष्टी टाळून उत्तम भाषांतर करणे ही भाषांतरकाराची जबाबदारी असते. ती नेकीने पार पाडणे भाषांतरात अत्यंत महत्त्वाचे असते.

## १.४ संदर्भग्रंथ सूची


१) काळे, कल्याण, सोमण, अंजली (संपा.) : 'भाषांतरमीमांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. १९९७.

२) कानडे, मु. श्री. : 'मराठीचा भाषिक अभ्यास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प. आ. १९९४, ति. आ. २००४.

३) कालेलकर, मा. गो. : 'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९८२.

४) देशपांडे, गौरी : "भाषांतर : छायानुवाद की भावानुवाद ?", 'भाषा आणि जीवन' हिवाळा १९८६.

५) कऱ्हाडे, स. दा. : 'भाषांतर', लोकवाङ्मयगृह मुंबई, १९९२.


## १.५ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) 'भाषांतर : भाषिक समस्या' याबाबतचे तुमचे मत उदाहरणासह स्पष्ट करा.

२) भाषांतराबाबतची विविध अभ्यासकांची मते नोंदवून 'भाषांतर आणि प्रतिमा' स्पष्ट करा.

३) भाषांतर करताना येणाऱ्या शैलीविषयक समस्याचे विश्लेषण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) भाषांतर समस्या बाबतचे माधव आचवल यांचे मत

२) भाषांतर आणि पाश्चात्त्य अभ्यासकांचे मत

३) विंदा करंदीकर यांचे मत

४) साहित्यप्रकारच्या शैलीची चार अंगे

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विंदा करंदीकरांनी विसाव्या शतकात कशाचे अर्वाचीनीकरण केले आहे?

२) ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर एकोणिसाव्या शतकात कोणी समओवी टीका लिहिली.

३) प्रत्येक भाषेची पाच अंगे असतात. तीची नावे लिहा.

*****

# २

## भाषांतर : प्रत्यक्ष भाषांतर अभ्यास

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेचे रचनाविशेष

२.३ भाषांतराचे नमुने

 १. मराठी उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर

 २. इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर

 ३. मराठी उताऱ्याचे हिंदीत भाषांतर

 ४. हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर

२.४ समारोप

२.५ पूरक वाचन

२.६ संदर्भ ग्रंथ

२.७ नमुना प्रश्न

## २.० उद्दिष्टे

१. भाषांतर विद्येबद्दल सूक्ष्म माहिती होईल.

२. भाषांतर कौशल्य प्राप्त होईल.

३. प्रत्यक्ष इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांमध्ये भाषांतर केल्यामुळे त्या भाषांसंदर्भात सूक्ष्म माहिती मिळेल. परिणामी ज्ञानात भर पडेल.

## २.१ प्रस्तावना

"अन्य भाषा इति भाषांतरम्" अशी भाषांतराची व्याख्या केली जाते. भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत नेणे, आशयाचे स्थलांतरण करणे होय. कोणत्याही एका भाषेतील ज्ञान दुसऱ्या भाषेमध्ये नेण्यासाठी भाषांतराची आत्यंतिक आवश्यकता असते. एका भाषेतील साहित्यकृती किंवा एखादा मजकूर दुसऱ्या भाषेमध्ये आशयानुसार व्यक्त केला जातो त्याला भाषांतर म्हणतात. एखाद्या भाषेतील श्रेष्ठ साहित्यकृती किंवा चांगला मजकूर हा त्या भाषेतील वाचकाला फक्त समजू शकतो पण भाषांतरामुळे मजकुराचा आशय भाषांतर झालेल्या भाषेतील वाचकांनाही कळू शकतो. भाषांतर ही एक कला आहे. कारण भाषांतर करताना आशय किंवा भाव न बदलता मजकूर भाषांतरित करणे हे कौशल्य आहे. असे कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे या उद्देशाने आपण प्रत्यक्ष भाषांतराचा विचार करतो. भाषांतर, रूपांतर, अनुवाद या संकल्पनांमध्ये भेद आहे हे

विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावे. भाषांतर करताना त्या त्या भाषेचे रचना विशेष लक्षात घ्यावे लागतात. प्रत्यक्ष मराठीतून इंग्रजीत, इंग्रजीतून मराठी, मराठीतून हिंदीत, हिंदीतून मराठीत भाषांतर केल्यामुळे त्या भाषांसंदर्भातील सूक्ष्म बाबी लक्षात घेता येतात. भाषेवर प्रभुत्व निर्माण करता येऊ शकते. आपण या घटकात प्रत्यक्ष भाषांतराचा भाग इथे पाहणार आहोत.

## २.२ मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेचे रचनाविशेष

कोणत्याही भाषेचे दुसऱ्या भाषेमध्ये भाषांतर करताना दोन्ही भाषांचे रचना विशेष लक्षात घेणे गरजेचे आहे.

- कोणत्याही भाषेतील विशेषनाम, स्थलनाम यांचे भाषांतर न करता ते मुळाप्रमाणेच ठेवावे.

- मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमधील पदक्रम लक्षात घेता मराठी व हिंदीमध्ये कर्ता, कर्म, क्रियापद असा वाक्य रचनाक्रम आहे. मात्र इंग्रजीमध्ये प्रथम कर्ता, क्रियापद आणि नंतर कर्म असा क्रम येतो. या क्रमामध्ये बदल झाला तर अर्थभेद संभवतो किंवा त्यामुळे विसंगती निर्माण होऊ शकते.

- इंग्रजीमध्ये नामापूर्वी a, an, the अशी उपपदे वापरली जातात. मराठी किंवा हिंदीमध्ये अशी उपपद वापरण्याची प्रथा नाही. मात्र विशिष्ट व्यक्ती, वस्तू, घटना यांचा निर्देश करताना the या उपपदाचे मराठीत किंवा हिंदी भाषेत भाषांतर करावे लागते.

- इंग्रजीमध्ये आदरार्थी अनेकवचन नाही त्यामुळे इंग्रजी वाक्याचे मराठीमध्ये किंवा हिंदीमध्ये भाषांतर करत असताना त्याचा संदर्भ पहावा लागतो.

- इंग्रजीत सजीव सृष्टीतील पदार्थांचा किंवा कीटक अतिशूद्र प्राण्यांचा निर्देश नपुंसकलिंगात (it) केला जातो मराठीमध्ये त्याचा निर्देश भिन्न-भिन्न लिंगामध्ये केला जातो.

- मराठीमध्ये वर्तमानकाळात लिंगाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते उदाहरणार्थ ती गाते, तो गातो, ते गातात. हिंदीमध्ये असे आहे तर इंग्रजीमध्ये मात्र भिन्न आहे.

- इंग्रजीत वर्तमानकाळात प्रथम पुरूषी, द्वितीय पुरूषी आणि तृतीयपुरुषी एकवचनात किंवा अनेकवचनात क्रियापद तेच राहते.

- इंग्रजीमध्ये सामान्य रूपे नाहीत. मराठीमध्ये मात्र शब्दाला प्रत्यय लागून त्याचे सामान्य रूप बनते.

- मराठीमध्ये अवतरण चिन्ह यांचा उपयोग केला जातो. तर इंग्रजीमध्ये निवेदन पद्धतीचे Direct method आणि इन डायरेक्ट Indirect method असे प्रकार आढळतात.

- कोणत्याही भाषेतील म्हणी, वाक्प्रचार हे त्या त्या भाषेतील संस्कृतीतून आलेले असतात त्यामुळे भाषांतर करताना त्या भाषेतील तत्सम म्हणी, वाक्प्रचार यांचा उपयोग करता येतो आणि जर अडथळा निर्माण होत असेल तर त्याचे अर्थ देता येतात.
- हिंदी भाषेमध्ये तत्सम शब्दाचा तद्भव शब्द बनताना विसर्गाचा लोप होतो. उदा.- दुःख - दुख
- मराठी भाषेमध्ये वापरला जाणारा 'ळ' वर्ण हिंदी भाषेमध्ये वापरला जात नाही. त्यासाठी हिंदी भाषेमध्ये ‘ल’ हा वर्ण उपयोजिला जातो.

## २.३ भाषांतराचे नमुने

### २.३.१ मराठी उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर:

**परिच्छेद १:**

त्या लहान शहरातील ज्या भागात हिंडता फिरता येत होतं तेथे परेश नुसताच चालत होता. नदीच्या पलीकडे जाण्यासाठी असलेल्या पुलाजवळ तो गेला. पण मोठ्या पुरामुळे तुडुंब भरलेल्या नदीत अतिशय वेगाने वाहणाऱ्या पाण्याखाली पुलाचा आराखडा अस्पष्ट ओळखू येत होता. परेश चिखल असलेल्या लहानशा टेकडीवर उभा राहून नदीकडे पाहत राहिला. त्याला भासलं की तिथे नदी नव्हती तर सगळीकडे पाणीच होतं. जणू सागरच. नदीचा दुसरा किनारा दिसत नव्हता. तो उभा होता तेथून पाण्याने सर्व जग व्यापून टाकलं होतं.

**TRANSLATION:**

Paresh was just walking in the small town where he could walk. He went to the bridge over the river. But due to the great flood, the plan of the bridge could be seen vaguely under the fast-flowing water in the river. Paresh stood on a small mound of mud, staring at the river. He thought that there was no river but water everywhere. Like the ocean. The other side of the river was not visible. From where he stood, water flooded the whole area.

**परिच्छेद २:**

सर्व खोल्या छान सजवलेल्या स्वच्छ, चकचकीत. घरात पाऊल टाकलं की चित्रात पाऊल टाकल्यासारखं वाटायचं. प्रत्येक गोष्टीत दोघं मिळून प्लॅनिंग करत आणि त्याप्रमाणे ते पार पाडत. त्यांच्या प्लॅनिंगमध्ये फक्त एकच मूल होतं. त्याला ते कसलीच कमतरता पडू देणार नव्हते. त्यांच्या या संसार चित्रावर कसलाही डाग नव्हता. सगळं कसं झळझळीत. स्वतःच्या कष्टाचा या घरात राहून त्यांना जीवनाचा भरभरून आनंद घ्यायचा होता. चौकटीतल्या चित्राप्रमाणे त्यांनी आपलं घर ठेवलं होतं. जरासुद्धा अव्यवस्थितपणा, बेशिस्तपणा, अस्वच्छता तिला चालत नसे. तो तर तिच्यावर भरभरून

प्रेम करत होता. ती म्हणेल ते सगळं त्याला प्रियच होतं. त्यामुळे घर नेहमीच नीटनेटकं, स्वच्छ, सुरेख असायचं. तसं ते ठेवायला ती खूप धडपडायची.

**TRANSLATION:**

All rooms are nicely decorated, clean, shiny. Stepping into the house felt like stepping into a picture. The two of them were planning everything together and carrying it out accordingly. There was only one child in their planning. He would not let them down. There was no stain on his picture. How bright everything is. He wanted to enjoy life to the fullest by living in this house of his own. He had made his house like the picture in the window. She did not have the slightest clutter. He was in love with her. She would say that he loved everything. So, the house was always neat, clean, beautiful. She struggled to keep it that way.

**परिच्छेद ३:**

स्वामी विवेकानन्दांचे व्यक्तिमत्त्व हे कोणत्याही एका जाती-धर्मात, प्रदेशात वा राष्ट्रात अडकून राहणारे नव्हते, तर ते विश्वजनीन, सार्वजनीन असे होते. अखिल मानवजातीला आपले खरे दिव्य स्वरूप अभिव्यक्त करण्याचे आवाहन करून तिच्या मनातील सर्व भ्रम व उदासीनता झटकून टाकून तिला नव-संजीवन देण्याचे सामर्थ्य त्यांच्या दैदिप्यमान जीवन-संदेशात आहे. अशा प्रकारे त्यांनी सर्व मानवमात्राला आपल्या विशाल शुद्ध हृदयात स्थान दिले, म्हणून त्यांना विश्वमानव असे म्हटले जाते.

**TRANSLATION:**

Swami Vivekananda's personality was not confined to any one caste-religion, region or nation, but was universal. His radiant life-message has the power to shake off all illusions and depressions in his mind and invigorate all mankind to express their true divine nature. In this way he placed all human beings in his vast pure heart, hence the name Vishwamanav.

**परिच्छेद ४:**

आपल्या दुःखावर उपाय सुचवा म्हणून सल्ला मागायला माझ्याकडे जेव्हा लोक येतात तेव्हा त्यांच्या हृदयात निराशा असते, दुःख भावनेचा उद्रेक उसळत असतो. तो शांत व्हावा म्हणून एक दुवा या अर्थाने मी त्यांच्याशी बोलतो. त्यांना त्यावेळी फक्त प्रार्थनेने, समर्पित भावनेने देवाला शरण जा' असे सांगतो, खरेतर हे फारसे स्पृहणीय नाही. तो मार्ग कधी कोणी अनुसरू नये. स्वतःला आपण कमकुवत बनू देऊ नये. भविष्यात भीतीयुक्त नजरेने पाहणे आणि स्वतःकडे अंतर्मुख होऊन आत्मशक्ती जागवणे यातला फरक सुजाण व्यक्तीने ओळखायला हवा.

**TRANSLATION:**

When people come to me to ask for advice on how to deal with your grief, their hearts are full of despair, an outburst of grief. I talk to them in the sense of a link to calm him down. At that time, I tell them to surrender to God only through prayer and devotion. In fact, this is not very commendable. No one should ever follow that path. We must not allow ourselves to become weak. An intelligent person should know the difference between looking at the future with a fearful eye and awakening the self by introspection.

## २.३.२ इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर

**PASSAGE 1:**

The true value of Andaman and Nicobar goes beyond their beauty. There are unique features that make it a very special place and it must be protected at any cost. Why? Zoologists will probably answer: The islands contain hundreds of mammals, birds, reptiles, and amphibians that are native flowering plants. But the most important statements will come from anthropologists and environmentalists. Anthropologists will say: We have local people! The Andaman, Jarawa, Sentinels, Shopping, Ongs and Nicobaris are indigenous cultures, found only in a small area and nowhere else on earth. The environmentalist will answer: The Andaman and Nicobar Islands are the world's hotspots for biodiversity.

**भाषांतर:**

अंदमान आणि निकोबारचे वास्तविक मूल्य हे त्याच्या सौंदर्याच्या पलीकडे आहे. तेथे अशी अनोखी वैशिष्ट्ये आहेत जी ती एक अतिशय खास जागा बनवतात आणि त्यामुळे त्यांचे कोणत्याही किंमतीत किंवा परिस्थितीत संरक्षित होणे आवश्यक आहे. कारण? त्याचे उत्तर कदाचित प्राणीशास्त्रज्ञ सांगतील- बेटांमध्ये शेकडो सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी आणि उभयचर प्राणी आहेत, स्थानिक फुलांच्या वनस्पती आहेत; परंतु सर्वात महत्त्वाची विधाने मानववंशशास्त्रज्ञ आणि पर्यावरणशास्त्रज्ञांकडून येतील. मानववंशशास्त्रज्ञ म्हणतील- आमच्याकडे स्थानिक लोक आहेत! अंदमानी, जरावा, सेन्टिनीलीज, शॉपिंग, ओंग्स आणि निकोबारीज ही स्थानिक-देशी संस्कृती आहे, जी केवळ एका छोट्या ठिकाणी आढळतात आणि पृथ्वीवर इतर कोठेही नाहीत. पर्यावरणतज्ज्ञ म्हणतील- अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह जगातील जैवविविधता 'हॉट स्पॉट' आहे.

**PASSAGE 2:**

We all know the market of the education system in India. As a student, parent, or teacher, you may have experienced that awful reality. This is the main theme of this book. Gopal, a young man from a poor family, tries to take the JEE / IEEE entrance exam after १२th standard and fails. Then he goes to Kota in Rajasthan to prepare for the exams. There is also a fight for admission in the class which prepares for the entrance exams and again for the entrance exams! From there he fails and returns home. And his life takes a different turn. A politician-MLA catches his eye and, seeing that there is land in his name, draws him into his trap. And this young man who couldn't go to college pulls out of college! Twelve MLAs, his father-in-law and Gopal do such things as making NA of agricultural land, getting permission for construction as desired, getting permission from the university even if it is not convenient. Gradually Gopal became a great education emperor.

**भाषांतर:**

भारतातील शिक्षणव्यवस्थेचा बाजार आपल्या सर्वांनाच परिचित आहे. विद्यार्थी, पालक किंवा शिक्षक अशा एखाद्या भूमिकेतून आपण ते जहाल वास्तव अनुभवलंही असेल. हेच बाजारीकरण या पुस्तकाचा मुख्य विषय आहे. एका गरीब घरातला एक तरूण गोपाल बारावी नंतर  JEE/IEEE प्रवेश परीक्षा द्यायचा प्रयत्न करतो त्यात नापास होतो. मग तो परीक्षांची तयारी करायला राजस्थान मधील कोटा येथे जातो. तिथे तर प्रवेश परीक्षांच्या तयारी करणाऱ्या वर्गामध्ये प्रवेशासाठीही मारामारी आणि पुन्हा प्रवेश परीक्षा! तिथूनही अयशस्वी होऊन पुन्हा घरी परत येतो आणि त्याच्या आयुष्याला वेगळेच वळण मिळते. एका राजकारण्याची-आमदाराची नजर त्याच्यावर पडते आणि तो त्याच्या नावावर जमीन आहे हे बघून त्याला आपल्या जाळ्यात ओढतो. कॉलेजात जाऊ न शकलेला हा तरूण कॉलेज काढतो ! शेतजमीनीचा एन ए करणे, हव्या तश्या बांधकामाला परवानगी मिळवणे, सोयी असो नसो पण विद्यापीठाची परवानगी मिळवणे अशा बारा भानगडी आमदार, गोपाल आणि त्याचे वडील करतात.  हळूहळू गोपाल मोठा शिक्षणसम्राट होतो.

**PASSAGE 3:**

Greats are not born every day; they are born once in a century and are remembered for millennials to come. One such great, Dr. APJ Abdul Kalam, was born in Rameswaram of Madras Presidency on १५th October १९३१ to a poor Tamil Muslim family. He lived with his family in the temple city of Tamilnadu, Rameswaram, where his father, Jainulabdeen, had a boat and was an imam of a local mosque. At the same time, his mother, Ashiamma, was a housewife. Kalam had four brothers and one sister in his family, from which he was the youngest.

Kalam's ancestors were wealthy traders and landowners and had vast land and property tracts. But with time, their business of ferrying pilgrims and trading groceries suffered huge losses due to the Pamban Bridge's opening. As a result, Kalam's family had become inadequate and struggled hard to make a living. At a tender age, Kalam had to sell newspapers to supplement his family income.

**भाषांतर:**

थोरांचा जन्म रोज होत नाही; ते शतकात एकदाच जन्माला येतात आणि येणाऱ्या सहस्त्राब्दीसाठी ते लक्षात राहतात. असेच एक महान, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म मद्रास प्रेसिडेन्सीच्या रामेश्वरम येथे १५ ऑक्टोबर १९३१ रोजी एका गरीब तमीळ मुस्लिम कुटुंबात झाला. ते आपल्या कुटुंबासह तामिळनाडूसारख्या मंदिराच्या शहरात, रामेश्वरम येथे राहत होते, जिथे त्याचे वडील जैनुलब्दीन यांच्याकडे बोट होती आणि ते स्थानिक मशिदीचे इमाम होते. त्याच वेळी, त्यांची आई, आशिअम्मा गृहिणी होत्या. कलाम यांना त्यांच्या कुटुंबात चार भाऊ आणि एक बहीण होती, त्यात ते सर्वात लहान होते. कलाम यांचे पूर्वज श्रीमंत व्यापारी आणि जमीन मालक होते. त्यांच्याकडे खूप जमीन आणि मालमत्ता होती. परंतु कालांतराने पंबन पूल खुला झाल्यामुळे यात्रेकरूंची ने-आण करण्याचा आणि किराणा मालाचा व्यापार करण्याच्या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. परिणामी, कलाम यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी कठीण परिस्थितीतून मार्गक्रमण करत होते. लहान वयात कलाम यांना त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नासाठी वृत्तपत्रे विकावी लागली.

**PASSAGE 4:**

Two cats got a large piece of cake. Instead of sharing it by them selves, they begin to quarrel with each other. A monkey passing by saw the cats and he thought of taking advantage of those two fools. He offered his help to divide it equally for them.

The cats agreed and the Monkey made to parts but one big and one small. He then bit a Little of the big one and made it smaller than the other. Thus, the two parts where never made equal and the whole cake was eaten away by monkey. Thus, the cats lost what they had got.

**भाषांतर:**

दोन मांजरींना केकचा मोठा तुकडा मिळाला. ते स्वतःहून वाटून घेण्याऐवजी ते एकमेकांशी भांडू लागतात. तेव्हा तेथून जाणाऱ्या एका माकडाने त्या मांजरींना पाहिले आणि त्याने त्या दोघींच्या मूर्खपणाचा फायदा घेण्याचा विचार केला. त्यांना समान वाटा देण्यासाठी त्याने आपली मदत देऊ केली. मांजरांनी सहमती दर्शवली आणि माकडाने एक मोठा आणि एक लहान भाग केला. नंतर त्याने मोठ्याला थोडेसे कापले आणि दुसऱ्यापेक्षा लहान केले. अशाप्रकारे दोन भाग केले जे कधीच समान झाले नाहीत आणि

संपूर्ण केक माकडाने खाऊन टाकला. अशा प्रकारे मांजरींनी त्यांना जे मिळाले ते गमावले.

**PASSAGE ५:**

At a lovely place on a high hilly rock, an eagle was standing clasping the rock with its crooked claws. The rock was so high that it appeared to be very near the sun. It was surrounded by the blue sky and just beneath it, a wrinkled sea was flowing very gently. The eagle at such a lofty place appeared to be a grand figure. While there, he saw a fish or something and jumped down like a thunderbolt.

**भाषांतर:**

एका उंच डोंगराळ खडकावर एका रम्य ठिकाणी एक गरुड आपल्या वाकड्या पंजाने खडकाला चिकटून उभा होता. खडक इतका उंच होता की, तो सूर्याच्या अगदी जवळ असल्याचे दिसले. निळ्याशार आकाशाने वेढले होते आणि त्याच्या खाली एक सुरकुतलेला समुद्र अगदी हळूवारपणे वाहत होता. एवढ्या उंच ठिकाणी गरुड एक भव्य आकृती दिसू लागला. तेथे असताना, त्याला मासा किंवा काहीतरी दिसले आणि त्याने मेघगर्जनाप्रमाणे खाली उडी मारली.

## २.३.३ मराठी उताऱ्याचे हिंदीमध्ये भाषांतर

**परिच्छेद १:**

भारतीय संस्कृती ही सर्व संग्राहक व विशाल असून लेखक तिच्यापुढे नम्र आहेत. सागर आणि आकाश तसेच प्रकाश आणि कमळ यांच्यातील अद्वैतासारखी ती आहे. जीवनातील उच्च मानवी मूल्यांचा संस्कार आणि सकारात्मक गोष्टींकडे घेऊन जाण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. सर्वसमावेशक असा मानवजातीचा मेळा तयार करून मंगलमयतेकडे नेऊ पाहणाऱ्या या महान संस्कृतीचा उपासक होण्याची लेखकाची मनीषा आहे.

**भाषांतर:**

भारतीय संस्कृति सर्वव्यापी और विशाल है और लेखक इसके सामने विनम्र हैं। यह समुद्र और आकाश के साथ-साथ प्रकाश और कमल के बीच की विशिष्टता की तरह है। वह जीवन में उच्च मानवीय मूल्यों को विकसित करने और सकारात्मक चीजों की ओर ले जाने की शक्ति रखती है। लेखक इस महान संस्कृति का उपासक बनने की इच्छा रखता है, जो इस तरह के सर्वव्यापी मेले का निर्माण करके मानव जाति को समृद्धि की ओर ले जाना चाहता है।

**परिच्छेद २:**

महाराष्ट्रामध्ये पसरलेला अज्ञानाचा अंधार महात्मा फुले यांनी दूर करण्याचा प्रयत्न केला. १९४८ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. तसेच विविध आंदोलनाद्वारे मानवता धर्माचा प्रसार आणि प्रचार केला. स्त्री शूद्रादी अतिशूद्र यांना मुक्तीची वाट दाखवली. त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न, सार्वजनिक सत्यधर्म यासारख्या मौलिक ग्रंथांचे ग्रंथलेखनही केले. म्हणूनच जनतेने त्यांना महात्मा म्हणून गौरविले.

**भाषांतर:**

महात्मा फुलेजी ने महाराष्ट्र में फैले अज्ञानता के अंधकार को दूर करने का प्रयास किया। लड़कियों के लिए पहला स्कूल १९४८ में शुरू किया गया था। उन्होंने विभिन्न आंदोलनों के माध्यम से मानवता के धर्म का प्रसार और प्रचार भी किया। महिला, शूद्र अतिशूद्र को मुक्ति की दिशा दिखाई। उन्होने शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न, सार्वजनिक सत्यधर्म जैसे मौलिक ग्रंथ का लेखन किया। इसलिए लोगों ने उन्हें महात्मा कहकर गौरव किया।

**परिच्छेद ३:**

लताबाई म्हणाल्या," गाण्याचं रेकॉर्डिंग ही तशी फार अवघड गोष्ट आहे. संगीत दिग्दर्शक, गायक, वादक, रेकॉर्डिस्ट हे सगळेच अशा वेळी फार नाजूक मन:स्थितीत असतात. त्यात गाणाऱ्याच्या मनावर तर विशेष ताण असतो. गाणं नीट जमत नाही असं वाटलं तर गायक हवालदिल होतो. आपल्यामुळे बरोबरच्या आर्टिस्टला पुन्हा पुन्हा गावं लागत आहे, एकसारखे रिटेक होताहेत अस दिसायला लागलं तर त्याला आणखीच अवघडल्यासारखं होतं. अशा वेळी त्यांना धीर देणं, सांभाळून घेणं साऱ्यांचंच कर्तव्य असतं. मुकेशभैया फार मोठे कलावंत आहेत. तसेच ते फार सेन्सिटिव्ह आहेत. त्यांच्या मनाला आज किती त्रास झाला असेल ते मी ओळखू शकते. मागं काही वर्षांपूर्वी मी सायनसमुळे आजारी होते त्यावेळी मी देखील अशा मनःस्थितीतून गेले आहे. अशावेळी गाणाऱ्याला किती वाईट वाटतं ते मी अनुभवलं आहे."

**भाषांतर:**

लताबाई ने कहा, "गाना रिकॉर्ड करना बहुत मुश्किल काम है। ऐसे समय में संगीत निर्देशक, गायक, संगीतकार, रिकॉर्डिस्ट सभी बहुत नाजुक मूड में होते हैं। गायक के दिमाग पर एक विशेष तनाव होता है। गाना अच्छी तरह से कंपोज नही हो रहा है समझकर गायक चिंतित हो जाते है। अपने साथ के आर्टिस्ट को बारबार रिटेक लेना पड रहा है देखकर वह और भी चिंतित होते है। ऐसे समय मे उन्हें धैर्य देना हम सभी का कर्तव्य है। मुकेश भैया एक महान कलाकार हैं। वह बहुत संवेदनशील भी है। मैं समझ सकती हूं कि, उनको कितना बुरा लगा होगा। कुछ साल पहले सायनस के कारण मै खुद बीमार थी तब मैंने अनुभव किया है कि गायक कितना बुरा महसूस करता है।

**परिच्छेद ४:**

विष्णू सखाराम खांडेकर यांचा जन्म सांगली येथे झाला. ते मुंबई विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि पुढील शिक्षण घेण्यासाठी फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. परंतु त्यांना शिक्षण सोडावे लागले. १९२० मध्ये शिरोड नावाच्या गावातील एका शाळेत शिक्षक म्हणून ते रुजू झाले. १९४८ मध्ये ते कोल्हापूरला गेले आणि त्यांनी प्रसिद्ध चित्रपट निर्माते मास्टर विनायक यांच्यासाठी नाटके लिहायला सुरुवात केली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना आयुष्यभर खूप त्रास सहन करावा लागला. त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. पद्मभूषण पुरस्कारानेही ते सन्मानित झाले ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करणारे ते पहिले मराठी साहित्यिक होते.

**भाषांतर:**

श्री विष्णु सखाराम खांडेकर का जन्म १९ जनवरी, १८९८ को सांगली (महाराष्ट्र) में हुआ था। आपने बम्बई विश्वविद्यालय से मैट्रिकुलेशन की परीक्षा पास की और आगे पढ़ने के लिए फर्ग्युसन कालेज में प्रवेश किया, पर आपको कालेज छोड़ना पड़ा और १९२० में आप शिरोड नामक गाँव में एक स्कूल के अध्यापक हो गए। १९४८ में खाण्डेकर जी कोल्हापुर गए और प्रसिद्ध फिल्म-निर्माता मास्टर विनायक के लिए फिल्मी नाटक लिखने लगे। प्रतिकूल स्वास्थ्य के कारण आपको जीवन भर अनेक कष्ट भोगने पड़े। उनको साहित्यअकादमी पुरस्कार प्राप्त हुआ। पद्मभूषण से भी वह सम्मानित हुए। ज्ञानपीठ पुरस्कार पाने वाले वह पहले मराठी साहित्यकार थे।

## २.३.४ हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर

**परिच्छेद १:**

उन्नती के पथ पर चलने वाला छात्र प्रातःकाल सूर्योदय से पूर्व ही उठ बैठता है। नित्यकर्म से निवृत्त होकर वह स्नान करता है। तत्पश्चात भगवान से प्रार्थना करता है कि वह सदा उसका पथप्रदर्शक रहे। पूजन के बाद व्यायाम करना उत्तम छात्र के लिए आवश्यक है। इसके बिना शरीर सबल, सुंदर और सुघटित नही हो सकता। जिस मंदिर मे सुंदरता न हो उसमे बैठने वाली मूर्ती सुंदर नही हो सकती। व्यायाम के बाद थोडा जलपान करना अत्यंत हितकर होता है। उसके बाद दैनिक समाचार पत्र भी देखना चाहिए, ताकि संसार, देश, नगर तथा पडोसी की गतिविधि का परीचय हो जाए। इसका ज्ञान न होने से कभी-कभी बडी हानि होती है। समाचार पठन के पश्चात विद्यार्थी अपने पाठ्य विषय का अध्ययन करता है, उस पर विचार तथा नवीन अभ्यास का प्रयत्न करता है।

**भाषांतर:**

प्रगतीच्या मार्गावर चालणारा विद्यार्थी सकाळी सूर्योदयापूर्वी लवकर उठतो. दैनंदिन कामातून निवृत्त झाल्यानंतर तो आंघोळ करतो. त्यानंतर तो देवाला प्रार्थना करतो की तो नेहमीच आपला मार्गदर्शक असावा. चांगल्या विद्यार्थ्याने पूजेनंतर व्यायाम करणे आवश्यक आहे. त्याशिवाय शरीर सशक्त, सुंदर आणि सुदृढ होऊ शकत नाही. ज्या मंदिरात सौंदर्य नाही ती मूर्ती सुंदर असू शकत नाही. व्यायामानंतर थोडा अल्पोपहार घेणे

खूप फायदेशीर आहे. त्यानंतर रोजचे वर्तमानपत्रही पाहावे, जेणेकरून संभोवतालचे जग, देश, शहर, आसपासच्या घडामोडींची ओळख होईल. याचे ज्ञान नसल्यामुळे कधी कधी मोठे नुकसान होते. बातम्या वाचल्यानंतर, विद्यार्थी त्याच्या विषयाचा अभ्यास करतो, त्यावर विचार करतो आणि नवीन अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो.

**परिच्छेद २:**

ग्रीष्मावकाश के सदुपयोग के लिये विद्यार्थियों को नए - नए ऐतिहासिक तथा सांस्कृतिक स्थानों का भ्रमण करना चाहिए। देशाटन में मनोरंजन के साथ साथ शिक्षा भी प्राप्त होती है। इससे विद्यार्थी नवीन भाषा, नए रीति रिवाज, नई वेशभूषा से परिचित होते है। इन से हमारे मानसिक क्षितिज विकास होता है। गगनचुंबी पर्वत मालाएँ, सघन वन हमारे जीवन को सरसता प्रदान करते है। प्रकृति के संपर्क में आने से हमारा मन प्रसन्न हो जाता है और खिन्नता दूर हो जाती है। तीर्थ स्थानों में भ्रमण करने से हमारे हृदय मे धार्मिक भावनाएँ जागृत होती है। घर के बाहर निकलने से हमे स्वावलंबी बनने का अभ्यास होता है। व्यवहारिक ज्ञान की वृद्धि होती है। हममें शालीनता तथा कष्ट सहने की क्षमता आती है।

**भाषांतर:**

उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नव-नवीन ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी द्याव्यात. देशातन करताना मनोरंजनासोबतच शिक्षणही मिळते. यातून विद्यार्थ्यांला नवीन भाषा, नवीन चालीरीती, नवीन वेशभूषा यांची ओळख होते. त्यातून आपले मानसिक क्षितिज विकसित होते. उंच पर्वत रांगा, घनदाट जंगले आपल्या जीवनाला आनंद देतात. निसर्गाच्या सान्निध्यात आल्याने आपले मन प्रसन्न होते आणि दुःख नाहीसे होते. तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाने आपल्या हृदयात धार्मिक भावना जागृत होतात. घराबाहेर पडल्याने स्वावलंबी होण्याचा सराव होतो. व्यावहारिक ज्ञान वाढते. आपल्यात नम्रता आणि दुःख सहन करण्याची ताकद मिळते.

**परिच्छेद ३:**

ऐसे दो व्यक्ति सब जगह मिलते हैं जिनमें एक उनकी नम्र उदारता की प्रशंसा करते नही थकता और दुसरा उनके उद्धत व्यवहार की निंदा करते नही हारता। जो अपनी चोट के पार नही देख पाते, वे उनके निकट पहुँच ही नही सकते। निराला जी के संबंध मे फैली हुई भ्रांत किंवदंतियाँ इसी निम्न वृत्ति से संबंध रखती हैं।

**भाषांतर:**

असे दोन प्रकारचे लोक सर्वत्र आहेत, एक जे त्यांच्या नम्र औदार्याची स्तुती करताना थकत नाहीत आणि दुसरे जे त्याच्या कठोर वागणुकीचा निषेध करण्यात हार मानत नाहीत. जे त्यांच्या दु:खाच्या पलीकडे पाहू शकत नाहीत ते त्यांच्या जवळ जाऊच शकत नाहीत. निरालाजींबद्दल पसरवलेल्या भ्रामक दंतकथा ह्या लोकांच्या संकुचित प्रवृत्ती पासून तयार झाल्या आहेत.

**परिच्छेद ४:**

अंत में, कुछ लोगों को डर है कि कंप्यूटर मनुष्य को ले लेगा और उसकी जगह और ले लेगा। उन्हें लगता है कि इंसान कंप्यूटर का गुलाम बन जाएगा। वास्तव में, इस काल्पनिक भय का कोई आधार नहीं है। सबसे उन्नत कंप्यूटर का उपयोग करने के लिये भी मनुष्य की आवश्यकता है। मनुष्य का यह अद्भुत सेवक अलाउद्दीन के दानव के समान है और वह मनुष्य की आज्ञा का पालन करता है। सामान्य तौर पर, मानव जाति के कल्याण के लिए इसका सामंजस्यपूर्ण रूप से उपयोग करना हम पर निर्भर है।

**भाषांतर:**

सरतेशेवटी संगणक माणसावर ताबा गाजवेल व माणसाची जागा घेईल अशी भीती काहीजणांना वाटते. मानव प्राणी संगणकाचा गुलाम होईल, असे त्यांना वाटते. वस्तुतः या काल्पनिक भीतीला कोणताही आधार नाही. अगदी अत्याधुनिक संगणकाचाही वापर करण्यासाठी मानवाचीच गरज असते. हा माणसाचा अद्भुत सेवक अल्लाउद्दीनच्या राक्षसासारखा आहे आणि तो मानवाच्या आज्ञांचेच पालन करीत असतो. सामान्यतः मानव जातीच्या कल्याणासाठी त्याचा सामंजस्याने उपयोग करणे ही आपल्याच हाती आहे.

## २.४ समारोप

अशा रीतीने मराठी भाषेतील उताऱ्याचे इंग्रजी भाषेत तसेच इंग्रजी भाषेतील उताऱ्याचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करता येते. हे भाषांतर करताना कर्ता, कर्म, क्रियापद वापरण्याची शैली लक्षात घेता येईल. त्याचप्रमाणे हिंदी भाषेतील उताऱ्याचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करणे शक्य आहे. मराठी आणि हिंदीचा तुलनात्मक विचार करता, मराठीतील काही वर्णन जे हिंदीमध्ये नाहीत, वेगळ्या पद्धतीने लिहिले जातात, हिंदीतील क्रियापदांची रचना घेऊन मराठी मजकुराचे हिंदीमध्ये किंवा हिंदी मजकुराचे मराठीमध्ये भाषांतर करावे लागते. भाषांतर करताना एक बाब अत्यंत महत्त्वाची असते ती म्हणजे त्या त्या भाषेवर प्रभुत्व असणे. कोणत्याही एका भाषेचे दुसऱ्या भाषेमध्ये भाषांतर करताना त्या भाषेतील सूक्ष्म बाबींचे ज्ञान करून घेऊन भाषांतर करणे शक्य आहे.

## २.५ पूरक वाचन

१. तावरे, स्नेहल - 'व्यावहारिक मराठी'

२. फाटक, म. वि. – 'भाषांतर शास्त्र की कला'

३. कऱ्हाडे, स. दा – 'भाषांतर'

४. सारंग, विलास – 'भाषांतर आणि भाषा'

## २.६ संदर्भ ग्रंथ


१. मोकाशी, सयाजीराव, नेमाडे, रंजना – 'व्यवहारिक मराठी', शेतकरी साहित्य, बारामती.

२. नसिराबादकर, ल. रा. – 'व्यवहारिक मराठी', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. गोविलकर, लीला – 'अनिवार्य मराठी', के सागर पब्लिकेशन, पुणे, पाचवी आवृत्ती.

४. काळे, कल्याण, सोमण, अंजली – 'भाषांतर मीमांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. शेकडे, वसंत, नगरकर, संजय - 'व्यवहारिक मराठी', शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती.


## २.७ नमुना प्रश्न

**१. दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. परिच्छेद २.३. १. मधील २ परिच्छेदाचे हिंदी भाषेत भाषांतर करा.

२. परिच्छेद २.३.४ मधील २ परिच्छेदाचे इंग्रजी भाषेत भाषांतर करा.

**२. लघुत्तरी प्रश्न.**

१. इंग्रजी परिच्छेदाचे मराठीत भाषांतर करत असताना कोणकोणत्या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे?

२. इंग्रजी भाषेचे रचनाविशेष थोडक्यात सांगा.

३. हिंदी भाषेचे रचनाविशेष थोडक्यात सांगा.

४. मराठी परिच्छेदाचे हिंदीत भाषांतर करत असताना कोणकोणत्या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे?

**३. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इंग्रजीमध्ये नामापूर्वी कोणती उपपदे वापरली जातात?

२. भाषांतर म्हणजे काय?

३. मराठीमध्ये वाक्य रचनाक्रम कशा पद्धतीचा आहे?

*****

# ३

# पारिभाषिक शब्द, कोश संकल्पना व सूची वाङ्मय

**अ) पारिभाषिक शब्द**

**आ) कोशाची संकल्पना, रचना, कोशांच्या नोंदी, अकारविल्हे आणि सूची**

**घटक रचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.अ पारिभाषिक शब्द

३.आ.१ कोश संकल्पना

३.आ.१.१ 'कोश' संज्ञेचा अर्थ

३.आ.१.२ कोशाचे स्वरूप

३.आ.१.३ कोश रचनाविचार

३.आ.१.४ कोश रचनेच्या पद्धती

३.आ.१.५ कोश रचनेच्या विकासाचे स्थूल दिग्दर्शन

३.आ.२ कोशाच्या नोंदी

३.आ.३ अकारविल्हे

३.आ.४ सूची वाङ्मय

३.२ सारांश

३.३ संदर्भग्रंथसूची

३.४ नमुना प्रश्न


## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास:

- व्यवहाराच्या दृष्टीने पारिभाषिक शब्दांचे महत्त्व लक्षात येईल.
- कोशाच्या संकल्पनेची ओळख होईल.
- मराठी भाषेतील कोशरचनेची माहिती सांगता येईल.
- कोशातील नोंद रचनेचे स्वरूप सांगता येईल.
- कोशरचनेतील अकारविल्हे व सूची यांचे महत्त्व व रचना सांगता येईल.

## ३.१ प्रस्तावना

सामान्य व्यवहारापेक्षा कार्यालयीन व्यवहार वेगळा आणि विशिष्ट शिस्तीने केला जातो. त्यामुळे प्रशासनाची विशिष्ट अशी परिभाषा तयार केलेली असते. त्या परिभाषेचे ज्ञान हे प्रशासनिक कौशल्याचा भाग आहे. प्रशासनिक परिभाषेमध्ये शब्दांना निश्चित अर्थ असतो. प्रशासनिक काम सुटसुटीत आणि गतीने होण्यासाठी प्रशासकीय परिभाषा वापर फायदेशीर ठरतो आहे. माणसाला लिखित भाषा अवगत होण्यापूर्वी परमेश्वरदत्त स्मरणशक्तीमुळे तो भाषेतील शब्दसंकेतांचे म्हणजे शब्दांचे जतन वा संग्रह करीत होता. भाषा व्यवहारात, शब्द हा मूळ घटक असतो. संस्कृती जतन करण्यासाठी, त्या भाषेतील शब्दांचा संग्रह करणे आवश्यक ठरते. आणि यातूनच कोश निर्मितीची कल्पना प्रथम साकारली. लिहिण्याची कला अवगत झाली आणि माणसाला कोश वाङ्मय अधिकतर टिकावू स्वरूपात करण्याचे आयुध हाताशी आले. या घटकात आपण प्रशासकीय पारिभाषिक शब्द व कोशाची संकल्पना, नोंदी, अकारविल्हे व सूची याचा अभ्यास करणार आहोत.

## ३.अ पारिभाषिक शब्द

दैनंदिन जीवनातील व्यवहाराच्या दृष्टीने पारिभाषिक संज्ञांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ज्ञानाच्या स्पष्टीकरणासाठी पारिभाषिक संज्ञा महत्त्वाच्या असतात. यासाठी परिभाषा म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे. परिभाषा म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रामध्ये वापरावयाची भाषा. ही भाषा सामान्यत: व्यवहार भाषेपेक्षा वेगळी असते. परिभाषेमध्ये अर्थातील नेमकेपणा अपेक्षित असतो. हा नेमकेपणा ज्या शब्दांनी साधला जातो त्या शब्दांना 'पारिभाषिक संज्ञा' म्हणतात. अशा शब्दांची ते वापरण्यापूर्वी व्याख्या दिलेली असते. त्यामुळे पारिभाषिक संज्ञेला एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. शिक्षण, आरोग्य, प्रशासन, समाज, उद्योग, व्यापार, न्याय, व्यवहार, संस्कृती अशा एक नव्हे असंख्य लोकशाहीपूरक क्षेत्रांमध्ये गरजेनुरूप पारिभाषिक संज्ञा उपयोगात आणल्या जातात. ज्यातून एकूण ज्ञानव्यवहार अधिक पूरक आणि अधिक सुस्पष्ट व्हावयास मदत होते. व्यवहारात माहिती म्हणून, गरजांची पूर्तता म्हणून रूढ शब्दांपेक्षा वेगळ्या शब्दांचा वापर केला जातो. एक शब्द आणि त्या शब्दाचा एकमेव अर्थ ज्यानुसार एक परिभाषा तयार होते. परिभाषा तयार होणे म्हणजेच शास्त्रभाषा किंवा ज्ञानभाषा यांचा विकास होय. वाढता व्यवहार, वाढत्या गरजा आणि वाढते ज्ञानक्षेत्र यांच्यानुसार पारिभाषिक संज्ञा निर्माण होतात. पारिभाषिक पदनाम वापरामुळे किंवा पारिभाषिक संज्ञा वापरामुळे विचारांचे प्रकटीकरण हे सोपे आणि निर्दोष बनते. अचूकतेसाठी पारिभाषिक संज्ञांचा उपयोग होतो. व्यवहारसापेक्ष भाषा ही पारिभाषिक संज्ञेचा पाया आहे.

'युनेस्को' या जागतिक संघटनेने या संदर्भाने गांभीर्याने विचार करून परिभाषेची पुढील लक्षणे सांगितलेली आहेत.

१. **एकार्थता:** एक शब्द व त्याचा एक अर्थ हे तत्त्व सांभाळले पाहिजे.

२. **स्पष्टार्थता:** अर्थ सुस्पष्टपणे व्यक्त करणारी, स्पष्टीकरण देणारी नव्हे.

३. **एकरूपता:** एका विषयातील कल्पना दुसरीकडे व्यक्त करताना अर्थाची एकरूपता साधली पाहिजे.

४. **सघनता:** परिभाषेतील विचार तर्कबद्ध आणि मांडणी आटोपशीर त्यामुळे स्पष्टीकरणाला वाव नसलेली.

५. **अल्पाक्षरता**: सघनता हे परिभाषेचे जसे आशयासंबंधीचे लक्षण आहे; तसे अल्पाक्षरता हे अभिव्यक्तीसंबंधीचे.

६. **सातत्य:** एखादा शब्द तयार केल्यानंतर तो रूढ होण्यासाठी वापरातील त्याचे सातत्य ठेवले पाहिजे.

७. **संगती:** बऱ्याच वेळा पारिभाषिक शब्दांचा सुट्या स्वरूपात विचार करता येत नाही.

८. **शब्दसौष्ठव:** पारिभाषिक शब्दांमध्ये उच्चारणसुलभता आणि सौष्ठव, माधुर्य आणि श्रवणसुलभता असावी.

९. **अर्थवत्ता:** आशय आणि अभिव्यक्तीची एक परिणामकारक लय, समतोल साधलेला अर्थ असावा.

व्यवहारात संवाद साधताना आपण फारसे काटेकोर शब्द वापरत नाही. कधी-कधी एकाच शब्दाचे दोन-तीन अर्थ होऊ शकतात. अनेकार्थी असणे हा पारिभाषिक शब्दांमध्ये दोष असतो. पारिभाषिक शब्दांच्या बाबतीत शक्यतो एक शब्द - एक अर्थ असेच व्हावयास हवे. तसेच पारिभाषिक शब्दांमध्ये स्पष्टार्थता हा गुण हवा. त्यात एकरूपता हवी. पारिभाषिक शब्द अल्पाक्षरयुक्त असावेत, म्हणजेच अशा शब्दांच्या निर्मितीमध्ये कमीत कमी अक्षरांचा वापर असावा. अशा वैशिष्ट्यांनी तयार झालेली परिभाषा प्रशासनामध्ये पत्रव्यवहार, आदेश, परिपत्रके, निवेदने इत्यादी सर्वच ठिकाणी ही योग्य पद्धतीने वापरावी लागते. या कार्यालयीन व्यवहाराला ही भाषाच एक परिणाम प्राप्त करून देत असते.

प्रशासकीय कामकाजाची व्याप्ती बहुविध स्वरूपाची असते. खासगी संस्थांपासून शासकीय यंत्रणेपर्यंत प्रशासनाच्या कामाचे स्वरूप एकसारखे असत नाही. केवळ शासनाचा विचार केल्यास शासनाची विविध खाती, मंत्रालये परस्पर भिन्न कामे करताना दिसतात. कृषी मंत्रालय जे काम करते त्या कामाचा गृह मंत्रालयातील कामाशी काही संबंध असत नाही. त्यामुळे शासकीय कामाची व्याप्ती मोठी असते. हे काम सुटसुटीत आणि गतीने होण्यासाठी प्रशासकीय परिभाषा वापर फायदेशीर ठरतो आहे. सामान्य व्यवहारापेक्षा कार्यालयीन व्यवहार वेगळा आणि विशिष्ट शिस्तीने केला जातो. त्यामुळे प्रशासनाची विशिष्ट अशी परिभाषा तयार केलेली असते. त्या परिभाषेचे ज्ञान हे प्रशासनिक कौशल्याचा भाग आहे. आधी भाषा व मग कोश ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. भाषेत वापरले जाणारे शब्दच कोशात दाखल होतात. तथापि, पारतंत्र्यामुळे भारतासारख्या काही देशांवर परभाषा लादली गेली. व मध्यंतरीच्या काळात देशी भाषा ज्ञानभाषा म्हणून विकसित होण्याची प्रक्रिया थंडावली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात इंग्रजी हीच आपली आधुनिक जगातील ज्ञानभाषा झाली असल्याने आपणास आता भाषांतर–प्रक्रियेचा अवलंब करावा लागत आहे. ग्रामीण भागातील जनतेला ज्ञानविज्ञानाची ओळख करून देण्यासाठी आपल्याला प्रादेशिक

भाषांमधून ग्रंथनिर्मिती करावी लागणार आहे व त्यासाठी नवी शास्त्रीय परिभाषा घडवणे गरजेचे आहे.

प्रशासनिक परिभाषेमध्ये शब्दांना निश्चित अर्थ असतो. त्या-त्या विशिष्ट क्षेत्रातील व्यवहारमान्य अनुभव व तथ्य व्यक्त होतील, त्याहून वेगळा किंवा त्याच्याच जोडीला दुसरा निष्कर्ष निघणार नाही अशी अर्थनिश्चितता हे या भाषेचे वैशिष्ट असते. या भाषेतून संदेह निर्माण होणार नाही याची काळजी घेतलेली असते. हे शब्द एकार्थवाचक असतात. पारिभाषिक शब्दांच्या अर्थाला काटेकोरपणा असतो. प्रशासनात या काटेकोरपणाला विशेष महत्त्व असते. कारण येथे परिभाषा हीच विचारांचे साधन असून तिच्या वापरातील चूक ही संदेशन व्यवहारातील अडसर बनू शकते. विचार प्रक्रियेतील चूक ठरू शकते. त्यामुळे परिभाषा निर्मिती हे आता एक शास्त्र बनले आहे.

**प्रशासनिक परिभाषा शब्द:**

| | |
|---|---|
| Adjournment - स्थगन | Administration - प्रशासन |
| Ambassador - राजदूत | Amendment - दुरूस्ती, सुधारणा |
| Ballot paper - मतपत्रिका | Bilateral - द्विपक्षीय |
| Budget - अर्थसंकल्प | Bureau - ब्यूरो, कार्यालय केंद्र |
| Bylaw - उपविधी | Bureaucracy - नोकरशाही, अधिकारी वर्ग |
| By-legislation - उपविधान | By-election - पोटनिवडणूक |
| Cabinet - मंत्रिमंडळ | By lot - चिठ्ठया टाकून |
| Centre - केंद्र | Central Government - केंद्र सरकार |
| Chairman - सभापती | Constituency - निर्वाचन क्षेत्र, मतदार संघ |
| Clause - खंड | Veto - नकाराधिकार |
| Visa - पारपत्र | Vote of Confidence - विश्वासदर्शक मत |
| Walk out - सभात्याग | Withdrawal of motion - प्रस्ताव मागे घेणे |
| Whip - प्रतोद | Zero Hour - शून्य काल |
| Decorum - सभ्याचार | Constitution - घटना, संविधान |
| Dissolution - विसर्जन | Cut Motion - कपात प्रस्ताव |
| Elected - निर्वाचित<br>Emergency - आणीबाणी | Embassy - राजदूतावास<br>Enact - अधिनियमित करणे |
| Gallary - वीथी, गॅलरी | His Excellency - परमश्रेष्ठ |
| Interium - अंतरिम | Legislative Assembly - विधानसभा |
| Legislature - विधान मंडळ | Legislative Council - विधान परिषद |
| Mandate - जनतादेश | Manifesto - जाहीरनामा |
| Ministry - मंत्रालय | Member of the Parliament - संसद सदस्य |
| Parliament - संसद | Minutes १. (मंत्र्याची) टिप्पणी २. कार्यवृत्त |
| Preamble - भूमिका | No Confidence motion - अविश्वास प्रस्ताव |
| Secretariat - सचिवालय | Ordinance - अध्यादेश, वटहुकूम |
| Section - कलम | Security Officer - सुरक्षा अधिकारी |
| Booklet - पुस्तिका | Starred Question - तारांकित प्रश्न |
| Unanimous - सर्व संमत | Unconstitutional - असंविधानिक |
| Calender - दिनदर्शिका | Annual Report - वार्षिक अहवाल |

| | |
|---|---|
| Council - परिषद | Speaker - अध्यक्ष, सभापती |
| Declaration - घोषणा | Editor - संपादक |
| Eligibility - पात्रता | Examiner - परीक्षक |
| Expert - तज्ज्ञ | Grant - अनुदान |
| Income Tax - आयकर | High Court - उच्च न्यायालय |
| Journalist - पत्रकार | Head Office - मुख्य कार्यालय |
| Receipt - पावती | Dictionary - शब्दकोश |
| Epic - महाकाव्य | Folk lyric - लोकगीत |
| Style - शैली | Translation - भाषांतर |
| Telegram - तार | Board- फलक |
| Ministry - मंत्रालय | Photography - छायाचित्रण |
| Speech - भाषण | Vice Chancellor - कुलगुरू |
| University - विद्यापीठ | Social welfare - समाजकल्याण |
| Trophy - करंडक | Typewriting - टंकलेखन |
| Salesman - विक्रेता | Seminar - चर्चासत्र |
| Permanent - कायम | Public Relations Officer - जनसंपर्क अधिकारी |
| Merit - गुणवत्ता | Polling Officer - मतदान अधिकारी |
| Monthly - मासिक | Golden Jubilee - सुवर्ण महोत्सव |
| Industrialist - उद्योगपती | Correspondence - पत्रव्यवहार |
| Daily - दैनिक | Cabinet - मंत्रिमंडळ |
| Discount - सूट, सवलत | Ballot paper - मतपत्रिका |
| Cashier - रोखापाल | Committee - समिती |
| Computer - संगणक | Efficiency - कार्यक्षमता |
| Absence - अनुपस्थिती | Calligraphy - सुलेखन |
| Action - कार्यवाही/कृती | Affidavit - शपथपत्र |
| Census - जनगणना | Agent - अभिकर्ता |
| Category - प्रवर्ग | Application Form - आवेदनपत्र |
| Corporation - महामंडळ, निगम | Anniversary - वर्धापनदिन |
| Daily Allowance - दैनिक भत्ता | Commentator- समालोचक |
| Dismiss - बडतर्फ | Bio-data - स्व-परिचय |
| Due Date - नियत दिनांक | Bonafide Certificate - वास्तविकता प्रमाणपत्र |
| Mortgage - गहाण, तारण | Daily Wages - दैनिक वेतन, रोजंदारी |
| Exchange - देवाण-घेवाण | Book Stall - पुस्तकविक्री केंद्र |
| No Objection - ना हरकत | Documentary - माहितीपट |
| Certificate (NOC) - प्रमाणपत्र | Medical Examination - वैद्यकीय तपासणी |
| News Agency - वृत्तसंस्था | Express Highway - द्रुतगती महामार्ग |
| Event - घटना | Official Record - कार्यालयीन अभिलेख |
| Exhibition - प्रदर्शन | Overtime - अतिरिक्त काल |
| Orientation - उद्बोधन | Book post- डाक पुस्तक |
| Fellowship - अधिछात्रवृत्ती | Government Letter - शासकीय पत्र |
| Goodwill- सदिच्छा | General Meeting - सर्वसाधारण सभा |
| Half Yearly - अर्धवार्षिक | Honorable - माननीय |
| Humanism - मानवतावाद | Index - अनुक्रमणिका |

| | |
|---|---|
| Initials - निर्देशसूची | Joint Meeting - संयुक्त सभा |
| Journalism - पत्रकारिता | Junior Clerk - कनिष्ठ लिपिक |
| Lecturer - अधिव्याख्याता | Translator - अनुवादक / भाषांतरकार |
| Senior Clerk - वरिष्ठ लिपिक | Letter-Head - नाममुद्रित प्रत |
| Labour Court - कामगार न्यायालय | Show Cause Notice - कारणे दाखवा नोटीस |
| Sourvenir - स्मरणिका | Supervisor - पर्यवेक्षक |
| Valuation - मूल्यांकन | Verbal - शाब्दिक |
| Workshop - कार्यशाळा | Wall Paper - भिंतीला चिकटवण्याचा कागद |
| Up-to-date - अद्ययावत | Yard - आवार |
| Zone - परिमंडळ, विभाग | Open Letter - अनावृत्त पत्र |
| Programme - कार्यक्रम | Patent - एकस्व/अधिहक्क |
| Pocket Money - हातखर्च | Part Time - अंशकालीन, अर्धवेळ |
| Quorum - गणसंख्या | Press Note - प्रसिद्धीपत्रक |
| Qualitative - गुणात्मक | Registered Letter- नोंदणीकृत पत्र |
| Reservation - आरक्षण | Revaluation - पुनर्मूल्यांकन |
| Lesson Note - पाठ टिपणी | Receptionist - स्वागतकार |
| Service Book - सेवापुस्तक | Secretary - सचिव, कार्यवाह |
| Tax - कर | Trade Mark - बोधचिन्ह |
| Mobile - भ्रमणध्वनी | Unauthorized - अनधिकृत |

## ३.आ.१ कोश संकल्पना

**प्रस्तावना:**

प्रत्येक माणसामध्ये वस्तूंचा संग्रह करण्याची एक सहज प्रवृत्ती असते. कधी माणूस पैशांचा संग्रह करील तर कधी त्याच्या आवडीच्या वस्तूंचा संग्रह करील. या संग्रह करण्याच्या वृत्तीमागे स्वत:च्या गरजा भागविण्याचा जसा हेतू असतो, तसा भविष्यकाळासंबंधीचा किंवा सुरक्षितता संबंधीचा विचार असतो. माणसाच्या भाषेच्या बाबतीत बोलायचे झाले तर, प्रारंभी माणसाने कधी हावभावाची तर कधी स्पर्शाची, तर कधी खुणांची साधने वापरून आपल्या भावना व विचारांची देवाणघेवाण केली असेल. पण या भाषासंकेतांना बदलत्या काळात स्थलकालाच्या मर्यादा पडल्या. ही संकेत साधने अधिक तर टिकावू व अधिक तर दूरवर पोहचणारी पाहिजेत यासाठी माणसाने लिखित भाषेचा शोध लावला. त्यासाठी तो अक्षर साधनांचा उपयोग करू लागला आणि लिहिणे, वाचणे अस्तित्वात आले.

भारतात ब्रिटिशांची सत्ता आल्यानंतर इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाला, ग्रंथरचनेला आरंभ झाला आणि त्याचबरोबर कोशनिर्मितीला चालना मिळाली. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली आणि इंग्रजांची राजवट सुरू झाली. राज्यकारभार सुकर होण्यासाठी, जनसंपर्काच्या प्रस्थापनेसाठी आणि व्यवस्थापनाच्या सोयीसाठी इंग्रजांना स्थानिक भाषेचे ज्ञान व एकंदर जीवनव्यवहाराचे आकलन अत्यावश्यक होते. आपली सत्ता टिकविण्याच्या दृष्टीने ब्रिटिशांना येथील भाषा व भूप्रदेश यांचे अधिकाधिक ज्ञान करून घेणे अपरिहार्य वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले व कोशवाङ्मय निर्मितीला उत्तेजन व प्राधान्य दिले. राष्ट्रीय पातळीवरील आणि प्रांत व जिल्हा पातळीवरील जी गॅझेटियर्स तयार

करून त्याधारे त्यांनी त्या त्या भूप्रदेशाची संस्कृती, लोकजीवन इत्यादी संबंधीची भरपूर माहिती उपलब्ध केली. मोल्सवर्थ, कँडी यांनी इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी कोश तयार केले. ती परंपरा आजतागायत चालू राहिली आहे. मराठी भाषेत आजवर निर्माण झालेले बहुविध कोश पाहिले म्हणजे मराठी भाषा कोशसंपन्न आहे, तशीच ती समृद्धही आहे याची खात्री पटते. कोणत्याही भाषेच्या समृद्धीचे व विकसनक्षमतेचे एक गमक त्या भाषेत निर्माण झालेल्या कोशवाङ्मयावरून आपल्या हाती येते.

## ३.आ.१.१ 'कोश' संज्ञेचा अर्थ

माणसाला लिखित भाषा अवगत होण्यापूर्वी परमेश्वरदत्त स्मरणशक्तीमुळे तो भाषेतील शब्दसंकेतांचे, शब्दांचे जतन, संग्रह करीत होता. हा संग्रह करीत असता विशिष्ट छंदांचा वा मात्रावृत्तांचा उपयोग करून सूत्रबद्ध रूपाने शब्द स्मरणात ठेवीत होता. पण लिहिण्याची कला अवगत झाली आणि माणसाला शब्दसंग्रह अधिकतर टिकावू स्वरूपात करण्याचे शस्त्र हाती आले. भाषा व्यवहारात, शब्द हा मूळ घटक असतो. संस्कृती जतन करण्यासाठी, त्या भाषेतील शब्दांचा संग्रह करणे आवश्यक ठरते. आणि यातूनच शब्दसंग्रहाची कल्पना प्रथम साकारली. संग्रह आणि कोश या दोघांचे स्वरूप मूलत: भिन्न आहे. संग्रह हा गाठोड्यासारखा किंवा पोतडीसारखा वस्तू साठविण्याचा एक भाग ठरतो तर कोशाला स्वत:चे असे एक स्वरूप, नियम व बांधणी असते. कोशासाठी संग्रह आवश्यक आहे हे विसरून चालणार नाही.

इंग्रजी भाषेत सर्व प्रकारच्या कोशवाङ्मयाला सर्वसाधारणपणे एकच शब्द वापरतात, तो म्हणजे 'Encyclopedia' हा होय. हा मूळचा ग्रीक शब्द आहे. Enkyklios Paideia (a circle of knowledge or instructions) असा आहे. या संज्ञेचा अर्थ सर्व विषयासंबंधी संकलित माहिती किंवा अनेक विषयांपैकी एकाच विषयातील सर्वसमावेशक माहिती असा आहे. अनेक विषयांचा एकत्रित व सूत्रबद्ध अभ्यास करण्यासाठी केलेली रचना हे कोशाचे प्रमुख अंग मानले आहे. ग्रीक भाषेतील Enkyklios Paideia हा शब्द, कोशवाङ्मयाच्या दृष्टीने अधिक सूचक मानला जातो. 'कोश' या शब्दाचा अर्थ य. रा. दाते प्रभृती लिखित शब्दकोशात खजिना, साठा, संग्रह, तिजोरी, खाण, वखार, देहातील अन्न, प्राण, मन,विज्ञान, आनंदमय असे आत्म्याचे आवरण, विषय, संज्ञा इत्यादींचे संग्रहयुक्त विवेचन करणारा ग्रंथ, निघंटु, शब्दसंग्रह, आवरण, पटल, पापुद्रा, अस्तर, म्यान, कोळी, कीटक इत्यादी. असा दिला आहे. वरीलपैकी अनेक अर्थ कोशवाङ्मयाचे स्वरूप स्थूलमानाने व्यक्त करतात.

कोश हा वाङ्मयाचा एक प्रकार आहे. कोश म्हणजे शब्दांचा, विविध माहितीचा वा ज्ञानांचा केलेला व्यवस्थित संग्रह. या वाङ्मयप्रकारास संस्कृतमध्ये कोश वा कोष असे म्हणतात. 'संग्रह करणे' या अर्थी असलेल्या कुश् वा कुष् या धातूपासून कोश वा कोष शब्द झाला असून संग्रह वा संचय असा, किंवा संग्रहाचे स्थान वा आधार असा त्याचा मूळ अर्थ आहे. व्यक्तीच्या वा राज्याच्या धनसंचयास कोश असा शब्द संस्कृतमध्ये रूढ आहे. तसेच तलवार, सुरा इ. वस्तू सुरक्षित ठेवण्याचे म्यान वगैरे साधन, असाही संस्कृतमध्ये कोश शब्दाचा अर्थ आहे. पदार्थांचा, वस्तूंचा, धनाचा, शब्दांचा, ज्ञानाचा वा कशाचाही संग्रह किंवा संग्रहाचे स्थान म्हणजे कोश होय. पण 'विषय व संज्ञा इत्यादींचे संग्रहयुक्त विवेचन करणारा ग्रंथ' हा अर्थ 'कोश' या शब्दाला अगदी जवळचा आहे.

कोशाला Encyclopedia असे नाव प्रथम १६व्या शतकात दिलेले आढळते. “मराठीमध्ये कोश या शब्दाला ‘ज्ञानचक्र' हा अर्थ जवळचा आहे. या शब्दामध्ये 'चक्र' हा शब्द वर्तुळ, त्रिज्या, व्यास, परीघ इत्यादी संबंधित संज्ञांची जाणीव करून देतो. ज्ञानचक्रामध्ये वाचक हा मध्यबिंदूच्या ठिकाणी स्थिर मानला आहे. कोशामध्ये संमिलीत सर्व ज्ञानशाखा या परिघावर स्थिर आहेत, असे मानले तर सर्व ज्ञानशाखा वाचकाला सारख्याच अंतरावर असल्याचे सूचित होते. 'चक्र' या आकृतीमुळे जगातील सर्व ज्ञानाची पूर्णता लक्षात येते. या बंदिस्त (closed) आकृतिबंधातून रेखीवपणा, सुरक्षितपणा व्यक्त होतो.” साहित्याच्या संदर्भात शब्दसंग्रह वा ज्ञानसंग्रह ज्यात केलेला असतो, असा ग्रंथ म्हणजे कोश होय. लिखित भाषेचा व ज्ञानाचा वाङ्मय वा साहित्य या स्वरूपात विशेष विस्तार होऊ लागला, म्हणजे कोशवाङ्मय साहित्याच्या अध्ययनाचे साधन म्हणून आवश्यक ठरते.

## ३.आ.१.२ कोशाचे स्वरूप

भाषा अभ्यासात शब्द हे मूलद्रव्य असते. कोश म्हणजे ज्ञानाचा आलेख, एका पिढीपासून नवीन पिढीपर्यंत ज्ञानप्रवाह नेण्याचे प्रभावी माध्यम असे म्हटलेले असते. मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासून ज्ञानाची प्रगती अखंड सुरू आहे. अज्ञानाच्या प्रांतात घुसून तेथील वस्तुस्वरूपे, विचारस्वरूपे धुंडाळणे, त्यांचा अभ्यास करणे व ज्ञानक्षेत्र विस्तृत करणे हा ध्यास प्रत्येक पिढीने आपापल्या परीने लावून घेतला आहे. कोश या संज्ञेमागे माहिती वा ज्ञान देण्याच्या उद्देशाने हेतूत: केलेली रचना ही संकल्पना आहे. समाजाच्या भाषिक व जीवन व्यवहाराच्या वेगवेगळ्या अंगांसंबंधीचे ज्ञान सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने कोशांची रचना केली जाते. कोश ही सर्वसाधारणपणे संपादित स्वरूपाची निर्मिती असते. कोश- रचनाकार प्रथम कोशाचे स्वरूप ठरवितो व त्याप्रमाणे कामाला लागतो. कोश पूर्ण करण्यासाठी लागणारी माहिती त्याला नाना ठिकाणाहून जमवावी लागते. यासाठी त्याला पूर्वी तयार केलेले कोश हाताळावे लागतात. कोशविषयासंबंधी प्रसिद्ध झालेली पुस्तके, नियतकालिके, वार्षिके, वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले लेख, संबंधित विद्वानांच्या मुलाखती इत्यादी अनेक मार्गांनी ही माहिती जमवावी लागते. प्रयत्नपूर्वक जमविलेली माहिती एकत्रित करून त्याची विषय व विभागवार मांडणी करून, नंतर त्यावर संपादकीय संस्कार करून, मुद्रणप्रत तयार करता येते. ही मुद्रणप्रत ग्रंथस्वरूपात आणण्यासाठी ग्रंथाचे निर्मिती तंत्र वापरावे लागते. छापखान्यातून कोश छापून तयार झाल्यावर या कोशाची संभाव्य गिऱ्हाइके, वाचनालये यांच्यापर्यंत हा ग्रंथ कसा पोहोचेल, याचा विशेष प्रयत्न करावा लागतो.

कोशाचे स्वरूप व व्याप्ती काय असावी यासंबंधी १९७४ साली प्रसिद्ध केलेल्या परिचय पुस्तिकेतील पुढील परिच्छेद महत्त्वाचा आहे. "एकाच शब्दकोशात साहित्याच्या प्रारंभ कालापासून आजपर्यंतचे आणि भिन्न भिन्न प्रदेशात व लोकसमूहात वापरले जाणारे शब्द एकत्र देण्यात आलेले असतात. त्यामुळे त्यांची उपयुक्तता निश्चित वाढते पण त्याचे स्वरूप मात्र अनिश्चित होते. प्रमाणभाषा व बोली यांचे स्वतंत्र कोश करण्याची शक्यता जोपर्यंत दृष्टिपथात नाही तोपर्यंत अशा प्रकारचे कोश होणेच अपरिहार्य आहे. शब्दसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्र शब्दकोशातील सामग्री विपुल आहे. काही महत्त्वाच्या उणिवाही आहेत, मुद्रणदोष आहेत, अनेकवेळा संदर्भाच्या जागी शब्द सापडत नाही, अर्थ देण्यात कच्चेपणा आहे. आज महाराष्ट्र शब्दकोश दुर्मिळ झाल्यामुळे तसेच मध्यंतरीच्या काळात मराठी शब्दसंपत्तीत फार मोठी भर पडलेली असल्यामुळे नव्या कोशाची फार मोठी आवश्यकता निर्माण झालेली

आहे." कोशाची आखणी करताना वरील धोरण सर्वसाधारपणे अवलंब करावययास हवा. कोशवाङ्मयाच्या निर्मितीमागील उद्दिष्ट संबंधीची सुधिर रसाळ यांची भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

१. माणसाची त्याच्यासह विश्वाबद्दलची जिज्ञासा किंवा कुतूहल ही जशी ज्ञानप्राप्तीमागील प्रेरणा आहे तशीच ती कोशनिर्मितीमागीलही प्रेरणा आहे. आपले कुतूहल पूर्ण करण्यासाठी माणसाने कोशसंस्कृती निर्माण केली.

२. ज्ञानसंपादन आणि ज्ञानसंवर्धन याचे कोशवाङ्मय हे महत्त्वाचे साधन असून, कोशात ग्रंथित केल्या जाणाऱ्या ज्ञानाच्या आलेखातून ज्ञानप्रवाह एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत नेला जातो.

३. मानवाने प्राप्त केलेल्या एकूण ज्ञानाची माहिती जिज्ञासूला देण्याचे कार्यच केवळ कोश करीत नाही, तर तो ज्ञानसंवर्धनाला प्रेरणा देण्याचे कार्यही करीत असतो.

४. अभ्यासक किंवा संशोधक जेव्हा कोशातील नोंदींचे अवलोकन करतात तेव्हा काही नोंदींमुळे त्यांच्या मनात नवे प्रश्न निर्माण होतात. त्यांच्या संशोधनास, अभ्यासास नवी दिशा प्राप्त होऊ शकते. त्यामुळे ज्ञानसंवर्धनाची शक्यता निर्माण होते. म्हणून कोशवाङ्मय ज्ञानासंबंधीची माहिती देणे आणि ज्ञानसंवर्धनाला प्रेरणा देणे असे दुहेरी कार्य करीत असते.

५. सामान्य वाचकास वाचनीय आणि आकलनीय व्हावा आणि तज्ज्ञ अभ्यासकांनाही तो उपयुक्त ठरावा असे कोशाचे स्वरूप असले पाहिजे.

६. आपला वाचक कोण आहे हे कोशकाराने निर्मितीच्या पूर्वी निश्चित केले पाहिजे. कारण कोश कोणत्या प्रकारच्या वाचकासाठी तयार करण्यात येत आहे यावर त्याचे स्वरूप ठरत असते.

७. कोश हे विषयानुसार जसे भिन्न भिन्न प्रकारचे असतात तसेच ते वाचकानुसारही भिन्न भिन्न प्रकारचे असतात.

८. कोशामध्ये लिहिलेल्या नोंदी या वस्तुनिष्ठपणे लिहिलेल्या असाव्या लागतात. नोंदलेखकाची मते, त्याचा दृष्टिकोन नोंदीतून प्रकट होऊ नये. तसेच, नोंदीचे स्वरूप नवे संशोधन मांडणाऱ्या शोधनिबंधासारखेही असू नये.

९. नोंदीचा विस्तार नोंदविषयाच्या महत्त्वानुसार असतो आणि कोणती नोंद किती महत्त्वाची, याचा निर्णय ऐकून विषय, अपेक्षित वाचक, कोशकाराचा दृष्टिकोन आणि त्याने ठरवलेले कोशनिर्मितीचे उद्दिष्ट यांवर अवलंबून असतो.

१०. कोशाची भाषा सामान्य वाचकास आकलन होईल आणि तज्ज्ञाचेही समाधान होईल अशी असावी. नोंदीत तांत्रिक परिभाषेचा वापर वरील प्रमाणकानुसारच करावा.

डॉ. सुधिर रसाळ यांनी कोशवाङ्मयासंबंधी मांडलेली उपर्युक्त भूमिका योग्य आहे. कोश प्रामुख्याने सामान्य वाचकांसाठी असतात आणि काही कोश तज्ज्ञ वाचकांसाठी असतात.

सामान्य वाचकांसाठीचे कोश तज्ज्ञांना आणि तज्ज्ञांसाठीचे कोश सामान्य वाचकांना फारसे उपयोगी पडत नाहीत. विश्वकोश, चरित्रकोश, शब्दकोश,मार्गदर्शिका इ. कोश हे सामान्य वाचकांसाठी असतात. सूचिकोश, सारलेख-कोश हे अभ्यासकांसाठी, संशोधकांसाठी असतात. तज्ज्ञांसाठीच्या कोशांचे स्वरूप आणि भाषा सामान्यांसाठीच्या कोशांपेक्षा वेगळी असते. त्यातील नोंदी, माहिती, सारलेख यांत ज्ञानक्षेत्रातील पारिभाषिक संज्ञांचा वापर केला जातो. या पारिभाषिक संज्ञामागील संकल्पना, त्यांचे अर्थ केवळ तज्ज्ञांच्याच परिचयाचे असतात. अशा कोशात आलेख, संख्यात्मक तक्ते, आकृती यांचाही समावेश केलेला असतो." (कोश वाङ्मय विचार आणि व्यवहार, सदाशिव पेठ व प्रथमावृत्ती-२०१४, डायमंड प्रकाशन पुणे).

कोणत्याही भाषेत प्रथम शब्दकोश तयार होतात. आज कोशांचे जेवढे म्हणून प्रकार अस्तित्वात आहेत, त्यापैकी बहुतेक सर्व प्रकार मराठीत आहेत. मराठीतील एकंदर कोशांची संख्या अंदाजे हजाराच्या घरात जाईल. ज्ञानकोश/ विश्वकोश, शब्दकोश, चरित्रकोश, तिथिकोश, संख्यासंकेतकोश, सुविचारकोश, ग्रंथसूची, जंत्री आणि शकावली, निर्देशपुस्तके, निर्देशिका, वार्षिके व पंचांगे, भौगोलिक कोश-ग्रामसूची, गॅझेटियर्स असे कोशांचे निरनिराळे प्रकार मराठीत आढळतात. मराठीतील निव्वळ शब्दकोशांची संख्या ४००च्या घरात जाईल. संख्येने सर्वाधिक, उपप्रकारांत सर्वाधिक आणि सर्वांच्या परिचयाचा कोशप्रकार म्हणजे शब्दकोश होय. शब्दकोश हे भाषेच्या व साहित्याच्या अभ्यासाचे एक प्रमुख साधन आहे. मराठी भाषेतील शब्दकोश परंपरा फार उत्तम प्रकारची आहे. मराठीतील पहिला शब्दकोश म्हणजे विल्यम कॅरे यांनी १८१० मध्ये प्रकाशित केलेला 'मराठी-इंग्रजी कोश' (अ डिक्शनरी ऑफ दी मऱ्हाटा लँग्वेज). हा कोश पंडित विद्यानाथ (वैजनाथ शर्मा) यांच्या मदतीने तयार केल्याचे प्रस्तावनेत म्हटले आहे. वैजनाथ शर्मा हे कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम कॉलेजमधील मराठीचे प्रमुख पंडित होते. या कोशाची पृष्ठसंख्या ६५२ असून यात मराठी शब्द मोडी लिपीत व अर्थ इंग्लिश भाषेत दिला आहे.

दुसरा कोश ले. क. व्हान्स केनेडी या लष्करातील साहेबाने मुंबई येथे इ. स. १८२४ मध्ये प्रसिद्ध केला. या कोशाचे दोन भाग असून पहिल्या भागात मराठी शब्दांना इंग्लिश प्रतिशब्द देऊन दुसऱ्या भागात इंग्लिश शब्दांचे मराठी अर्थ दिलेले आहेत. कोशातील शब्दसंख्या आठ हजारपर्यंत आहे. शब्दकोशाचे एकभाषिक, द्वैभाषिक, विशिष्टकालिक, प्रादेशिक, पारिभाषिक, विशिष्ट लेखकनिष्ठ असे अनेक प्रकार संभवतात. ऐतिहासिक शब्दकोश, फारसी-मराठी कोश, ज्ञानेश्वरी शब्दभांडार, शासनाने, साहित्य संस्कृती मंडळाने व विद्यापीठांनी प्रसिद्ध केलेले परिभाषा कोश यासारखे काही कोश या सदरात मोडतात. यापैकी बरेच कोश द्वैभाषिक असून एकभाषिक कोशांची संख्या अगदीच तुटपुंजी आहे. म्हणून एक परिपूर्ण एकभाषिक कोश करणाऱ्या आजच्या कोशकाराला मोल्सवर्थ कोश व महाराष्ट्र शब्दकोश यांचा विचार अपरिहार्यपणे करावा लागतो. ह्या दोन्ही कोशांची रचना करताना त्या त्या वेळी उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा भरपूर उपयोग या कोशकारांनी केल्यासारखा दिसतो. निरनिराळ्या ठिकाणी माणसे पाठवून किंवा निरनिराळ्या संस्थांची मदत घेऊन ही शब्दसंपत्ती एकत्र केली आहे. त्या त्या वेळी उपलब्ध असलेल्या साहित्याचाही त्यांनी शब्दसंकलनासाठी उपयोग केला आहे.

कोश तयार करताना कितीतरी हेतूने शब्दकोश सिद्ध करता येतो. उदा. समानार्थी शब्दकोश विरुद्ध अर्थांचे शब्दकोश, भिन्न भाषातील समानार्थी शब्दकोश, ऐतिहासिक शब्दकोश असे कितीतरी हेतू मागे असू शकतील. अशी मांडणी करताना ते शब्द आपल्याला किंवा अभ्यासकाला सहजासहजी कशा पद्धतीने चटकन शोधून काढता येतील यासंबंधी एखादे तंत्र अवलंबावे लागते. इंगजीमध्ये शब्दकोश Alphabets प्रमाणे रचले जातील. तर मराठीमध्ये ही मांडणी अकारविल्ह्याने केली जाईल. विशिष्ट हेतूने, विशिष्ट कार्य साधण्यासाठी वस्तूंची व पदार्थांची मांडणी करावी लागते. त्यात जशी स्वत:ची सोय असते तशी त्याचा वापर करणाऱ्याची सोय असते. शब्दांचा, वाक्प्रचारांचा, म्हणींचा वा इतर संकल्पनांचा कोश रचना करण्यामागे एक निश्चित विचार असावा लागतो आणि त्या विचारांची मांडणी करताना त्यामागे एक तर्काधिष्ठित विचार असावा लागतो. कोशवाङ्मय म्हणजे एखाद्या विषयाचं ज्ञान देणारं पाठ्यपुस्तक नाही. परंतु कोशवाङ्मयात त्या-त्या विषयासंदर्भातील विशिष्ट माहिती एकत्रित संकलित केलेली असते आणि ती त्या विषयाच्या-ज्ञानशाखेच्या परिभाषेत असते. त्यामुळे त्या-त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यासाठी, त्यासंदर्भात अधिक जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी कोशवाङ्मय हे एक संदर्भसाधन आहे. कोशवाङ्मय हा एक ज्ञानमार्ग आहे. तेव्हा आजच्या आधुनिक युगात दुनियाभरची माहिती एका क्लिकवर आलेली असली तरी, त्यामुळे कोशवाङ्मयाची उपयुक्तता संपत नाही. तर ती आणखी व्यापक होत आहे.

## ३.आ.१.३ कोश रचनाविचार

मराठी कोशरचनेचा इतिहास फार संपन्न नसला तरी तसा निराशाजनक नाही. कोशसाधन उपयोगात आणण्यासाठी वाचकाला जी प्रेरणा मिळालेली असते, ती त्याच्या ज्ञानासंबंधी निर्माण झालेल्या कुतूहलापोटी असते. कुतूहल निर्माण झाल्यानंतर त्याने लगेच दर्शविलेली इच्छा ही त्यावेळीच तीव्रतर असते. या मनाच्या अवस्थेत, हवी असणारी माहिती मिळविण्यासाठी वाचक नेटाने प्रयत्न करतो व तो कोश हाताळू लागतो. त्याच्या मनाच्या या उत्तुंग अवस्थेत त्याची गरज भागवणे, ही कोश-वाङ्मयाची जबाबदारी आहे. आधुनिक कोशरचनेला एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रारंभ झाला असला तरी शब्दकोशाची गरज इतिहास काळातही जाणवत होती. जी काही त्रुटित हस्तलिखिते उपलब्ध झाली आहेत त्यावरून दिसून येते. यामध्ये ज्ञानेश्वरीतील पारिभाषिक संज्ञा तसेच महानुभावीय साहित्यातील व रामदासांच्या साहित्यातील संज्ञा यांचा मुख्यतः समावेश आहे.

विविध ज्ञानशाखांतील अद्ययावत आणि खात्रीची माहिती एकत्रित स्वरूपात संकलित करणं आणि त्या-त्या ज्ञानशाखांच्या विद्यार्थ्यांसाठी, समाजासाठी ती उपलब्ध करून देणं, हा कोशवाङ्मयाच्या निर्मितीमागचा मुख्य हेतू असतो. कोशांमध्येही वर्गवारी असते आणि त्याचे वेगवेगळे उपयोग असतात. उदाहरणार्थ, शब्दांचा संग्रह असलेले शब्दकोश आपल्याला त्या-त्या भाषेतील शब्दांची माहिती करुन देतात. म्हणींचा कोश असेल, तर भाषेतील म्हणी एकत्र उपलब्ध होतात. विश्वकोशासारखा उपक्रम आपल्याला जगभरातील विविध प्रकारची माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देतो. तर शासनाने प्रकाशित केलेले शासनव्यवहारकोश-पदनामकोश-राज्यशास्त्रकोश आपल्याला शासकीय व्यवहाराची भाषा शिकवतात. याचप्रमाणे कृषिकोश-यंत्रमागकोश-रसायनशास्त्रकोश त्या-त्या ज्ञानशाखेतील अस्सल माहिती उपलब्ध करून देतात. या माहितीच्या आधारे व्यक्ती आणि त्या-त्या

भाषिक समूहाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत, हा कोशवाङ्मयाच्या निर्मितीमागचा खरा हेतू असतो. कोणत्याही कोशाचे कथा अथवा कादंबरीप्रमाणे सलग असे वाचन सामान्यपणे केले जात नाही. वाचकास हवा असलेला संदर्भ सुलभपणे आणि शीघ्रतेने उपलब्ध करून देणे हे कोशाचे प्रमुख प्रयोजन समजले पाहिजे. वाचकांना या कोशाचा उपयोग करणे सोपे आणि सुलभ व्हावे या हेतूने माहिती असावी लागते.

आधुनिक काळात कोशलेखन करताना त्याच्या रचनाशास्त्राचा परिचय करून घ्यावा लागतो. कोशामध्ये लिहिलेल्या नोंदीचा अनुक्रम, हे रचनाशास्त्र लक्षात घेऊन करावा लागतो. वाचकाला हवी असलेली माहिती विनाविलंब मिळावी, यासाठी या माहितीची नोंद लिहिण्याची पद्धत व तिचा अनुक्रम स्पष्ट माहीत असला पाहिजे. कोश संपादक व वाचक या उभयताना ही पद्धत रेखीवपणे ज्ञात असेल, तर कोश वापरण्याच्या दृष्टीने सोईचा वाटतो. विशेषतः एकच वाचक अनेक प्रकारचे कोश वापरतो व आजकाल कोशही अनेक प्रकारचे असतात. त्यामुळे सर्वच ठिकाणी एकच सर्वमान्य अनुक्रम पद्धती उपयोगात आणणे आवश्यक ठरते. प्रत्येक कोशात लेखकाने स्वत:च ठरविलेला नोंदीचा क्रम देऊन, तो कोश प्रस्तावनेत स्पष्ट केला, तरी अडचणी निर्माण होतात. प्रत्येक कोशाची अनुक्रमपद्धती, त्यानंतर वाचकाला समजून घ्यावी लागेल व हवी ती माहिती शोधून काढावी लागेल. कोशरचनेमध्ये योजावयाच्या भाषेसंबंधी विशेष विचार करावा लागतो. विविध ज्ञानविषय संघटितरीतीने व्यक्त करावी लागणारी भाषा परिपक्व व प्रमाणित असावी लागते. संपूर्ण जगात निर्माण झालेले ज्ञान व्यक्त करण्यासाठी भाषेत आवश्यक तेथे परभाषेतील शब्द स्वीकारण्याची लवचिकता दाखवावी लागते. यासाठी आवश्यक असा समृद्ध परिभाषाकोश उपलब्ध हवा.

शब्दकोश हे एकट्या दुकट्याने करावयाचे काम नसून अनेक तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावयाचा एक प्रकारे सामूहिक ज्ञानयज्ञ आहे. बहुतेक वेळा कोश अतिशय अवजड असतात. ते अभ्यासासाठी हाताळणे कठीण असते व ते एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणे हे कष्टाचे काम असते. वाचनालयात संग्रही ठेवलेले कोशग्रंथ तेथेच हाताळावे लागतात; त्यामुळे त्यातील हव्या त्या नोंदी त्वरित मिळणे हा वाचकांचा आग्रह असतो. कोशवाङ्मय हे संदर्भसाहित्य प्रकारात येत असल्याने ते सलगपणे कोणीही वाचत नाही. ज्यावेळी एखाद्या घटनेची, वस्तुमात्राची अगर चरित्र्याची गरज वाचकाला भासते, त्यावेळी तो तेवढीच माहिती मिळविण्याच्या खटपटीत असतो. अशा वेळी नोंदी मिळविण्यासाठी अनुक्रमपद्धती समान असेल, तर त्याला हवी ती माहिती लवकर मिळेल. उत्तम ग्रंथालये, निरनिराळ्या क्षेत्रांतील विद्वानांचे सहकार्य व चांगले बौद्धिक व ज्ञानवर्धक वातावरण असलेला परिसर याही बाबी विचारात घ्यायला हव्यात. आदर्श कोश कसा असावा यासंबंधी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी १९०५ साली म्हणजे ९०-९५ वर्षांपूर्वी सरस्वतीमंदिर' मासिकात 'राष्ट्रीय मराठी कोश' या नावाचा एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी मराठी कोशाबद्दलची आपली कल्पना स्पष्ट केली आहे. ती अशी, कोश रचणाऱ्या व्यक्तीने या गोष्टी विचारात घेण्यासारख्या आहेत.

१) भाषेत रूढ झालेल्या नव्या व जुन्या, लुप्त व प्रचलित, ग्राम्य व सभ्य, राष्ट्रीय व प्रांतिक, एकूणएक मराठी शब्दकोश शब्दाचे संक्षिप्त, समर्पक व अव्याप्त-अतिव्याप्त-असंभवादि दोषरहित अर्थ दिले पाहिजेत.

२) मराठी शब्दांतील अक्षरांचे उच्चारयोग्य संकेत ठरवून द्यावेत.

३) कोणता शब्द कोणत्या भाषेतून आला ते संकेताने दाखवावे. हे काम कोशकाराला सुलभ व्हावयाला मराठीची समग्र व्युत्पत्ती अगोदर तयार झाली पाहिजे.

४) रूढ होऊन बसल्यामुळे जे सामासिक शब्द एका शब्दांसारखे भासतात त्याखेरीज इतर असंख्य सामासिक शब्द देऊ नयेत.

५) संहित शब्द देऊ नयेत. ते व्याकरणाचे काम आहे.

६) नामरूपे व धातुरूपे देऊ नये. ते व्याकरणाचे काम आहे.

७) ग्रधनामे, थोर पुरुषांची नामे, प्रसिद्ध स्थलांची नामे, पौराणिक पुरुषांची व स्थलांची नामे,

वनस्पतींची, धातूंची, द्रव्यांची, माशांची, दगडांची वगैरे पारिभाषिक नावे भाषाकोशात देऊ नये. व्यावहारिक नावे तेवढी द्यावीत. ग्रंथकोश, महन्नाममाला, स्थलकोश, पुराणकोश, वनस्पतिकोश, रसायनकोश, प्राणिकोश, मत्स्यकोश, पक्षिकोश, दृशत्कोश वगैरे कोश स्वतंत्र असतात. भाषाकोशात इतर शास्त्रातल्या व विषयातल्या विशेषनामांचा संग्रह अप्रस्तुत व अनवस्थ होय.

८) छंदशास्त्र, व्याकरणशास्त्र, उच्चारशास्त्र कोशात देण्याची जरूर नाही.

९) वाच्यार्थ व्यतिरिक्त लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ कोशात देऊ नयेत. जे लक्ष्यार्थक शब्द वाच्यार्थक शब्दांच्या स्थितीला आले ते अवश्य द्यावे.

१०) शब्दांचा उपयोग दाखविण्याकरिता ग्रंथातील वाक्यांचा उद्धार कोशात करू नये. हे काम कोशाचे नाही, साहित्यशास्त्राचे आहे.

११) भाषेत जो शब्द नाही तो कोशकाराने नवीन बनवून घालू नये. भाषेत जो शब्द आहे तो कोशकाराने वगळू नये.

१२) सभ्य शब्दाचा ग्राम्य उच्चार निराळा शब्द मानू नये. परंतु ग्राम्य शब्द रूढ झाल्यास निराळा स्वतंत्र शब्द मानावा.

१३) परधर्मीयांनी, परदेशस्थांनी व पतितांनी स्वभाषेतील किंवा परभाषेतील भ्रष्ट केलेले शब्द कोणत्याही राष्ट्रीय कोशात घेण्यास योग्य नाहीत."

आजच्या कोशरचनेची एकंदर दिशा पाहता यांतील काही गोष्टी मात्र स्वीकारार्ह ठरणार नाहीत. शब्दकोशाच्या बाबतीतील वाचकाच्या अपेक्षाही आज वाढलेल्या आहेत. आजचा वाचक दुर्बोध शब्दांच्या अर्थासाठी मुख्यत: कोशाकडे वळत असला तरी शब्दांचे लेखन, त्यापासून बनणारे साधित शब्द, व्याकरणविषयक व अन्य माहिती, त्यांचा उच्चार, क्रमाने अर्थ व अर्थांच्या पुष्ट्यर्थ अवतरणे, किमान एवढी माहिती आजच्या कोशाकडून मिळावी अशी अपेक्षा असते. अचूकपणा, नेमकेपणा, वस्तुनिष्ठता, बंदिस्तपणा व अद्ययावतता हे कोशीय माहितीचे आवश्यक गुणविशेष होत. यासाठी दरवर्षी किंवा दर पाचदहा वर्षांनी किंवा

अन्य प्रकारे, घटनांची समग्र परंतु संक्षिप्त माहिती पुरविणारी नियतकालिके, नियतकालीन पुरवण्या किंवा मूळ कोशाच्या नवीन सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या काढाव्या लागतात. मुद्रणाच्या किंवा बांधणीच्या प्रगत तंत्रांचा उपयोग करून घेणेही आवश्यक असते. कधी पृष्ठांची बांधणी पक्की न करता ती पृष्ठे विलग करता येतील व ठराविक काळानंतर पाठविण्यात येणाऱ्या पुरवण्या त्यांत योग्य जागी अंतर्भूत करता येतील, अशीही बांधणी केली जाते. कोशाचा बाह्य आकार आटोपशीर रहावा म्हणून अत्यंत बारीक टंकात त्याचे मुद्रण करण्याचा उपक्रमही करण्यात आला आहे.

कोशवाङ्मयाचे स्वरूप इंग्रजीमध्ये ज्याला For a while असे संबोधले जाते. आवश्यक माहिती त्वरित मिळाली की तो क्षण फलदायी झाला असे त्याला वाटते व कोश-साहित्यावरील त्याचा विश्वास वाढतो. कोशरचना पद्धतीत ज्ञात व अज्ञात विषयांचा विचार आवश्यक ठरतो. ज्ञात घटनांसंबंधी लेखकाने निश्चित स्वरुपाची व पूर्ण माहिती ठाशीवपणे देणे आवश्यक आहे. अज्ञात गोष्टीसंबंधी असा ठोस विचार मांडता येत नाही. तरीपण ज्ञात विषयांच्या संदर्भात अज्ञात गोष्टींचा उल्लेख करता आला तर वाचकांचे कुतूहल जागृत होईल व त्यांच्या शोधक वृत्तीला खाद्य मिळेल. मराठी कोशरचनेचा विचार केला तर संपादक मंडळात संस्कृत तज्ज्ञ, भाषावैज्ञानिक, वैय्याकरण, प्राकृत भाषांचे जाणकार, प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक साहित्याचे अभ्यासक हे तर पाहिजेत. पण ज्ञानविज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांतील तज्ज्ञ, तेही त्या त्या विषयात मराठीतून लेखन करणारे हवेत. एवढी सिद्धता झाल्यावर कोशरचनेला हात घालणे इष्ट होईल. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, कोणत्याही वाचकाची, माहिती मिळविण्याची उत्सुकता अत्युच्च पातळीवर एकदाच जाते व ती वेळ असते त्याच्यात प्रबळ इच्छा निर्माण होते तेव्हा ! त्याचवेळी ही गरज भागली नाही, तर त्याची उत्सुकता कणाकणाने कमी होत जाते व प्रसंगी ती नष्ट होते. कारण मधल्या काळात त्याच्या मनात दुसरे अभ्यासविषय प्रधान जागा घेऊन स्थिर होतात. इंग्रजीमध्ये Catch them young असे अनेकवेळा म्हटले जाते.

कोशाचे दोन मुख्य प्रकार असतात. पहिला प्रकार म्हणजे विशिष्ट विषयाचा व दुसरा प्रकार म्हणजे सर्व विषयसंग्राहक. कोशाचे चार वर्ग करता येतात १) शब्दकोश, २) विश्वकोश, ३) कोशसदृश वाङ्मय, ४) सूचिवाङ्मय. ' भारंभार माहितीतून आपणास हवी असलेली माहिती शोधून काढणे वाचकाला सुलभ आणि सोपे होणे हा सर्वांत मोठा सुलभ कोशरचनेचा फायदा होय. कोशाच्या चार वर्गातील मोठ्या प्रमाणात तयार केला गेलेला प्रकार म्हणजे शब्दकोश होय. शब्दकोश – हे एकाच भाषेचे वा द्विभाषिक वा बहुभाषिक स्वरूपाचे असतात. अशा शब्दकोशांतून अचूक अर्थाचा शब्द शोधता येतो. शब्दाला असणाऱ्या विविध अर्थ च्छटा यातूनच शोधता येतात. विशेषत: भाषांतरासाठी असे कोश उपयुक्त ठरतात. सन १८०० पूर्वीचे असे जे कोशमुद्रित होऊ शकले त्यात पुणे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेला जगन्नाथ बाळकृष्ण उगाऊकर यांचा 'ज्ञानेश्वरी टिपण' व शं. गो. तुळपुळे यांनी संपादित केलेला अप्पा काळेराव यांचा 'मराठी भाषेचा तंजावरी कोश' हे दोन कोश प्रमुख होत. नवीन शब्दसंकलनांचा व त्यांच्या अर्थनिश्चितीचा विश्वासार्ह भाग मानला जातो. लुप्त शब्दांच्या अर्थासाठी त्यांचे महत्त्व जसे आहे तसेच समाजाच्या निरनिराळ्या थरांतून आज लेखक निर्माण होत असल्यामुळे, त्यांच्या साहित्यातील शब्दांच्या अर्थासाठी तर अशा अवतरणांची विशेष गरज आहे. काही शब्दांच्या अर्थासाठी तर प्रत्यक्ष लेखकाकडूनच खुलासा मागवावा

लागतो. काही दलित लेखकांनी आपल्या ललित लेखनाच्या शेवटी शब्दार्थसंग्रह दिला आहे.

डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनीही आपल्या 'अभिनव मराठी शब्दकोशा'च्या पहिल्या खंडाच्या प्रारंभी आदर्श मराठी शब्दकोशाची कल्पना मांडली आहे. त्यांच्या मते, आदर्श शब्दकोशात १)शब्दसंग्रह २)शब्दांचे प्रमाण उच्चार ३) व्युत्पत्ती ४) समानार्थक प्रतिशब्द, संदर्भानुसार बदलणारे अर्थ किंवा अर्थाचे स्पष्टीकरण किंवा वर्णन अथवा चित्र. ५) प्रसिद्ध व लोकप्रिय लेखकांच्या ग्रंथातीला उद्धृते एवढ्या गोष्टी अपेक्षित आहेत. विशेष प्रसंगी चित्रे द्यावीत. साहित्यातील शब्दसंख्या मोठी झालेली असते किंवा सारखी वाढत असते, म्हणून त्या त्या भाषेतील शब्दांचा एकत्र व्यवस्थित संग्रह केलेला असतो; शब्दाचे अर्थ नीट रीतीने समजतील अशा पद्धतीने आणि त्या त्या भाषेतील वा अन्य भाषेतील शब्दांचे अर्थ समजावे, अशी त्यांची केलेली असते.

मराठी कोशवाङ्मयातील अत्यंत महत्त्वाची, ऐतिहासिक स्वरूपाची अद्वितीय कामगिरी म्हणजे श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी सिद्ध केलेला 'ज्ञानकोश' ही होय. ज्ञानकोश याचा अर्थ सर्व विद्याशाखांतील माहितीचा पद्धतशीरपणाने केलेला संग्रह. तो इथे नेमकेपणी पाहायला मिळतो. मराठीतील ज्ञानकोशांची संख्या आता शंभरच्या घरात गेली आहे. यामध्ये मुलांचे ज्ञानकोश, सर्वसंग्राहक कोश, विषयज्ञानकोश अशी भरपूर विविधता आहे. कोश रचना ही विद्वत्तेची सहकारी बँक असल्यासारखी आहे. याची रचना पाहता येथे अनेक विद्वान एकाच प्रकारच्या निर्मितिप्रकल्पाशी सहकार्य करतात व स्वत:च्या ज्ञानविषयाचा आशय सुसूत्रपणे, नेमून दिलेल्या शब्दसमूहात समर्थपणे ग्रंथित करतात. कोश संपादकाकडे या टीमचे नेतृत्व असते. संपादकाला अनुभव असा आहे व विविध विषय एकमेकात कसे गुंतलेले असतात याची जाणीव असावी लागते. कोशग्रंथ अनेकांनी लिहिलेला असल्यामुळे संपादकाची जबाबदारी वाढते. भाषेचा एकजिनसीपणा निर्माण करावा लागतो, संदर्भसूची परिपूर्ण कराव्या लागतात व अशा प्रकारच्या संपादकीय संस्कारांतून विश्वकोश एकजिनसी होतो. अशी घनता प्राप्त झाली की विश्वकोश 'ज्ञानकोश' बनतो. ज्ञानाच्या भिन्न भिन्न शाखांची निर्मिती होऊ लागली वा विविध प्रकारची माहिती वाढली, म्हणजे थोडक्यात विविध माहितीचा वा ज्ञानांचा संग्रह करण्याची आवश्यकता निर्माण होते; ज्ञानकोश तयार होऊ लागतात. त्यास विश्वकोशही म्हणतात. वाङ्मयाचा विस्तार होऊ लागल्यावर शब्दांच्या संग्रहाचे, त्यांच्या अर्थविशदीकरणाचे कार्य प्रथम होणे स्वाभाविक होते. यात शब्दांची व्युत्पत्ती, थोडक्यात व्याकरण, अनेक अर्थ, शब्दार्थाचे विवरण, विविध अर्थांचे आधार व त्यांचे संदर्भही देतात. शब्दार्थाच्या नुसत्या विवरणाने काम भागत नाही म्हणून चित्रे वा तक्तेही दिलेले असतात. बहुतेक सर्व देशांत, सर्व भाषांत शब्दकोश प्रथम निर्माण झालेले दिसतात. त्यानंतर जसजशी ज्ञानवृद्धी होते, जिज्ञासा वाढते, तसतशी विश्वकोश रचण्याची प्रवृत्ती निर्माण होते. अलीकडे रॅन्डम हाउस डिक्शनरी अथवा सेंच्युरी डिक्शनरी यांसारख्या कोशांत शब्दकोश आणि विश्वकोश यांचे संयुक्त स्वरूप आढळून येते.

कोशामध्ये मुख्यतः वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन असते. प्रत्येक राष्ट्रातील विश्वकोश वेगवेगळे होतात, त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे, स्वराष्ट्रांच्या माहितीला अग्रस्थान देणे आवश्यक असते व दुसरे म्हणजे, स्वराष्ट्राची ध्येयधोरणे, जीवनमूल्ये, आदर्श इत्यादींचा कोशातील मूल्यविषयक निर्णयावर प्रभाव पडतो. साम्यवादी राष्ट्रांच्या

विश्वकोशांवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम होतो. भांडवलशाही राष्ट्रांच्या विश्वकोशांवर त्यांच्या वैचारिक दृष्टीचा प्रभाव पडू शकतो. आपल्या राष्ट्राचे व संस्कृतीचे तत्त्वज्ञान अन्य राष्ट्रे व त्यांच्या संस्कृती यांहून कसे वेगळे व श्रेष्ठ आहे ते सांगणे, ही प्रतिज्ञाच कधीकधी स्पष्टपणाने उच्चारली जाते. राष्ट्राच्या तत्त्वज्ञानाचा व परंपरेचा परिणाम त्याच्या विश्वकोशावर होणे, यात गैर किंवा अस्वाभाविक असे काही नाही. याच कोशरचनेच्या मर्यादा म्हणता येतील किंवा तिची स्वाभाविक वैशिष्ट्ये मानता येतील. राष्ट्राची अस्मिता जागी करणे, ही प्रेरणाही कोशनिर्मिती मागे असू शकते.

विविध ज्ञानांची विशिष्ट पद्धतीने केलेली संघटना म्हणजे कोश होय. उपलब्ध ज्ञानाचे व्यवस्थापन आणि सुलभ रीतीने त्याच्या उपलब्धीची सोय, हे त्याचे उद्दिष्ट होय. अशा कोशाचे कार्य दोन प्रकारचे असते. एक म्हणजे, सामान्य नागरिकापर्यंत ज्ञान पोहोचविणे, त्याला अधिक सुबुद्ध करणे, त्याची ज्ञानजिज्ञासा प्रज्ज्वलित करणे आणि दुसरे म्हणजे, पूर्वज्ञानाचा संग्रह संशोधकांना परिचित करून देऊन पुढील संशोधनाला बैठक पुरवणे. ज्ञान या संकल्पनेत ज्या ज्या विषयांचा समावेश होतो, तेवढी कोशाची व्याप्ती होय. कोशवाङ्मय राष्ट्राच्या सांस्कृतिक अवस्थेचे प्रतीक असून समाजाची बौद्धिक वा सांस्कृतिक गरज ज्या प्रकारची असेल, त्या प्रकारच्या कोशवाङ्मयाची निर्मिती त्या त्या समाजात होते.

## ३.आ.१.४ कोश रचनेच्या पद्धती

कोशाचे चार वर्ग करता येतात १) शब्दकोश, २) विश्वकोश, ३) कोशसदृश वाङ्मय, ४) सूचिवाङ्मय. वाचकाला विविध प्रकारचे संदर्भसाह्य करणे, हा या चार प्रकारांचा उद्देश असतो. माहितीचे संकलन हे या सर्व वर्गांतील समान सूत्र असते. संकलनाच्या आणि मांडणीच्या पद्धतींत तेवढा फरक असतो. ज्ञानाचा संचय करणे आणि ते सुलभतेने उपलब्ध करून देणे, हे कोशाचे साध्य आहे. त्यासाठी एखादा विषय त्यात सहजपणे सापडला पाहिजे. म्हणूनच कोशरचनेत १) अकारविल्हे, २) विषयवार आणि ३) विषयवार पण तदंतर्गत अकारविल्हे अशा पद्धतींनी संकलन केलेले असते. यांपैकी प्रत्येक पद्धतीचे फायदे तोटे आहेत. वाचकांची सोय व माहितीची सुलभ उपलब्धता हे उद्दिष्ट लक्षात घेऊन त्यात तारतम्य व लवचिकपणा ठेवावा लागतो. वाचकाची ग्रहणशक्ती, त्याचे सामान्य ज्ञान यांचा विवेक करावा लागतो. अकारविल्हे रचना ही सामान्यत: सार्वत्रिक आहे. अधिक सोयीसाठी एकाच कोशाची भिन्न प्रकारांनी किंवा परिशिष्टे वगैरे जोडून मांडणी करण्याच्या पद्धतीचाही अवलंब केला जातो. शंकर गणेश दाते यांच्या मराठी-ग्रंथ-सूचीमध्ये (खंड १ व २, १९४३ व १९६१) सूचीची मांडणी- ग्रंथालय शास्त्रीय वर्गीकरणाप्रमाणे करून पुढे ग्रंथ-ग्रंथकारांचा समग्रपणे अकारविल्हे संदर्भकोश दिल्याने त्याची उपयुक्तता वाढली आहे. विश्वकोशात ज्ञानविषयांची सरमिसळ झाली, तरी त्याची मांडणी सहेतुकच अकारविल्हे केलेली असते. त्यामुळे वाचकाला अभिप्रेत असलेल्या विषयाबरोबर इतर विषयांकडेही त्याचे लक्ष वेधले जाते. विषयवार किंवा प्रकरणश: रचलेल्या कोशात वाचकाचा इतर विषयांशी असा सहजपणे संबंध येत नाही.

कधी कधी कोशाचे काम एक व्यक्ती एकहाती करते. परंतु दिवसेंदिवस कोशकार्याच्या वाढत्या व्याप्तीमुळे ते कार्य एकट्या दुकट्याच्या आवाक्यातले राहिलेले नाही. तथापि आपल्या व्यासंगाचा विषय घेऊन त्याच विषयाची कोशरचना एकट्याला करणे शक्य आहे.

बहुधा अनेकांच्या सहकार्याने हे काम केले जाते. कधी काही नियमित असा संपादकवर्ग नियुक्त करून त्याच्या द्वारे हे काम केले जाते. कधी बाहेरच्या त्या विषयातील तज्ज्ञाचे साहाय्य घेऊन कोशनिर्मिती केली जाते. कोशकार्य हा आता एक प्रकारचा सामूहिक ज्ञानयज्ञ झाला आहे. जुन्या काळामध्ये असे कार्य बहुधा राजाश्रयाने होत असे. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे कार्य मर्यादित कंपनी काढून लोकांच्या आश्रयाने पूर्ण केले. ज्या कोणाच्या आश्रयाद्वारे हे कार्य होते, त्याचाही परिणाम त्याच्या स्वरूपावर होत असतो. आता शासनाच्या द्वारे व अनुदानाने बरेच कोशकार्य होत आहे.

## ३.आ.१.५ कोश रचनेच्या विकासाचे स्थूल दिग्दर्शन

आधुनिक विचारांची सुरुवात युरोपमध्ये १८ व्या शतकात झाली. सर्वच अभ्यास विषयांना बुद्धिवादाची बैठक मिळू लागली. धर्मसत्ता व राजसत्ता यानी लादलेली बंधने शिथिल झाली व सर्व समाज मुक्त वातावरणात ज्ञानसाधना, ज्ञाननिर्मिती करू लागला. त्यामुळे Encyclopedia ही कोशवाङ्मयाला लाभलेली संज्ञा सर्वमान्य होऊन स्थिर झाली. मुक्त वातावरणात विचार करण्याची सुरुवात दिदरोच्या कोशापासून सुरू झाली, असे मानण्यात येते. त्याच्या मृत्यूनंतर १५ वर्षांनी फ्रान्समध्ये जी औद्योगिक क्रांती झाली, त्याला जी अनेक कारणे दिली जातात, त्यांपैकी एक कारण म्हणजे विश्वकोशाच्या निर्मितीमधून बुद्धिवंताचे झालेले परिपोषण हे आहे. माणूस या कोशात डोकावतो. या कोशातील माहिती अपुरी असेल तर माणूस आपल्यापेक्षा जास्त अनुभव असणाऱ्या माणसाला – म्हणजेच मोठ्या कोशाला संदर्भ म्हणून वापरतो. पण अखेरीस ही साखळी पद्धत अपुरी पडते किंवा ती तुटते. आपले कुतूहल पूर्ण होण्यासाठी माणसांनी कोशसंस्कृती निर्माण केली आहे.

पश्चिमी देशांत ख्रिस्तोत्तर पहिल्या व दुसऱ्या शतकांत कोशरचनेस सुरुवात झाल्याचे दिसते. नॅचरल हिस्टरी (इ.स.पू. सु. ७९–२३) हा प्लिनीचा सर्वांत जुना असा कोशरचनेचा प्रयत्न होता. ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर सेंट ऑगस्टीन व सेंट जेरोम यांनी ख्रिस्ती ज्ञानाच्या पुनर्घटनेचा पाया घातला. आठव्या-नवव्या शतकांत आणि नंतर अरबी भाषेत धर्म, नीती, तत्त्वज्ञान इ. विषयांवर कोशसदृश रचना होऊ लागली. पश्चिमी प्रबोधनकाळापासून सगळ्याच ज्ञानव्यवहाराला नवी प्रेरणा व दिशा लाभली. ज्ञानाचे संघटन व विशिष्ट विषयपर आणि सर्व विषयसंग्राहक कोशरचना यांबद्दलच्या संकल्पना याच काळात अधिक स्पष्ट होत गेल्या. सोळाव्या शतकापासून फ्रान्स, इंग्लंड इ. देशांत कोशरचनेस नव्याने चालना मिळाली. अठराव्या शतकातील दिदरोचा फ्रेंच विश्वकोश (१७५१–७२) एक फार मोठी क्रांतिकारक घटना मानली जाते. एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका (१७६७–७१) हासुद्धा विश्वकोशरचनेतील एक महत्त्वाचा टप्पा सूचित करणारा आणखी एक प्रयत्न होय. गेल्या दोन शतकांत पश्चिमी कोशरचनेत झपाट्याने प्रगती घडून आली. ज्ञानक्षेत्रांतील संदर्भ सेवेच्या विविध गरजा विविध प्रकारे पुरविणारे अनेकविध प्रकारचे कोश तयार होऊ लागले.

मराठी भाषेत कोशरचनेला खरी चालना इंग्रजी राजवटीत मिळाली. महानुभाव पंथीयांची कोशरचना आणि छत्रपती शिवाजीच्या आज्ञेवरून तयार करण्यात आलेला राज्यव्यवहार कोश यांसारखे तुरळक कोशरचनेचे प्रयत्न मराठीत पूर्वी झालेले होते. इंग्रजी राजवटीत सर्वच आधुनिक भारतीय भाषांत शब्दकोश व इतर प्रकारची संकलने तयार होऊ लागली. डॉ. श्री. व्यं. केतकरांच्या 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशासारखे' प्रयत्न आधुनिक भारतातील

सर्वविषयसंग्राहक कोशरचनेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा होय. स्वातंत्र्योत्तर काळात प्रांतिक भाषांना राजभाषेचे स्थान मिळाल्याने, त्याचप्रमाणे शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेचा स्वीकार करण्यात आल्याने, मराठी सह सर्व आधुनिक भारतीय भाषांत शासकीय पातळीवर आणि स्वतंत्रपणेही विविध प्रकारची कोशरचना होऊ लागली आहे.

कोशनिर्मितीचा इतिहास हा माणसाच्या निर्मितीएवढाच तसा जुना आहे. छपाईची कला प्रगत झाल्यानंतर कोश निर्मितीला गती आली. व आता या वाङ्मय क्षेत्राचा व्याप प्रचंड वाढला आहे. जीवनात आपले कुतूहल पूर्ण करावयाचे असेल, प्रश्न उपप्रश्नांची उत्तरे शोधावयाची असतील, आपले माहितीकेंद्र नेहमी वर्धित करावयाचे असेल तर माणसाला कोशवाङ्मयाशी जवळीक सतत ठेवायला हवी. अखेरीला छापील कोश, मनुष्यरूपी कोशांचे वर्धापित व पूरक अंग आहे.

## ३.आ.२ कोशाच्या नोंदी

कोशनिर्मिती हे समाजाला उपयुक्त असणारे काम असल्याने, समाजात कोशविषयासंबंधी असणारी मते, जाणिवा, त्यासंबंधीची कुजबूज, मतप्रदर्शन याची संपादकाला माहिती हवी. या विषयासंबंधी छापून आलेले लेख, परीक्षणे यांचाही संपादकाला उपयोग होतो. ज्ञानकोशाच्या नोंदलेखकावर तर एक फार मोठीच जबाबदारी असते. कमी जागेत, विशिष्ट आकृती-रचना बंधात नोंदलेखकाला नोंद करावी लागते. लेख किंवा पुस्तकाची व्याप्ती, रचना व आकार आणि त्यासाठी लागणारी साधने यांचे स्वरूप व कोशाच्या नोंदीसाठी लागणारी साधने यात फरक पडतो. आकृत्या, रेखाटने, कोष्टके, तक्ते, आलेख, चित्रे, छायाचित्रे यांचा उपयोग केल्याने विषय अचूक व नेमका व कमी शब्दात व्यक्त करता येतो. ही साधने वाचकांशी थेट संवाद साधू शकतात. मात्र विषयांच्या विवेचनासाठी वापरायची साधने, तंत्रे नोंदीसाठी आवश्यक ठरतातच असे नाही.

नोंद म्हणजे लेखाचा ग्रंथाचा सारांश नव्हे. नोंद ही नव्याने लिहिण्याची पद्धत आहे. नोंद विषयाशी निगडित असणाऱ्या विषयाचा संपूर्ण आवाका, खोली, व्यापकता, व्यामिश्रता, गुंतागुत लक्षात घेऊन नोंदीत नव्याने मांडणी करावी लागते. लेखक ज्या विषयावरची नोंद लिहिणार आहे, त्या विषयातला तज्ज्ञ आहे, त्याचा त्या क्षेत्रातला दीर्घानुभव लक्षात घेऊनच नोंदलेखक ठरविला जातो. त्याने त्या विषयाचा आवाका, त्यात निर्माण झालेले नवे नवे संशोधन, त्यावर झालेले वाद-विवाद, चर्चा, मतांतरे यांचा सर्व बाजूंनी विचार करुन नोंद लिहिणे आवश्यक असते, परंतु त्यात स्वत:ची मते लिहिण्याऐवजी अधिकृतता, विश्वसनियता, अद्ययावतपणा, ताजेपणा आणि सर्वस्पर्शी व्यापकता असायला हवी. अर्थात हे सर्व निर्माण होण्यासाठी संदर्भ साधनेच उपयोगात आणायला हवीत. त्यासाठी नोंदलेखक कोणत्या स्वरूपाची नोंद लिहीत आहे याची लेखकाला जाण असायला हवी. लेखकाने लिहिलेली नोंद, स्वीकृत करण्याच्या अगोदर, संपादक प्रथम ती नोंद पूर्ण वाचतो. यावेळी त्या लिखाणात काहीच बदल करीत नाही. वाचनाच्या दुसऱ्या फेरीत तो नोंदीतील त्रुटींची नोंद करतो, त्यातील आशय टिपतो, लेखनशैली तपासतो, लेखनातील आकृतिबंध लक्षात आणतो, या लिखाणात उचलेगिरी तर नाही ना, याचा तपास करतो. कायदेशीर बाबींचा उलगडा करून घेतो, व नंतरच ती नोंद हातावेगळी करतो. या नोंदीवर त्याला संपादकीय संस्कार करावे लागतात. नोंदीतील परिच्छेद योग्य आहेत का? त्यांचा अन्योन्यसंबंध,

सलगपणा स्पष्ट आहे का? वाक्यरचना संतुलित आहे का? त्यांतील शब्दरचना सुडौल आहे का? शुद्धलेखनात, व्याकरणात दोष राहिले नाहीत ना? व लेखनाला उपयुक्त असणारी सूची, प्रसूची दिली आहे ना? या पद्धतीने नोंदीचे परीक्षण केले जाते व नंतरच ती मुद्रणप्रतीमध्ये स्वीकारली जाते.

संहिता खंड, संहितेतील पूरक संदर्भ, ग्रंथसंदर्भ, परिभाषा, सुनिदर्शने वा सचित्रता आणि सूची हे विश्वकोशरचनेचे काही घटक होत. नोंदीमध्ये आकृत्या, तक्ते, आलेख, चित्र, रंगीत चित्रपत्र, दृक्श्राव्य माध्यमांचाही वापर करता येतो. त्यात जेथून हे साधन घेण्यात आले आहे, त्याचा संदर्भ देणे आवश्यक आहे. मात्र क्रमिक पुस्तकातील संदर्भ अपेक्षित नाहीत. संदर्भ हे नैमित्तिक नसावेत. इंग्रजीतील विशेषनामे उच्चारानुसार लिहिणे आवश्यक आहे. त्यात मंडळाकडून दुरुस्त्या केल्या जातात. नोंदीमध्ये वैयक्तिक संदर्भ नसावेत. नोंदीचे काम सोपवल्यानंतर ते विहित कालमर्यादेत पूर्ण करून देणे आवश्यक आहे. अलीकडे या नोंदी मराठी युनिकोडमध्ये टंकलिखित करून ज्ञानमंडळाकडे पाठवाव्या लागतात. नोंदीतील व्यक्तींचे नाव, स्थळांचे नाव, संकीर्ण शब्दांचे उच्चार, कंसात इंग्लिश उच्चाराचे देवनागरी रूप, नोंदीमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे. नोंद लेखनतज्ज्ञाकडून तपासली जाते. नोंदींचे अंतिम संपादन केले जाते. त्यानंतर ती प्रकाशित केली जाते. संहितेतील पूरक संदर्भही विश्वकोशातील एक अत्यंत महत्त्वाची अशी अंतर्गत यंत्रणा होय. कोशाच्या अनेक नोंदीतून विविध विषयांची माहिती वेगवेगळ्या रूपांत आणि भिन्नभिन्न दृष्टिकोणांतून वा हेतूंनी कमीअधिक मजकुरातून दिलेली असते. एखाद्या नोंदीतील विवेचनाच्या ओघात आलेला निर्देश ह्या कोशात अन्यत्र आलेल्या नोंदीचा निदर्शक असल्यास त्या निर्देशामागे विशिष्ट चिन्ह्यांकन विशिष्ट प्रकारे केले जाते. ह्या निर्देशातील शब्द वा शब्दावली विश्वकोशातील एका स्वतंत्र नोंदीचे शीर्षक असून सदर विवेचनाच्या प्रवाहात आलेल्या माहितीशी निगडित अशी अधिक माहिती ह्या स्वतंत्र नोंदीत मिळेल, अशी सूचना ह्या चिन्हांकनाने वाचकाला देण्यात येते. एखाद्या नोंदीखाली दिल्या जाणाऱ्या ग्रंथसंदर्भात दोन प्रकारच्या ग्रंथांचे संदर्भ असू शकतात : १) ती नोंद तयार करण्यासाठी वापरलेले संदर्भग्रंथ. २) त्या नोंदीतील विषयाच्या संदर्भात अधिक वाचन करावयाचे असल्यास त्यासाठी आवश्यक असलेले काही वेचक पुरक ग्रंथ. साधारणपणे हे ग्रंथसंदर्भ ग्रंथलेखकांच्या / संपादकांच्या आडनावांच्या वर्णक्रमानुसार दिले जातात. संदर्भग्रंथ देताना प्रथम ग्रंथकार / संपादकाचे नाव, ग्रंथनाम (सामान्यत: तिरप्या वा ठळक वेगळे या टंकात), ग्रंथाचे प्रकाशनस्थळ आणि शेवटी प्रकाशन वर्ष असा क्रम साधारणत: अनुसरला जातो.

नोंदी संपादित करण्यासाठी संपादन मंडळे नियुक्त करण्यात आली आहेत. या सर्व नोंदी लेखन करण्यासाठी चांगल्या लेखकांचा शोध घेण्यात येत आहे. लक्षावधी पृष्ठांचे लेखन, संपादन करण्याचे कार्य सुरू झाले आहे. हे कार्य पूर्ण झाल्याने ज्ञानाचा मोठा साठा आपल्या मराठी भाषेत येणार आहे. त्यामुळे या लेखनामध्ये अनेक लोकांचे सहकार्य आणि सहभाग आवश्यक आहे. ही फार मोठी संधी मराठी भाषेतून लेखन करणाऱ्यांसाठी उपलब्ध झाली आहे. या लेखन आणि संपादन कार्यासाठी आकर्षक मानधनही देण्यात येत असल्याने या कार्यातून चांगले अर्थार्जन करता येणे शक्य आहे. संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर रासायनिक, भौतिक प्रयोगशाळेप्रमाणे अनेक संस्था स्थापन झाल्या आहेत. त्या व्यतिरिक्तही इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, सी-मेट, सी-डॅक अशा अनेक विज्ञान संस्था स्थापन झाल्या आहेत. या सर्व नोंदी वैज्ञानिक संस्था या

कोशामध्ये घेतल्या जात आहेत. त्याचबरोबर शरीरक्रियाविज्ञान, शारीर, संग्रहालये, सांख्यिकी आणि सूक्ष्मजीवविज्ञान या विश्वकोशांचे लेखन कार्य सुरू झाले आहे. कोशाचा वाचक सामान्य व्यक्ती आहेत. तसेच पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक, अध्यापक यांच्यासाठी विश्वकोश संदर्भ साधन म्हणून आहे. विश्वकोशातील माहिती नेमक्या स्वरूपात असणे आवश्यक आहे. विश्वकोशातील मागील नोंदी वाचल्यानंतर लेखनाचा साचा काय असावा, हे लक्षात येते. कोशातील नोंदीमध्ये अद्ययावत माहिती असणे आवश्यक आहे. ती वस्तुनिष्ठ, समतोल असायला हवी. धर्म, जात, पंथ, लिंग, प्रदेश, पक्ष याविषयी पूर्वग्रहदूषितपणा नसावा. गणितातील मांडणी, कोष्टके आणि आकडेवारी ही अचूक असावी. शक्य तेथे प्राथमिक स्रोताचा आधार द्यावा. लेखन हे इतरांच्या लेखनाचे पुनर्मुद्रण नसावे, म्हणजेच ते वाङ्मयचौर्यापासून दूर असावे. मराठी कोश लेखनामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशातील शब्द वापरावेत. मात्र नव्या पारिभाषिक संज्ञा तयार करण्यास मज्जाव करण्यात आलेला नाही. त्या संज्ञा व्याकरणशुद्ध असाव्यात. कोशातील नोंदीचे स्वरूप हे लघु, मध्यम आणि दीर्घ असे निश्चित करण्यात आले आहे. लेखनावेळी निश्चित केल्याप्रमाणे शब्दमर्यादा पाळणे आवश्यक आहे. शब्दमर्यादा सांभाळून प्रस्तावना, सारांश, स्पष्टीकरण उदाहरणे आवश्यकतेनुसार देणे आवश्यक असते. अन्य नोंदीशी संबंधित नोंद असेल, तर मूळ नोंदीचा संदर्भ देऊन शब्दमर्यादा मर्यादित ठेवणे आवश्यक बनते.

अंतिम नोंदीचा मजकूर आणि तिच्याशी निगडित अशी सुनिदर्शने ही परस्परांना पूरक ठरत असतात; किंबहुना मजकूर आणि सुनिदर्शने ही नोंदींची अविभाज्य अंगे होत. कोशात ती आवश्यकतेनुसार कधी नोंदींच्या मजकुराबरोबर, तर कधी स्वतंत्रपणे चित्रपत्रांच्या (आर्टप्लेट्स) स्वरूपात समाविष्ट केलेली असतात. कोणत्याही गैरसमजाला जागा राहणार नाही, अशा प्रकारे प्रत्येक पारिभाषिक संज्ञेतून एकच एक अर्थ व्यक्त व्हावा, ह्या पारिभाषिक संज्ञा घडविण्यामागील हेतू असतो. कारण अशा काटेकोर अर्थाच्या संज्ञांमुळेच कोणत्याही विषयाच्या विवेचनात नेमकेपणा येऊ शकतो. महत्त्वाची माहिती एका दृष्टिक्षेपात कळावी, हा कोष्टके वा तक्ते ह्यांचा हेतू असतो. कोष्टकांत निरनिराळे स्तंभ पाडून त्या स्तंभांतून माहिती तिच्या स्वरूपानुसार विभागलेली असते व तशी ती एकेका स्तंभाखाली देणे वाचकांच्या दृष्टीने फारच सोयीचे असते. उदा., भारतातील भात पिकवणाऱ्या प्रमुख राज्यांतील भाताचे क्षेत्र व उत्पादन अमुक एका वर्षात किती झाले, ही माहिती वा मानवाने केलेल्या अंतराळ उड्डाणांचे ऐतिहासिक तपशील. उदा., यानाचे नाव, संबंधित अंतराळवीरांचा देश, त्या अंतराळवीरांची नावे, त्यांच्या अंतराळ उड्डाणाची तारीख इ. प्रत्येक ज्ञानघटक योजलेल्या शब्दमर्यादेत पण प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कौशल्य संपादकाला हवे.

कोशवाङ्मयासाठी अनेक नामवंत नोंदी लिहितात. या नोंदी तपासून, त्यामध्ये आवश्यक ते फेरफार करण्याची क्षमता संपादकाकडे हवी. अखेरीला निवड करताना कोणती नोंद महत्त्वाची, कोणती कमी महत्त्वाची, याचाही विवेक करणे आवश्यक ठरते. नोंद लिहून हाताशी आली तरी त्याच्यावर भाषिक संस्कार करावे लागतात. अनेक मंडळी आपापल्या विषयात पारंगत असतात. पण त्यांना कोशवाङ्मयासाठी लिहावी लागणारी नोंद लिहिता येईलच असे नसते. काही वेळा त्यांचे लिखाण टाकाऊ असते. ते न स्वीकारण्याची हिंमत संपादकाकडे हवी. आपला कोश कोण वाचणार आहे, त्याचा किती उपयोग होणार आहे, याची जाण संपादकाला हवी. सर्वसाधारणपणे कोणताही कोश त्या विषयातील तज्ज्ञांना

उपयुक्त ठरावा, तसेच तो कोश सर्वसामान्य वाचकानाही वाचनीय व्हावा, अशा पद्धतीने लिहावा लागतो. तसेच, वाचकामध्ये शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, राजकारणतज्ज्ञ, समाजसेवक इत्यादी नानाप्रकारचे लोक समाविष्ट असतात. अशा वाचकांच्या गरजा पूर्ण करणारे लेखन संपादकाला यश मिळवून देतात. अशी नोंद वाचकांची प्राथमिक गरज भागवणारी हवीच. पण या वाचनातून अभ्यासकाला जर संदर्भ ग्रंथाकडे जाण्याची अगर संदर्भासाठी अन्य नोंदी वाचण्याची स्फूर्ती निर्माण झाली तर अशा लेखनाचे सार्थक झाल्यासारखे होईल. कोशात नोंदी संकलित करताना भाषेच्या व्याकरणाकडे विशेष लक्ष द्यावे लागते. केवळ ऱ्हस्व-दीर्घ या फरकामधून एखाद्या नोंदीची जागा बदलू शकते. गेली १२५ वर्षे शुद्धलेखन सुधारणेची चळवळ मराठी भाषेत सुरू आहे. खरे तर ही चळवळ एक सातत्याने चालणारी घटना असणे, हे या भाषेच्या सोयीसाठी आवश्यक आहे. विकसनशील भाषा सतत बदलत जाते. तिचा उपयोग व्यापक प्रमाणावर झाला की, त्याप्रकारच्या लेखनात जाणवणाऱ्या अडचणी विचारवंतांच्या लक्षात येतात व पुन्हा एकदा शुद्धलेखन हा चर्चेचा विषय बनतो. या सर्व चळवळींचा परिणाम होऊन भाषा ही प्रमाणभाषा' बनत जाते. आजच्या सर्वच प्रगत भाषा या प्रकारच्या घडामोडींतूनच प्रौढ अवस्थेला पोहोचल्या आहेत.

संपादकाच्या अनुभवातून व भाषेच्या प्रभुत्वामधून विश्वकोशाची भाषाशैली तयार होत असते. याप्रकारच्या भाषेच्या स्वरूपाबद्दल 'साहित्याची भाषा' या ग्रंथात प्रा. भालचंद्र नेमाडे लिहितात, "प्रत्येक मानवी व्यवहार क्षेत्रागणिक भाषेचे स्वरूप बदलते. धार्मिक वाङ्मय, राजकीय चर्चा, हवामान खात्याची वृत्ते, वृत्तपत्रीय बातम्या, जाहिराती, शेअर बाजाराचे वर्णन इत्यादी प्रत्येक क्षेत्रानुरूप भाषेची खास रूपे प्रकर्षाने कार्य करताना आढळतात. या रूपांना आपण क्षेत्रनिर्देशक पदर म्हणू. या विज्ञानाच्या नोंदी लिहिताना भाषेची खास क्षेत्रनिर्देशके तयार होतात. खास लक्षणाविषयी ते पुढे म्हणतात – "कोणत्याही शास्त्रीय वाङ्मयात विवेकनिष्ठ अभिव्यक्तीला सर्वाधिक महत्त्व असल्याने सुस्पष्टता हे शास्त्रभाषेचे प्रमुख लक्षण ठरते. अर्थाच्या घटकांची तर्कसंगत मांडणी भाषेच्या रूपामधून पारदर्शक पद्धतीने व्यक्त व्हावी लागते. याचा अर्थ भाषा हे पूर्ण अर्थाने साधन म्हणून वापरलेले असते. अलंकरण, अनेकार्थत्व शास्त्रीयतेला हानिकारक ठरतात. वाक्यरचना अर्थानुसार असते. वाक्ये विचारांच्या घटकांशी पूर्णपणे संलग्न असतात. वाक्यावाक्यांतील संबंध तर्कसुसंगत मांडणीनुसार येतात. शब्दांचे पराकोटीचे विशिष्टीकरण झालेले असते. इतके की एका शब्दाचा एकच पूर्वनिश्चित अर्थघटक गृहित धरलेला असतो. शब्द आणि अर्थ यांचा एकास एक संबंध असतो. आणि तो सर्व विवेचनात एकच असतो. अतिव्याप्त, अतिसंकुचित, अस्पष्ट अर्थघटक शास्त्रीय शब्दांनी व्यक्त करता कामा नये." प्रा. नेमाडे यांचे वरील व्यापक निवेदन विश्वकोशाच्या भाषेला शब्दश: लागू पडते. कोशासारख्या संदर्भसाहित्याला विद्वत्तेची खोली व व्याप्ती काही कोशकारांनी नक्कीच निर्माण केली आहे. विशेषतः नोंदी लिहिणारे लेखक स्वत:च संशोधक असतील तर अशी नोंद हा एक शोधनिबंध ठरतो. विद्वानांची निर्मितिशक्ती अशा शोधनिबंधामध्ये अनुभवास येते. या लेखनाला ताजेपणाचा वास येतो.

## ३.आ.३ अकारविल्हे

मराठी भाषेत निर्माण झालेल्या कोशसाहित्यात नोंदी लिहिण्यासाठी बहुतेक ठिकाणी वर्णानुक्रम-पद्धत वापरली आहे. शब्दातील अक्षरांची रचना विशिष्ट क्रमाने करण्याची पद्धती

भाषाशास्त्राने रूढ केलेली आहे व ती सर्वमान्य असते. या रचनेला 'अकारविल्हे' असे म्हणतात. अकारविल्हे, वर्णक्रम, अक्षरानुक्रम, अक्षररचना, अकारानुक्रम, आल्फाबेटिकली असे प्रतिशब्द दिलेले आढळतात. अकारविल्हे ही अवलंबलेली पद्धत सर्वमान्य असेल व शास्त्रशुद्ध असेल, तर कोशाची उपयुक्तता वाढते. खरं तर, वर्णानुक्रम पद्धतीचा वापर रोजच्या व्यवहारातही वारंवार लागतो. जगातील भाषांच्या विचार करता एक महत्त्वाची समानता लक्षात येते, की सर्व महत्त्वाच्या वर्णमालांची सुरुवात 'अ' या अक्षराने येते. संस्कृत वैयाकरणी पाणिनी 'अ' हाच प्रथम वर्ण मानतो. भारतीय संस्कृतीत ॐ या ध्वनीला बरेच संकेत जोडले गेले आहेत. या ध्वनीत अ + ऊ + म् ही अक्षरे सामावली आहेत, व त्यात 'अ' हे प्रथम अक्षर आहे. इंग्रजीमध्ये 'अ' हे अक्षर A या चिन्हाने लिहिले जाते. फारशी भाषेत 'अ' अक्षराचे नाव 'अलिफ' आहे. तर ग्रीक भाषेत प्रथम आल्फा हे चिन्ह व त्यानंतर येणारे वर्णमालेचे अक्षर बीटा हे आहे, म्हणून वर्णानुक्रमाला इंग्रजी परिभाषाशब्द 'आल्फाबेटिकली' (Alphabetically) बनला. उदा. निवडणुकीसाठी मतदारांच्या याद्या या पद्धतीने केलेल्या असतात. दूरध्वनि-दर्शिका, शाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे क्रमांक, कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या याद्या, वाचनालयातील पुस्तकांची क्रमवार यादी इत्यादी अनेक ठिकाणी ही पद्धती अनुसरावी लागते. कोशवाङ्मयात शब्दकोशांचे महत्त्व खूपच आहे. येथील शब्दांचा अनुक्रम, ज्ञानकोश, चरित्रकोश, विषयकोश, व्यक्तिविशेषकोश यांमधील नोंदी सामान्यत: वर्णानुक्रमाने करतात. या पद्धतीने रचना केल्यास कोशातील आवश्यक ती माहिती विनासायास मिळू शकते, हा अनुभव सर्वांनाच येतो.

मराठी भाषेत वर्णानुक्रमासंबंधी स्पष्ट असे दंडक आजही मान्य झालेले नसल्यामुळे काही ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. मराठी वर्णमाला देवनागरी लिपीवर आधारलेली आहे. या लिपीमध्ये दिलेली वर्णरचना ही या भाषेतील वर्णानुक्रम ठरविण्यास पायाभूत ठरते. मराठी भाषा संस्कृतोत्पन्न आहे. पण संस्कृत वर्णरचना व मराठी वर्णरचना यांत फरक आहे. अकारविल्हे संबंधी मराठी भाषेत जाणवणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे दिसतात अ) अनुस्वार व विसर्ग यांना वर्णमालेत कोणते स्थान द्यावे ? ब) 'क्ष' व 'ज्ञ' ही वर्णमालेतील स्वतंत्र व्यंजने मानावीत का जोडाक्षरे समजावीत? क) 'ळ' हे स्वतंत्र व्यंजन आहे का? त्याचा वर्णनानुक्रम 'ह' या व्यंजनानंतर यावा किंवा त्याचा उच्चार 'ल' नजीकचा असल्याने 'ल' नंतर लगेच यावा? ड) 'ॲ', 'ऑ' यासारखे ध्वनी विशेषत: इंग्रजी भाषेच्या उपयोगितेमुळे मराठीत आले. स्वरमालेत त्यांचा वर्णानुक्रम कसा निश्चित करावा ? इ) 'ब्रह्म', 'हृद्य', 'ऱ्हस्व' यांसारख्या शब्दांमधून 'ह' हा वर्ण प्राधान्याने येतो. अकारविल्हे संबंधी मराठी भाषेत जाणवणाऱ्या अडचणी वरीलप्रमाणे असूनही खालील वर्णमालेचा वापर केला जातो.

### १. अकारविल्हे ठरविताना मराठीतील वर्णमाला:

**स्वर:** अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ॲ, ऐ, ओ, ऑ, औ, - (अनुस्वार), : (विसर्ग)

**व्यंजने:**

क, ख, ग, घ, ङ

च छ, ज, झ, ञ

ट, ठ, ड, ढ, ण

त, थ, द, ध, न

प, फ, ब, भ, म

य, र, ल, व

श, ष, स, ह,ळ

क्ष, ज्ञ.

मराठीत १४ स्वर व ३६ व्यंजने असे ५० वर्ण व त्यांचे उच्चार अंकलिपीत दिलेले असतात. वस्तुत: अ व अ: हे स्वतंत्र स्वर नाहीत. ते दोन ध्वनी आहेत. ते स्वरादी आहेत, किंवा स्वरानुवर्ती आहेत. यानंतर क्, ख, ग,...स्, ह,ळ, क्ष, अशी ३६ व्यंजने येतात. यातील क्ष = क्+ष आणि ज्ञ=द्+न+य ही संयुक्त व्यंजने आहेत. भाषेतील वर्णानुक्रम निश्चित झाल्यावर शब्दक्रम लावणे फारसे गुंतागुंतीचे नाही. दिलेल्या शब्दांतील आद्याक्षराचा विचार केला जातो व त्याचा क्रम वर्णानुक्रमाने निश्चित होतो. दोन शब्दांत आद्याक्षरे सारखी असतील तर दुसऱ्या क्रमांकावरील अक्षरांचा विचार करून शब्दक्रम वर्णमालेप्रमाणे निश्चित होतो. याच पद्धतीने दोन शब्दांतील पहिले दोन वर्ण समान असतील, तर तिसऱ्या स्थानावरील वर्णाचा क्रम ठरवून शब्दक्रम निश्चित करता येतो. शब्दक्रम ठरविण्याची ही पद्धत सुरुवातीला सुटसुटीत वाटत असली तरी ती नंतर गुंतागुंतीची ठरते. मराठीत १४ स्वर प्रथम लिहितात व नंतर पाठोपाठ ३६ व्यंजने लिहिली जातात. पण शब्दरचनेत स्वर व व्यंजने स्वतंत्रपणे येत नाहीत. व्यंजनात स्वर मिसळला की, नवीन अक्षर बनते. व्यंजन व स्वर यांच्या मिश्रणाने बाराखडी बनते. तसेच, दोन व्यंजने एकत्र येऊन जोडाक्षरे बनतात. व या जोडाक्षरांच्या स्वरांच्या मिश्रणाने नवीन बाराखड्या बनतात. या सर्व गुंतागुंतीचा वर्णानुक्रम कोशवाङ्मयात ठरवावा लागतो. 'अं' हा स्वतंत्रता मराठीतील बरेच कोशकार वर्णानुक्रमासंबंधी समान धोरण पाळीत नाहीत, व परिणामतः कोश उपयुक्ततेच्या दृष्टीने काहीसे कमी पडतात. काही कोशकार आपण मानलेला वर्णानुक्रम प्रस्तावनेत स्पष्ट करतात, पण मग प्रत्येक कोशाची प्रस्तावना समजून घेण्याचे काम वाचकाला करावे लागते. पूर्वी लिपी शिकविताना 'श्री' या अक्षराने सुरुवात करण्याची पद्धत होती. काही कोशातून ही परंपरा कायम ठेवली आहे, असे दिसते. यासारख्या विकल्पांतूनच वर्णानुक्रमासंबंधी गुंतागुंत आणखी वाढते. या अनुक्रमासंबंधी काही भाषाशास्त्रज्ञांनी विचार करून ही गोंधळाची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केला, असे या भाषेच्या इतिहासावरून लक्षात येते. प्रा. रा.श्री. जोग यांनी 'मराठी वर्णमालेतील अनुपूर्वी' हा लेख (महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष ३१, अंक १२२, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९५७) लिहून मराठी भाषेत वर्णानुक्रमासंबंधी जाणवत असलेल्या त्रुटींचा अभ्यास केला. हे अराजक संपुष्टात आणावे, या हेतूने त्यांनी काही सूचना केल्या व निश्चित वर्णानुक्रम तयार करावा असा आग्रह धरला. या बरोबरच मो.रा. वाळंबे यांनी मराठी सूची व कोशवाङ्मय यातील वर्णानुक्रम-पद्धती हा सविस्तर व अभ्यासपूर्ण शोधनिबंध लिहिला. या सर्व अभ्यासाच्या परिणामस्वरूप कोशवाङ्मयाला लागणारी वर्णानुक्रमपद्धती बरीचशी सुटसुटीत व उपयुक्त झाली आहे. यातूनच गोंधळाची परिस्थिती कमी झाली. त्यानी मांडलेले विचार कोशरचनाकारांना ते पोषक ठरले आहेत.

## ३.आ.४ सूची वाङ्मय

परमेश्वराने बुद्धीची देणगी दिली ती वापरून महामानवांनी ज्ञानाचा प्रचंड साठा निर्माण केला आहे. हे ज्ञान सुरक्षितपणे पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे, ज्ञान विषयांची विभागणी, उपविभागणी करून ते शास्त्रीय पद्धतीने नोंदविणे हा आणखी एक ज्ञानविषयच झाला आहे. या शाखेला सूची असे म्हणतात. कोणत्याही ज्ञानशाखेचा पद्धतशीरपणे अभ्यास होऊ लागला म्हणजे संग्रह, सूचीकरण इ. प्रक्रिया आवश्यक ठरतात. सूची ही अभ्यासाची सुरुवात आहे. सूची हा शब्दही मराठीत सैलपणाने वापरला जातो. सूची या शब्दाचे विविध अर्थ शब्दकोशांत आढळतात. लिखित ज्ञानाची माहिती ग्रंथांत साठविलेली विषयरूप यादी, संदर्भग्रंथांची यादी, एखाद्या विषयावरील पुस्तकांची यादी किंवा एखाद्या लेखकाच्या पुस्तकांची यादी या अर्थाने सूची हा शब्द वापरलेला दिसतो. निर्देश, उल्लेख, असाही सूचीचा अर्थ आहे. मानवाला ज्ञात असलेले सर्व ज्ञान, आहे असे मानले, तर या विशाल व व्याप्त ज्ञानसंग्रहात वाचकाला इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी वाट दाखवणारी 'मार्गदर्शिका' असाही सूचीला अर्थ जोडला आहे. 'ग्रंथावली' असाही भारदस्त व स्वतःचे वेगळेपण व्यक्त करणारा शब्द यासाठी काही तज्ज्ञ वापरताना दिसतात. सूचीचा एक अर्थ सुई, टोक असा आहे. सुईच्या अग्राने जसा एक बिंदू निर्देशित करता येतो, तसे सूचीने ग्रंथाचा स्पष्ट निर्देश करता येतो. इंग्रजी भाषेत सूचीसाठी वापरला जाणारा पारिभाषिक शब्द Bibliography असा आहे. Biblios and graphia या दोन शब्दांपासून हा जोड शब्द बनला. हे दोन्ही शब्द हिब्रू भाषेतून आलेले आहेत असे भाषातज्ज्ञांचे मत आहे. छपाईची कला जेव्हा पूर्वी अवगत नव्हती, तेव्हा पुस्तके हस्तलिखित स्वरूपात लिहून घेत. Bibliography या शब्दाचा मूळ अर्थ, ग्रंथाची हस्ताक्षरातील प्रत तयार करणे असा आहे. कालाच्या ओघात गरजेप्रमाणे हे अर्थ बदलत गेले. सूचीला जवळीक दाखवणारे किंवा तशीच अर्थच्छटा असणारे शब्द आहेत : catalouge, compilation, list of books, directory, roster, glossary, docket, register इत्यादी. लेखक अशा वेगवेगळ्या शब्दांचा उपयोग आपल्या सोईप्रमाणे व आवडीनुसार करताना दिसतात.

सूची ही संज्ञा 'इंडेक्स' व 'कॅटलॉग' ह्या इंग्रजी संज्ञांसाठी मराठी पर्यायी संज्ञा म्हणून वापरली जाते. सूची ही सामान्यतः ग्रंथाच्या शेवटी दिली जाते, तर अनुक्रमणिका (टेबल ऑफ कन्टेंट्स) ग्रंथाच्या प्रारंभी दिली जाते. ग्रंथ, नियतकालिके यांच्या मजकुरात आलेली नावे, विषय इत्यादींची, त्यांचा उल्लेख असलेल्या पृष्ठक्रमांकांसह, वर्णक्रमानुसार केलेली यादी म्हणजे सूची होय. व त्यात ग्रंथातील प्रकरणांची शीर्षके, त्यांच्या आरंभपृष्ठक्रमांकासह दिली जातात. ग्रंथात ज्याची थोडीफार माहिती वा निर्देश असतील असे सर्व विषय व नामे पृष्ठक्रमांकांसह नोंदवून त्यांच्याकडे वाचकाचे लक्ष वेधते. एखाद्या ग्रंथाच्या अखेर येणारी त्या ग्रंथातील व्यक्ती, विषय व ग्रंथ यांची यादी, शब्दसूची, काव्यसंग्रहातील प्रथमचरणांची यादी, संदर्भपुस्तकांची यादी या सर्वांना सूचीच म्हटले जाते. ग्रंथातील निर्देशनोंदी अनेक प्रकारच्या असतात. त्यात अनेक विषय, व्यक्तिनामे, स्थलनामे, संज्ञा-संकल्पना, ग्रंथनामे, ग्रंथकारनामे, संकीर्ण बाबी वगैरे अनेक निर्देशांचा समावेश झालेला असतो. अर्थातच ग्रंथाच्या स्वरुपानुसार निर्देशनोंदींची संख्या व व्याप्ती ठरते, हे उघडच आहे. ग्रंथ, नियतकालिके व त्यांचे संच, वृत्तपत्रांचे संच, कोशवाङ्मय, संशोधनपर प्रबंध, माहितीसंकलक दप्तरे (इन्फर्मेशन फाइल्स) अशा नानाविध प्रकारच्या व स्वरुपाच्या मुद्रित वाङ्मयाची सूची

केली जाते व वाचकांना, अभ्यासकांना त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार ती उपयुक्त ठरते. ग्रंथाच्या वा अन्य मुद्रित वाङ्मयाच्या मजकुरात विखुरलेली एखाद्या विषयाची माहिती शोधण्यासाठी, ती मिळवून एकत्रित करण्यासाठी व त्या विशिष्ट निर्देशसंबद्ध माहितीचे, तपशिलांचे संकलन करण्यासाठी वाचकाला सूचीचा विशेषकरुन उपयोग होतो. एखाद्या ग्रंथात ठिकठिकाणी विखुरलेले निरनिराळ्या विषयांचे, कमी-अधिक माहितीचे निर्देश त्या ग्रंथाच्या कोणकोणत्या पृष्ठांवर सापडतील, हे दर्शविणारी संकलित यादी म्हणजे सूची होय. ह्या सूचीत असे निर्देश अकारविल्हे दिलेले असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक निर्देशासमोर तो जेथे सापडेल अशा पृष्ठांचे क्रमांक क्रमवार दिलेले असतात. ह्या सूचीच्या आधारे जिज्ञासू वाचक त्यांना हव्या असलेल्या विषयांवरील माहिती संबंधित पृष्ठे पाहून सहजपणे मिळवू शकतात. त्यासाठी संपूर्ण ग्रंथात त्यांना शोधाशोध करावी लागत नाही. त्या त्या ग्रंथाच्या वाचनाला मदत करणारी अशी ती माहिती असते. उदा. वैदिक संस्कृतीवरील एखाद्या ग्रंथात 'यज्ञ' ह्या विषयावर नेमकी काय आणि किती माहिती आली आहे, हे पाहण्याची जिज्ञासा ज्या वाचकाला असेल, तो त्या ग्रंथाच्या सूचीत वर्णानुक्रमे आलेला 'यज्ञ' ह्या निर्देश पाहून त्याच्यासमोर नोंदलेले पृष्ठांचे क्रमांक पाहील आणि त्या ग्रंथात यज्ञाविषयी आलेली माहिती मिळवील. अनेक छोट्या-मोठ्या ग्रंथांच्या अखेरीस वाचकांच्या सोयीसाठी अशी सूची दिलेली आढळते. ही निर्देशांची सूची असल्यामुळे हिला 'निर्देश-सूची' असेही म्हटले जाते. त्या दृष्टीने वाचकाच्या विशिष्ट, अपेक्षित गरजा नेमकेपणाने ओळखून त्याला उपयुक्त ठरतील अशा ग्रंथांतर्गत निर्देशनोंदी निवडणे व निश्चित करणे, त्यांच्यापुढे संबंधित पृष्ठक्रमांक आवश्यक तेथे 'अ'/'आ' अशा स्तंभनिर्देशांसह नोंदवून अशा निर्देशनोंदींची वर्णक्रमानुसार यादी तयार करणे व सूचीची अंतिम छपाई सिद्ध होईपर्यंत सूचीच्या मुद्रितांवर देखरेख करणे, अशा स्वरुपाची अनेकविध कामे सूचिकाराला पार पाडावी लागतात. सूचीच्या निर्देशनोंदीपुढे पृष्ठक्रमांक (स्तंभनिर्देशांसह) देणे अनिवार्यच असते. काही विशिष्ट प्रकारच्या सूचींमध्ये अन्य स्थान-निर्देशक (लोकेटर) वापरले जातात.

परंतु अशा प्रत्येक स्थळी सूचीचा अर्थ व प्रयोजन ही विशिष्ट स्वरूपाची असतात. त्या त्या ग्रंथाच्या वाचनाला मदत करणारी अशी ती माहिती असते. मराठी ग्रंथ-सूची (२ खंड, १९४३, १९६१), मराठी नियतकालिकांची सूची (१९६९), ज्ञानदेव-वाङ्मयसूची (१९६८). अशा ठिकाणी 'सूची'चा अर्थ वेगळा असतो. हे सूचीकार्य कोशकार्यासारखेच असते. काही विशिष्ट प्रकारच्या माहितीचे नियोजनपूर्वक केलेले ते संकलन असते. संदर्भोपयोगिता हे कोशवाङ्मयाचे प्रमुख गमक सूचिवाङ्मयातही आढळते. उदा. महाराष्ट्रीय संत-कविकाव्य सूची (१९१५), महाराष्ट्रीय वाङ्मय सूची (१९१९), महानुभाव महाराष्ट्र ग्रंथावली (१९२४), ग्रामसूची इत्यादी. सूची म्हणजे ग्रंथातील विशिष्ट विषयाच्या माहितीचा वा निर्देशाचा नेमका ठावठिकाणा सांगणारी, अचूक पत्ता देणारी एक प्रकारची निर्देशिकाच होय. परमेश्वराने बुद्धीची देणगी दिली ती वापरून महामानवांनी ज्ञानाचा प्रचंड साठा निर्माण केला आहे. हे ज्ञान सुरक्षितपणे पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे, ज्ञान विषयांची विभागणी, उपविभागणी करून ते शास्त्रीय पद्धतीने नोंदविणे हा आणखी एक ज्ञानविषयच झाला आहे.

प्रस्तुत अभ्यास घटकासाठी खालील ग्रंथ संदर्भ म्हणून उपयोगी आले आहेत. त्यामुळे वैयक्तिक लेखक व त्यांचा लेख यांचा निर्देश केलेला नाही.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न -** आपण हाताळलेल्या कोणत्याही कोशाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३.२ सारांश

एकूणच या घटकात आपण पारिभाषिक शब्द आणि कोशाची संकल्पना याविषयी विवेचन पाहिले आहे. प्रशासकीय क्षेत्रात अनेक विभाग येतात. आणि या विभागानुसार पत्रव्यवहार व कार्यालयीन कामकाजासाठी पारिभाषिक स्वरूपाचे शब्द वापरले जातात. ज्यामुळे या व्यवहारातील लेखन नोंदीतील एकार्थता, सुस्पष्टता जाणवेल हा हेतू त्यामागे असतो. त्यामुळे असे पारिभाषिक शब्द अत्यंत उपयोगाचे ठरतात. तसेच कोश संकल्पना विभागातून कोशाची रचना कशा स्वरूपाची असते, त्यातील नोंदी, अकारविल्हे हे कसे पाहता येतील याचे स्वरूप पाहिले आहे. एखादा कोश आपणास पहायचा असल्यास अकारविल्हे कशा पद्धतीने उपयोगी पडू शकतात, किंवा कोणकोणत्या विषयावरच्या नोंदी कोश वाङ्मयात मिळू शकतात हेही ध्यानात येते. एकूणच आपल्याकडेच कोशवाङ्मय हे समृद्ध वाङ्मय आहे. हा घटक अभ्यासल्यानंतर त्याचे उपयोजन सुलभ होते.

## ३.३ संदर्भग्रंथसूची


- दाते, य. रा. आणि कर्वे, चिं. ग., 'महाराष्ट्र शब्दकोश', विभाग १ ते ७, १९३२-१९५०, नवीन आवृत्ती, वरदा बुक्स, पुणे,१९८८, एशियन एज्युकेशन सर्व्हिसेस, मूळ कोशाची पुनर्मुद्रित आवृत्ती.
- कुलकर्णी, कृ. पा., 'मराठी व्युत्पत्ती कोश', शुभदा सारस्वत, पुणे, १९९३.
- कुलकर्णी, व. वि. 'मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची' (१८०० ते २००३), राज्य मराठी विकास संस्था, मुंबई (२००७).
- खानोलकर, गं. दे., 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक', प्रथम खंड, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, १९६६.
- चुनेकर, सु.रा., 'कोशरचना व मराठी कोशवाङ्मय', भाषा, साहित्य: संशोधन, म. सा. परिषद, १९८१,
- चुनेकर, सु.रा. पठारे, रंगनाथ, 'संशोधन : स्वरूप आणि पद्धती', शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर,१९८३.

- चुनेकर, सु.रा., 'सूची: स्वरूप शास्त्र इतिहास', आनंद साधले साहित्यसूची संकलन : उमा दादेगावकर या ग्रंथाची प्रस्तावना,मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे.
- जाधव, रा.ग., (संपा.) 'विचारशिल्प: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे निवडक निबंध', कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे.
- जोशी, लक्ष्मणशास्त्री (तर्कतीर्थ), 'मराठी विश्वकोश', खंड १ ते १७, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, वाई.
- टिळेकर, अरुण, 'मराठी कोशवाङ्मयाची निर्मिती का रोडावली?' लोकसत्ता, ८ सप्टेंबर, १९९६.
- सदाशिव, देव, 'कोश वाङ्मयविचार आणि व्यवहार', प्रथमावृत्ती २०१४, डायमंड प्रकाशन.


## ३.४ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) पारिभाषिक शब्द म्हणजे काय ते सांगून त्याची लक्षणे स्पष्ट करा.

२) 'कोश' ही संकल्पना स्पष्ट करा.

३) कोश रचनेतील 'अकारविल्हे' म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) सूची वाङ्मय

२) कोणतेही दहा पारिभाषिक शब्द व त्याचे अर्थ

३) 'कोश' संज्ञा

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पारिभाषिक शब्दाचे लक्षण - 'शब्दसौष्ठव' म्हणजे काय?

२) मराठीतील पहिला शब्दकोश १८१० मध्ये कोणी प्रकाशित केला?

३) डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनी कोणता कोश निर्माण केला?

*****

# ४

## प्रकल्प लेखन

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ प्रकल्प लेखनाच्या अभ्यासामागील भूमिका

४.३ प्रकल्प लेखन म्हणजे काय?

४.४ प्रकल्प लेखन स्वरूप

४.५ प्रकल्प लेखन मांडणी

४.६ सारांश

## ४.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील.

१. प्रकल्प लेखन म्हणजे काय समजू शकेल.

२. प्रकल्प लेखनाची संकल्पना आणि त्याची व्याप्ती समजू शकेल.

३. प्रकल्प लेखन करताना उपयोगी पडणाऱ्या संशोधन पद्धती यांची माहिती समजू शकेल.

४. प्रकल्प लेखनाची मांडणी कशा पद्धतीने केली जाते याची माहिती मिळेल.

५. प्रकल्प लेखनाचे अभ्यासातील असलेले महत्त्व समजू शकेल.

६. या सबंध सत्र अभ्यासक्रमात आत्मसात केलेल्या भाषांतर कौशल्य, संशोधन पद्धती याचा प्रत्यक्ष वापर कसा होऊ शकतो हे ध्यानात येईल.

## ४.१ प्रस्तावना

आजवर आपल्या गरजा भागविण्यासाठी मानवाने नवे नवे शोध लावलेले आहेत. या शोधांमध्ये जाणवणारी कमतरता भरून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने संशोधन केले जाते. आपल्या दैनंदिन आयुष्यात आपण नेहमी संशोधन करत असतो. कोणतीही कृती करत असताना त्या संबंधी चिकित्सकपणे त्याचा अभ्यास करत असतो. एखाद्या नेमून दिलेल्या कामासाठी काही गोष्टी शोधावयाच्या असतील त्यावेळीही आपण संशोधनच करत असतो. आपण दररोज ज्या प्रकारचे संशोधन करत असतो आणि ज्या प्रकारचे संशोधन तुम्ही करणार आहात त्यामध्ये सूक्ष्म फरक असलेला दिसून येतो. इथे आपल्याला आपल्या संशोधनाची शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी करावी लागते.

संशोधन हा शब्द प्रामुख्याने पदवी पातळीवर पोहचल्यावरच हळूहळू समजू लागतो. तसेच अभ्यास आणि संशोधन यातील मूलभूत फरक समजून येतो तो पदवी पातळीवर. संशोधनातून काहीतरी नवीन मांडण्याचा प्रयत्न होत असतो. माहितीच्या जगामध्ये भर घालण्याची एक संधी तुम्हाला संशोधनाच्या आधारे मिळत असते. संशोधनामध्ये नवीन माहिती प्रकाशात आणण्याचे, त्याचबरोबर काहीतरी शोधून काढण्याचे सामर्थ्य असते. आपण काय करावे, आपण काय करू शकतो, आपण ते कसे करणार आणि आपण ते किती चांगल्या पद्धतीने केले आहे हे ठरवण्यात संशोधनाची भूमिका ही मध्यवर्ती असू शकते. एकवेळ संशोधन हे आपल्यासमोर निर्माण झालेल्या समस्यांचे उत्तर नसले तरी कठीण समस्या हाताळण्याची सुरूवात करण्यासाठी आवश्यक माहिती आपल्याला त्यातून मिळते.

## ४.२ प्रकल्प लेखनाच्या अभ्यासामागील भूमिका

आपल्या पदवी अभ्यासक्रमामध्ये असा विषय का निवडला, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. अशा अभ्यासातून विद्यार्थ्यांची संशोधकीय दृष्टी पदवी स्तरावरच आकार घेऊ लागते. यातून विशिष्ट अशा कामाच्या संधी देखील निर्माण होतात. मुख्यत्वे पदवी पातळीवर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती जागृत असते. सतत नवे नवे काही तरी करण्याचा विचार मनात डोकावत असतो. विद्यार्थी सतत काही ना काही नवीन वाचत असतो, ऐकत असतो. त्यादृष्टीने अनेक विषय विद्यार्थ्यांसमोर येत असतात. त्यातून निर्माण झालेल्या नव्या प्रश्नांची उकल करण्यासाठी सतत विद्यार्थी प्रयत्नशील राहावा यासाठी असे विषय पदवी पातळीवर विद्यार्थ्यांना दिले जातात. त्यातूनच विद्यार्थी संशोधनाकडे सहजतेने वळू शकतो. यातूनच भाषांतर, रूपांतर, अनुवाद, शोधनिबंध लेखन, ग्रंथपरीक्षण या प्राथमिक पायऱ्या हाताळल्या जातात. विषयाला वेगवेगळे पुरावे देऊन सिद्धता करता यावी याकडे अधिक कल दिला जातो. प्रकल्प लेखनातून आपल्याला काय मांडायचे आहे व त्याला शास्त्रीय विचारांची बैठक कशी द्यावी हा विचार वाढीस लागावा, संदर्भ देण्याची वृत्ती जागृत व्हावी, चौकसता निर्माण व्हावी या अशा काही प्रमुख हेतूनी असे अभ्यास प्रेरित असतात. तसेच प्रकल्प लेखनातून असे काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्याला मिळत असतो. तसेच त्या अनुषंगाने अधिकचे अध्ययन, वाचन केल्याने विद्यार्थ्याला त्या विषयात प्रगती साधता येते. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना साध्य करता याव्यात यासाठी असा विषय पदवी पातळीवर अभ्यासक्रमात ठेवला जातो.

## ४.३ प्रकल्प लेखन म्हणजे काय?

प्रकल्प लेखन म्हणजे काय ते प्रथम पाहू. आपल्या अभ्यासक्रमात प्रकल्प लेखनासाठी "संबंधित अभ्यास विषयाच्या अनुषंगाने एखादा विषय निवडून त्या संबंधाने विशिष्ट कार्यपद्धतीचा वापर करून मांडणी करणे म्हणजे प्रकल्प लेखन होय." संबंधित सत्रामध्ये आपल्याला भाषांतर, रूपांतर अनुवाद व प्रशासकीय क्षेत्रातील पारिभाषिक शब्द, कोशाची संकल्पना या विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प लेखन करावे लागणार आहे. यातील कोणत्याही एका घटकावर प्रकल्प लेखन करत असताना त्याचे स्वरूप बदलते. या विषयानुसार प्रकल्प लेखन कसे करावे याची चर्चा आपण इथे करू.

प्रकल्प लेखन करताना काही गोष्टी ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. त्या पुढीलप्रमाणे पाहता येतील- प्रकल्पलेखनाच्या विषयाची निश्चिती करणे, त्यानंतर विषयाला योग्य शीर्षक देणे, विषयाशी संबंधित माहिती प्रकल्प लेखनामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. प्रकल्प लेखनाची भाषा सरळ, सुस्पष्ट असावी. अर्थबोध होणारी वाक्यरचना असावी. लेखन निर्दोष असावे. विरामचिन्हांचा यथायोग्य वापर केला जावा. प्रकल्प लेखनाची मांडणी सविस्तर व मुद्देसूद असावी. मांडणी करत असताना परिच्छेदांची रचना करावी. मांडणी करत असताना वाक्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. वाक्यरचनेमध्ये व्याकरणिक भान जपणे गरजेचे आहे. संशोधन प्रकल्पामध्ये मांडलेली मते ही ठामपणे लिहिली जाणे गरजेचे आहे. लेखनात पुराव्यांची यथोचित मांडणी गरजेची आहे पण सतत दिले जाणारे पुरावे टाळावेत, निष्कर्षात्मक विचारांची मांडणी प्रकल्पलेखनाच्या शेवटी होणे गरजेचे आहे. तसेच पारिभाषिक कोशसंदर्भात काही कार्यालयीन कागद-पत्रे पूर्व परवानगीने नमुना म्हणून द्यावीत. पुढे दिलेल्या एकूण तीन विषयापैकी कोणताही एक विषय प्रकल्पासाठी निवडावा. लिखित मजकूर हा अधिकाधिक निर्दोषरित्या मुद्रित होणे गरजेचे आहे. मुद्रण करत असताना देवनागरी-मराठी-unicode (mangal) मध्ये मजकूर टाइप करावा. फॉन्ट साईज १२ व शीर्षकांसाठी १४ ठेवावी. याचे submission ऑनलाइन पद्धतीने करावयाचे झाल्यास त्याची pdf फाइल बनवावी.  तर असे प्रकल्प लेखन विषयानुसार कसे करावे ते पाहू.

## ४.४ प्रकल्प लेखन स्वरूप

### ४.४.१. भाषिक कौशल्य-प्रत्यक्ष भाषांतर- प्रकल्प लेखन:

या विषयाचे स्वरूप हे भाषिक ज्ञान, लेखन कौशल्य व संशोधनात्मक पातळी वरील असेल. म्हणजेच भाषांतर करत असताना इतर भाषेतील किंवा स्व-भाषेतील ललित किंवा ललितेतर साहित्यातील एखादा परिच्छेद निवडून त्याचे दुसऱ्या-लक्ष्य भाषेत भाषांतर करणे गरजेचे असते. हे भाषांतर करत असताना त्या लेखाच्या भाषांतरासाठी लक्ष्य (ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे ती भाषा) भाषेतील नेमका अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दांची निवड, शीर्षक, समारोप, वाक्य रचनेतील सुसंगती अशा अनेक गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. भाषांतर, रूपांतर किंवा अनुवाद करताना नेमक्या कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्यात याचे विश्लेषण या आधीच्या घटकामध्ये आलेले आहे. त्या अनुषंगाने आपण भाषांतरासाठी मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील काही परिच्छेद निवडून त्याचे दुसऱ्या भाषेत भाषांतर करणे अपेक्षित असते. यासाठी प्रत्यक्ष भाषांतराचे काही नमुने घटक दोन मध्ये दिलेले आहेत. त्याचा बारकाईने विचार करून भाषांतर करावे. तसेच कादंबरी, कविता, नाटक यासारख्या ललित साहित्याचे भाषांतर करताना मार्गदर्शक असणारी तत्त्वे घटक एक मध्ये दिलेली आहेत. त्याचाही विचार व अवलंबन करून प्रत्यक्ष भाषांतर करावे. निवडलेल्या मूळ कलाकृतीचा- भाषा, साहित्य प्रकार (कविता. कथा, कादंबरी), लेखकाचे नाव या सर्व गोष्टी सुरुवातीस द्याव्यात. मूळ परिच्छेद देऊन त्यानंतर तुम्ही भाषांतरित केलेला परिच्छेद द्यावा. शेवटी असे भाषांतर करणे कसे महत्त्वाचे आहे, ते करताना कोणत्या अडचणी आल्या, किंवा कोणत्या गोष्टी फायदेशीर ठरल्या याचे विवेचन करावे.

### ४.४.२ पारिभाषिक शब्द विषयक प्रकल्प लेखन:

प्रशासकीय क्षेत्रातील पारिभाषिक शब्द या विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प लिहायचा असेल तर त्याचे स्वरूप पूर्ण संशोधनात्मक आहे. पारिभाषिक शब्द म्हणजे काय हे आपण घटक क्रमांक-तीन मध्ये अभ्यासले आहे. त्यानुसार "व्यवहार भाषेपेक्षा म्हणजे दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या भाषेपेक्षा नेमकेपणाने अर्थ सूचीत करणाऱ्या शब्दांना "पारिभाषिक शब्द" असे म्हटले जाते." आपल्याला अशा पारिभाषिक शब्दांचा विचार फक्त प्रशासकीय क्षेत्राच्या अनुषंगाने मांडायचा आहे. कोणत्याही प्रशासकीय क्षेत्रात व्यावहारिक भाषेपेक्षा कोणते पर्यायी वेगळे शब्द येतात याचे संशोधन करून असा प्रकल्प तयार करावा लागतो. उदाहरणार्थ- बांधकाम व औद्योगिक, न्यायालयीन, शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक सेवा, मनोरंजन, सांस्कृतिक किंवा खेळविषयक, वाहतूक किंवा दळणवळण, पर्यावरण, वित्तीय पुरवठा किंवा बँकिंग इ. अशा विविध क्षेत्रामध्ये पत्रव्यवहार, कार्यालयीन कामकाज, परिपत्रके यामध्ये विशिष्ट पारिभाषिक शब्दांचा वापर केला जातो. अशा पारिभाषिक शब्दांचा संग्रह करून त्याची मांडणी प्रकल्प लेखनात केली जाते. तसेच दोन वेगवेगळ्या क्षेत्रात एकाच अर्थासाठी येणारे दोन वेगवेगळे पारिभाषिक शब्द कसे अवलंबिले जातात याची मांडणीही विद्यार्थी आपल्या प्रकल्पात करू शकतो. ज्यामुळे अशा लेखनाला संशोधनाचे स्वरूप प्राप्त होईल. या स्वरूपाचे प्रकल्प लेखन हे प्रत्यक्ष सर्वे करून, शब्द संग्रह करूनच मांडावा लागतो. कार्यालयामध्ये जाऊन प्रत्यक्ष कागदपत्रे हाताळावी लागतात. त्यामुळे असे लेखन हे संशोधनात्मक ठरते. असे शब्द मिळविण्यासाठी विशिष्ट क्षेत्रातील शासकीय कार्यालय निवडावे. ते का निवडले याची मांडणी प्रकल्पाच्या सुरुवातीस करावी. कार्यालयात प्रत्यक्ष कर्मचाऱ्याना भेटून कार्यालयीन कागद पत्रांचा बारकाईने अभ्यास करून असे शब्द निवडावेत. ते शब्द आपल्या नोंदवहीत टिपून त्याचे अर्थही त्यासमोर लिहावेत. जास्तीत जास्त शब्द मिळविण्याचा प्रयत्न करावा. काही पत्र व्यवहार किंवा कागदपत्रे **परवानगीने** प्रकल्पात नमुना म्हणून जोडता येतात का हेही पहावे. तसेच या प्रकल्पासाठी उपयोगी पडलेल्या तंत्राचा, कार्यालयीन अधिकाऱ्यांचा उल्लेख आपल्या प्रकल्पात करावा.

### ४.४.३ कोश संकल्पना विषयक प्रकल्प लेखन:

कोश संकल्पना विषयक प्रकल्प लेखन हे देखील संशोधनात्मक स्वरूपाचे आहे. मराठीमध्ये असणाऱ्या विविध कोशातील विविध संकल्पना, त्यांची रचना, अकारविल्हे व त्यानुसार नोंदी या सगळ्या गोष्टींचा विचार यात करावा लागतो. मराठीमध्ये शब्दकोश, चरित्र कोश, विश्वकोश, संज्ञा-संकल्पना कोश, संख्यासंकेत कोश, तिथीकोश असे विविध कोश आहेत. आपण प्रकल्पासाठी विशिष्ट एखादा कोश निवडला असेल तर त्यामागील उद्देश स्पष्ट करावा. अशा कोशांवर प्रकल्प करत असताना ते कोश उपलब्ध करून देणाऱ्या ग्रंथलयापासून ते कोशामधील हाताळलेल्या माहितीचे विवेचन आपल्याला प्रकल्पात करावे लागेल. कोशाचे संपादक, प्रकाशक, प्रकाशन वर्ष या नोंदही आवर्जून कराव्यात. कोश कसा पाहावा या संबंधीचे विवेचन कोशाच्या प्रारंभी दिलेले असते. त्याची नोंद करावी. कोश पाहत असताना दिलेली अकारविल्हे, नोंदींचे स्वरूप कसे आहे- म्हणजेच त्रोटक, सविस्तर ते लिहावे. यासाठी कोशातील महत्त्वाची उदाहरणे पृष्ट संख्येसहित नोंद करावीत. तसेच अशा कोशाचे महत्त्व कसे आहे ते आपल्या शेवटच्या विवेचनात असावे.

## ४.५ प्रकल्प लेखन- मांडणी

प्रकल्प लेखनाची मांडणी क्रमबद्धरित्या होणे गरजेचे असते. प्रकल्प लेखन करत असताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

### १) शीर्षक पृष्ठ/ प्रारंभिक पृष्ठ

प्रकल्प लेखनासाठी शीर्षक ही गोष्ट महत्त्वाची ठरते. यातील भाषांतर व कोश संकल्पनेवर आधारित अशा वेगवेगळ्या प्रकल्पासाठी वेगवेगळी शीर्षके येतील. शीर्षकातून तुमचा प्रकल्प कोणत्या विषयावर आधारलेला आहे याची जाणीव परिक्षकांना होईल.

१. भाषांतर असेल तर मूळ कलाकृतीच्या शीर्षकासाठी भाषांतरित स्वरूपाचे समर्पक शीर्षक द्यावे. तसेच शीर्षकाच्या खाली कोणत्या भाषेतील, कोणत्या लेखकाच्या कलाकृतीचे भाषांतर केले आहे तेही लिहावे.

२. कोश संकल्पनेविषयी प्रकल्प असेल तर त्यानुसार शीर्षक द्यावे.

३. शीर्षक पृष्ठ हे प्रकल्प लेखनाचे पहिले पृष्ठ असावे. सर्वप्रथम मराठी विभाग, आयडॉल, मुंबई विद्यापीठाचे नाव, प्रकल्प लेखनाचे शीर्षक, त्यानंतर प्रकल्प लेखन कोणत्या अभ्यासपत्रिकेशी संबंधित आहे त्याचे नाव, विद्यार्थ्याचे नाव व पत्ता, शैक्षणिक वर्ष इ. बाबींचा उल्लेख पहिल्या पृष्ठावर येणे अपेक्षित आहे.

**नमुना शीर्षक पृष्ठ:**

**मराठी विभाग,**
**दूर व मुक्त अध्ययन संस्था,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई**

**प्रकल्पाचे शीर्षक**

तृतीय वर्ष कला- सत्र-५
मराठी अभ्यास पत्रिका क्र. -९
भाषांतर कौशल्य

**विद्यार्थ्याचे नाव-** आविष्कार जाधव
**पत्ता-** कलीन परिसर, मुंबई.

**शैक्षणिक वर्ष: २०२२-२३**

**२) प्रतिज्ञापत्र:**

शीर्षक पृष्ठानंतर विद्यार्थ्यांने स्वतःचे प्रतिज्ञापत्र जोडावे. प्रतिज्ञापत्राचा मजकूर पुढीलप्रमाणे असावा. प्रतिज्ञापत्रामध्ये विद्यार्थ्याने आपला प्रकल्प लेखन कोणत्या हेतूसाठी लिहिला आहे त्याचा उल्लेख करावा, प्रकल्प लेखन स्वतः केल्याची ग्वाही/हमी देणे गरजेचे आहे. शेवटी विद्यार्थ्यांची सही आणि दिनांक, स्थळ याचा उल्लेख होणे महत्त्वाचे आहे.

**नमुना प्रतिज्ञा पृष्ठ:**

**प्रतिज्ञापत्र**

मी ----------------------------- दूर व मुक्त अध्ययन संस्था मुंबई विद्यापीठ मुंबई मराठी विभागाचा विद्यार्थी असून TYBA मराठी, पेपर क्र. ९, सत्र-५ या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत 'भाषांतर कौशल्य' या विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प लेखन केले आहे.

- प्रस्तुत संशोधन प्रकल्प मी स्वतः लिहिला आहे. प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये दिलेल संदर्भाचे स्रोत मी नोंदवले आहेत. यामधील मजकूर माझा स्वतःचा असून त्याच्या परिणामाची जबाबदारी माझी स्वतःची आहे. शोधनिबंध लिहिण्यापूर्वी संबंधित संस्था / व्यक्ती पुरविलेल्या सामग्रीसाठी व तिचा शोधनिबंधात वापर करण्यासाठी त्या संबंधितांची आवश्यक आहे तिथे पूर्वपरवानगी मी घेतली आहे.

दिनांक : / /२०२२ विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

स्थळ :

पूर्ण नाव :

**३) अनुक्रमणिका:**

प्रतिज्ञापत्रानंतर अनुक्रमणिका जोडावी. अनुक्रमणिकेत शीर्षक व उपशीर्षक व पृष्ठ क्रमांकाचा उल्लेख करावा. भाषांतर एकापेक्षा अधिक असतील तर अशी अनुक्रमणिका जोडावी. अन्यथा नसेल तरी चालेल. कोश संकल्पनेवर प्रकल्प असेल तर मात्र संशोधन केलेल्या घटकानुसार अनुक्रमणिकेत उल्लेख असावा.

**४) प्रास्ताविक:**

प्रकल्प लेखनाच्या विषयाला धरून प्रास्ताविक होणे गरजेचे आहे. आपला प्रकल्प विषय पटवून देण्यासाठी आणि विषयाच्या संशोधनाची सुरूवात करण्यासाठी प्रस्तावना देणे महत्त्वाचे आहे. उदा. भाषांतरासाठी एखाद्या भाषेतील परिच्छेद किंवा साहित्य प्रकार का

निवडला हे इथे सांगणे अपेक्षित आहे. पारिभाषिक शब्द किंवा कोश संकल्पनेसंबंधी असेल तर त्या विषयनिवडीमागील भूमिका विद्यार्थ्याने प्रस्तावनेत नोंदवावी.

**५) मुख्य अभ्यासाचे विवेचन:**

१. भाषांतरच्या प्रकल्पात मूळ भाषेतील उतारा देऊन त्याच्या खाली भाषांतर केलेला उतारा लिहावा.

२. पारिभाषिक शब्द प्रकल्पात शब्दांची कोणत्या क्षेत्रातील शब्द आहेत. ते कुठून व कशा पद्धतीने मिळवले याची मांडणी करून त्याची सूची सादर करावी. तसेच त्या शब्दांचे व्यावहारिक भाषेतील अर्थही स्पष्ट करावेत. दोन क्षेत्रातील शब्द असतील तर विशिष्ट एका शब्दासाठी दोन्ही क्षेत्रात कसे वेगळे शब्द येतात याची मांडणी इथे करता येऊ शकते.

३. तसेच कोश संकल्पनेवरील प्रकल्पात कोणता कोश निवडलेला आहे, तो कोणत्या ग्रंथलयातून उपलब्ध झाला, त्या कोशाचे महत्त्व काय, त्यातील रचना कशी आहे, त्याची संदर्भ सूची, आकारविल्हयानुसार मांडणी कशी आहे, कोशाच्या प्रकाशनसंबंधी माहिती-उदा.-संपादक, प्रकाशक, प्रकाशन साल अशा विविध गोष्टींची मांडणी मुद्देसूदपणे करावी.

**६) निष्कर्ष:**

प्रकल्प विवेचनाअंती वापरलेल्या निकषांच्या आधारे निष्कर्षांची मांडणी करणे गरजेचे आहे. प्रकल्प लेखनातून काय साध्य झाले याची मांडणी निष्कर्षांमध्ये नमूद होणे अपेक्षित आहे. उदाहरणार्थ- पारिभाषिक शब्दांचे अर्थ व त्याच्या सुयोग्य वापर त्या क्षेत्रामध्ये कसा होतो यासंबंधीचे विवेचन यामध्ये असावे. हा मुद्दा भाषांतर या घटकाच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रकल्पात येईलच असे नाही.

**७) समारोप:**

एकूणच संशोधन प्रकल्पामध्ये अभ्यासाचे केलेले समर्थन, ठळक मुद्दे व एकूण या प्रकल्प लेखनाचा सारांश या मुद्दयात मांडून प्रकल्पाचा समारोप करावा.

**८) संदर्भसूची:**

आपल्या विषय विवेचनासाठी आवश्यक असलेल्या संदर्भांची यादी शेवटी द्यावी. संदर्भसूची शेवटी संदर्भ नोंदविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचाच वापर करावा. संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या अन्य इतर ग्रंथांचा उल्लेख करावा. संदर्भग्रंथ देताना प्रथम ग्रंथकार / संपादकाचे नाव (आडनाव प्रथम) , ग्रंथनाम (अवतरनात), ग्रंथाचे प्रकाशक व प्रकाशन स्थळ आणि शेवटी प्रकाशन वर्ष असा क्रम ठेवावा.

उदा. स. दा. कऱ्हाडे यांचे भाषांतर हे पुस्तक असेल तर त्याची माहिती-

"कऱ्हाडे, सदाः 'भाषांतर', लोकवाङ्मय गृह, मुंबई." १९८९ अशा पद्धतीने लिहावी.

## ४.६ सारांश

एकूणच आपण प्रकल्प लेखन कसे करावे याचे विषयानुसार विवेचन पाहिले आहे. हे सर्व घटक प्रत्यक्ष प्रकल्प लिहीत असताना ध्यानात घेऊन प्रकल्प तयार करावा. प्रकल्पाची मांडणी पद्धतशीरपणे करता येण्यासाठी व सर्वांच्या प्रकल्प लेखनात एकवाक्यता येण्यासाठी ही माहिती इथे दिलेली आहे. त्याचा अवलंब विद्यार्थ्यांनी आपल्या लेखनात करावा.

*****

**सत्रांत- नमुना प्रश्नपत्रिका**
**तृतीय वर्ष कला (TYBA) सत्र-V,**
**मराठी अभ्यासपत्रिका क्र. ९ - भाषांतर कौशल्य**

**परीक्षा गुण विभागणी**
**१. अंतर्गत परीक्षा - २० गुण**
**२. सत्रांत परीक्षा - ८० गुण**

**सूचना:**
१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.
३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात

**प्रश्न १** **अ-** भाषांतर आणि रूपांतर या संकल्पना सविस्तर स्पष्ट करा **(२०)**

किंवा

**आ-** ललितसाहित्य कृतींच्या भाषांतराचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

**प्रश्न २** **अ-** भाषांतर करताना येणाऱ्या शैलीविषयक समस्याचे विश्लेषण करा. **(२०)**

किंवा

आ- भाषांतरातील भाषिक समस्यांची चर्चा करून विविध अभ्यासकांची मते नोंदवा.

**प्रश्न ३** **अ-** संबंधित पुस्तकातील घटक २ मधील २.३.४ मधील कोणत्याही दोन परिच्छेदाचे इंग्रजी भाषेत भाषांतर करा **(२०)**

किंवा

**आ-** संबंधित पुस्तकातील घटक २ मधील २.३.२ मधील २ परिच्छेदाचे हिंदीमध्ये भाषांतर करा.

**प्रश्न ४** **अ-** पारिभाषिक शब्द म्हणजे काय ते सांगून दहा पारिभाषिक शब्द सांगा. **(२०)**

किंवा

आ- कोश रचनेतील 'अकारविल्हे' म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.